मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

www.dainikmahasagar.in Epaper: www.epaper.dainikmahasagar.in

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

पालघर - ठाणे- रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | मंगळवार, २१ ऑक्टोबर २०२५ | वर्ष: ११ | अंक: ३२७ | पाने-८ | किंमत रु. २ + वितरण खर्च रु. १ एकूण रु.३




**अग्राग्रलेख**

## खरीखरी

### दीपा, दीपा दीपत्कार !

आपल्या देशात सर्वाधिक श्रद्धेचा, सर्वाधिक चर्चेचा, सर्वाधिक खाऊ गिरीचा, सर्वाधिक पर्यटनाचा, सर्वाधिक प्रेम-संदेशांचा तसेच सर्वाधिक शुभ संदेशांचा वगैरे वगैरे सर्वाधिक लोकप्रिय असलेला दीपावलीचा दिवस आज उगवला आहे. ज्या लोकांचे वय पन्नाशीच्या पुढे आहे. त्यांच्या मनात तेव्हाची दिवाळी आणि आत्ताची दिवाळी या मधला फरक पटकन लक्षात येतो कारण पूर्वी पोस्टाच्या माध्यमातून आपल्या जवळच्या नातलगांना, मित्र-मैत्रिणींना आणि आप्तेष्टांना नवसंदेश जात असत. त्यामध्ये प्रेमाचा ओलावा आणि नात्याची जवळीक दिसून येत असे. आता मोबाईल नावाचा हा प्राणी आपल्याकडे आला आणि आपसातील प्रेमाचा ओलावा गलितगात्र झाला. आपल्या मोबाईल मध्ये जेवढे काही क्रमांक सेव्ह असतील त्या सर्वांना एका झटक्यात कचकन दिवाळीच्या शुभेच्छा पोहोचतात. अनेक प्रियजन हे संदेश वाचण्याचे कष्टही घेत नाहीत, हा बहुधा सर्वांचाच अनुभव असावा. पूर्वी दुकानात जाऊन शुभेच्छा संदेशाची पत्रे घेणे किंवा प्रेमपत्र घेणे, लिफाफ्यावर पत्ता लिहिणे त्यावर तिकीट लावणे आणि पोस्टाच्या पेटीत टाकणे एवढी गोष्ट आता कोण करणार आहे. पूर्वीच्या काळी घरात दिवाळी करता जे पदार्थ बनायचे त्यामुळे दिवाळीच्या आधीच चार-आठ दिवस तेला, तुपाचा घमघमाट आणि त्याच्या स्वादाचा सुगंध आपल्या नाकाला प्रसन्न करून जात होता. आता सुगंध उडून गेला आणि अचानक हल्दीराम आणि जल्दीराम यांच्याकडे त्यांचे डबे विकत घेण्यासाठी रांगा लागू लागलेल्या आहेत. दिवाळी साजरी करण्याची जुनी कल्पना आणि आताची कल्पना यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. पूर्वी दिवाळी म्हटली की प्रत्येक मराठी माणसाच्या घरात किमान दोन ते चार वाचनासाठी दिवाळी अंक दिसायचेच. आताही दिवाळी अंक प्रकाशित होतात, अगदी शेकड्यांनी प्रकाशित होतात. पण त्या दिवाळी अंकांमध्ये पूर्वीच्या दिवाळी अंकांचा तो दरारा आणि तसे लेखक का दिसत नाहीत, हा प्रश्न खरं तर कोणीच विचारू नये. खरे म्हणजे दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे कारण अमावस्येच्या रात्री दिव्यांची रोषणाई करून आपण लक्ष्मीला आमंत्रित करतो. ते पूर्वीचे स्वरूप आता विजेच्या दिव्यांच्या झगमगटामध्ये लोप पावत चाललेले आहे. बिचारा एकुलता एक दिवा विजेच्या त्या अनेक दिव्यांच्या लखलखाटामध्ये ओशाळल्यासारखा जळत असतो. त्याच्या आजूबाजूला विजेचा जो काही प्रकाश आणि इतका झगझगाट असतो की त्याला पाहून, मंद तेलगंध प्रसवणारा दिवा ओशाळला नाही तरच नवल! मग आता हे दिवे भविष्यात किती काळ जिवंत राहतील, हाही अभ्यासाचा विषय आहे. दिवाळीच्या सुट्टीमध्ये मामाच्या गावात जाऊन मस्त मजा करण्याचे दिवस बालकांच्या दहा ते पंधरा किलो दप्तराच्या नको असणाऱ्या ओझ्याच्या वजनात विरून गेलेले आहेत. काही वर्ष मामा, काका, भाऊ व बहीण तरी आहेत. पुढच्या पिढीला ही नाती होती असे सांगावे लागेल. जाऊ द्या, दिवाळीच्या दिवशी मस्त मज्जा करा, विकत आणलेला फराळ आणि मिठाई खा आणि दिवाळी साजरी करा. असे सर्व काही असले तरी दिव्याचा दीपत्कार यापुढेही भावनाशील माणसाला निश्चितच दिव्यत्वाची जाणीव देऊन जाईल, यात शंका नाही त्यासाठीच सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा...!!!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# आयएनएस विक्रांतने पाकिस्तानची झोप उडवली

## दिवाळीनिमित्त पंतप्रधान मोदींनी नौदलाचे केले कौतुक

**गोवा , दि. २० वृत्तसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाची दिवाळी स्वदेशी बनावटीच्या विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत वरील नौदल कर्मचाऱ्यांसोबत साजरी केली. यावेळी त्यांनी नौदलाच्या पराक्रमाचे कौतुक केले. या युद्धनौकेमुळे 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानची झोप उडाली होती, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गोवा आणि कारवारच्या किनाऱ्यावरील आयएनएस विक्रांतला भेट देऊन भारतीय सशस्त्र दलांसोबत दिवाळी साजरी करण्याची परंपरा कायम ठेवली. आयएनएस विक्रांतवर बसून, पंतप्रधान मोदी मिग-२९के लढाऊ विमानांच्या बाजूने असलेल्या फ्लाईटडेकवर गेले आणि दिवसा आणि रात्री दोन्ही वेळी मिग २९ लढाऊ विमानांच्या लहान धावपट्टीवर उड्डाण आणि उतरण्याच्या हवाई शक्तीचे प्रात्यक्षिक पाहिले. भेटीदरम्यान, त्यांनी विमानवाहू जहाजावरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या समर्पणाचे कौतुक केले. त्यांनी जहाजावरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांना मिठाई वाटली आणि संबोधित केले.

ही केवळ एक युद्धनौका नसून, २१ व्या शतकातील भारताची मेहनत, प्रतिभा, प्रभाव आणि वचनबद्धता यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. "आयएनएस विक्रांत हे असे नाव आहे, जे लढाई सुरू होण्यापूर्वीच शत्रूचे धैर्य खचवते," असे ते म्हणाले.

२२ एप्रिलच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर नौदलाला अरबी समुद्रात 'हाय अलर्ट'वर ठेवण्यात आले होते. यावेळी आयएनएस विक्रांत आपल्या सोबत ८ ते १० युद्धनौका घेऊन मध्यभागी तैनात होती. भारतीय नौदलाच्या शांतताकाळातील नेहमीच्या सरावांव्यतिरिक्त, ही एक अत्यंत मोठी आणि वास्तविक वेळेतील निर्णायक हालचाल



होती. या तैनातीमुळे पाकिस्तानला संभाव्य नौदल हल्ल्याच्या भीतीने धोक्याचे इशारे जारी करावे लागले होते. युद्धनौकेवर घालवलेल्या रात्रीचा अनुभव सांगताना पंतप्रधान मोदी भावूक झाले. ते म्हणाले, "मी 'वर्तमान क्षणात जगणे' किती महत्त्वाचे आहे, हे तुमच्याकडून शिकलो. तुमचे समर्पण इतके मोठे आहे की मी ते पूर्णपणे जगू शकलो नाही, पण अनुभवले नक्कीच आहे. रोजच्या जीवनातील तुमचे हे आव्हान किती मोठे आहे, याची मला कल्पना आहे." रात्रीचा महासागर आणि पहाटेचा सूर्योदय पाहून त्यांची दिवाळी अधिक खास झाल्याचेही नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

**छत्रपती शिवाजी महाराजांकडून प्रेरणा..**

मोदींनी सांगितले की, गेल्या ११ वर्षांत संरक्षण क्षेत्रातील उत्पादन तीन पटीने वाढले आहे. तसेच, साधारणपणे दर ४० दिवसांनी एक नवीन युद्धनौका किंवा पाणबुडी नौदलात सामील होत आहे. त्यांनी ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या वाढत्या जागतिक मागणीचा उल्लेख करत, भारत लवकरच जगातील शीर्ष संरक्षण निर्यातदार देशांमध्ये सामील होईल, असा विश्वास व्यक्त केला.

त्यांनी आठवण करून दिली की, जेव्हा ही युद्धनौका देशाला सुपूर्द केली जात होती, तेव्हा नौदलाने वसाहतवादी वारशाचे एक मोठे प्रतीक बाजूला सारून छत्रपती शिवाजी महाराजांकडून प्रेरणा घेतलेला नवीन ध्वज स्वीकारला.

# नरकासूर कोण ते सगळ्यांनाच माहीत आहे – उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

भाजपाच्या माजी नगरसेविका संगीता गायकवाड यांनी उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. इतर काही नेतेही शिवसेनेत आले. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी छोटेखानी भाषण केलं. नरकासूर कोण आणि त्याचा वध कसा करायचा हे तुम्हाला माहीत आहे असं सूचक विधान ठाकरेंनी केलं. तसंच नाशिकमध्ये मी पुन्हा येईन असंही उद्धव ठाकरे म्हणाले. ज्यानंतर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. महापालिकेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत.

सगळ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देतो आहे. आज नरक चतुर्दशी आहे, कृष्णाने नरकासूराचा वध केला. नरकासूर कोण वेगळं सांगायची गरज नाही. त्याचा वध करण्यासाठी संगीता गायकवाड आणि इतर मंडळी शिवसेनेत आली आहेत. आता हा प्रवाह सुरु झाला आहे. जे मतचोरी करुन



तिकडे बसले आहेत त्यांची चोरी आपण चोरांसकट पकडली आहे. या चोरांना हद्दपार करण्यासाठी सर्व मराठी माणसं, अमराठीही एकत्र आले आहेत. कारण कुणालाच हे आवडलेलं नाही.

महाराष्ट्र हा लढणारा आहे. संगीता गायकवाड आणि इतर सगळे शिवसेनेत आले मी सगळ्यांच्या देखत तुम्हाला विचारतो तुम्हाला काही खोके वगैरे मिळाले आहेत का? काही धाक दाखवला गेला का? कारण शेवटी लालूच दाखवून घेतलेली माणसं नेभळट असतात. यापेक्षा निष्ठावान सैनिक मला प्रिय आहेत. मी भाजपाच्या सगळयाच नेत्यांना विनंती करतो आहे आपण कसं विष पोसत आहात याकडे डोळे उघडून बघा. इतिहासात पापाचे धनी म्हणून स्वतःची नोंद होऊ देऊ नका. मी नाशिकमध्ये तसा आधीही येऊन गेलो आहे. पण नाशिकमध्ये मी पुन्हा येईन. त्यावेळी भगवा फडकलेला असला पाहिजे असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# शेतकऱ्यांनो, आत्महत्या करण्यापेक्षा आमदाराला कापा - बच्चू कडूंचे वादग्रस्त वक्तव्य

**बुलढाणा, दि. २० प्रतिनिधी**

प्रहार संघटनेचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून संताप व्यक्त करताना एक अत्यंत वादग्रस्त आणि भडकाऊ आवाहन केले आहे. आत्महत्या करण्याऐवजी थेट एखाद्या आमदाराला कापून टाकण्याचा किंवा सार्वजनिक ठिकाणी विवस्त्र होऊन आंदोलन करण्याचा सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे. त्यांच्या या विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे.

शेतकरी हक्क परिषदेमध्ये बोलताना बच्चू कडू यांनी कापूस आणि इतर शेतमालाला मिळत असलेल्या कवडीमोल भावावरून (उदा. ३,००० रुपये) तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी शेतकऱ्यांना टोचून विचारले, "आपला कापूस ३,००० ला विकावा लागला तर काय कराल तुम्ही? सगळी शांत, आत्महत्या! अरे, तू मरण्यापेक्षा एखाद्याला मारून टाक ना! एखादा आमदार तरी कापला का?"

यावेळी त्यांनी आंदोलनाची आणखी एक सीमा ओलांडणारी पद्धत सांगितली. ते म्हणाले, "आत्महत्या केल्यापेक्षा त्या आमदाराच्या घरासमोर पूर्ण कपडे काढून बसायचं. कपडे ठेवायचे नाही आणि घराच्या समोर जाऊन बस आणि उठ. काय पीक मेल्याशिवाय परवडत नाही का? हा धिंगाना जर सुरू केला ना, तर सांगतोय.." आपल्या वक्तव्यावर होणाऱ्या संभाव्य टीकेची पर्वा न करता, बच्चू कडू यांनी स्वतःवरील गुन्ह्यांचा उल्लेख केला. "माझ्यावर साडेतीनशे गुन्हे दाखल आहेत. आतापर्यंत चार कलेक्टर आडवे केले, तीन सचिव मंत्रालयात ठोकले, काय फरक पडला? करून काय करणार आहेत?" असा संताप त्यांनी व्यक्त केला.




# विरोधकांच्या फुसक्या लवंग्यांचा आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही- शिंदे

**ठाणे, दि. २० प्रतिनिधी**

विरोधकांनी आता कितीही लवंग्या-सुरसुरी फोडल्या, तरी आम्ही त्याकडे पाहतही नाही. कारण महायुतीकडे ॲटम बॉम्ब आहे आणि तो फुटला की विरोधकांचे राजकीय अस्तित्व उडून जाईल" असा स्फोटक इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात दिला. महायुतीसोबत महाराष्ट्राची जनता ठामपणे उभी आहे, म्हणूनच आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पूर्ण बहुमताने आमचीच सत्ता येणार असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ठाण्यातील रहेजा गार्डन येथे पार पडलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमानंतर शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधक दररोज आरोपांचे फटाके फोडतात, पण त्यांच्या त्या फुसक्या लवंग्यांचा आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही. आम्ही कामगिरीच्या ॲटम बॉम्बने महाराष्ट्र उजळवणार



आणि विरोधकांचा धुरळा उडवणार आहोत. आमचे लक्ष विकासावर आहे आणि विरोधकांचे काम फक्त आरोप, टीका करणे आहे असा टोला शिंदेंनी लगावला.

तसेच ठाण्यातील तरुणाईत आज जेवढा उत्साह आणि जल्लोष दिसतोय, ते महाराष्ट्राचं भविष्य आहे. ही परंपरा स्व. आनंद दिघे यांनी रुजवली, आणि आम्ही ती पुढे नेत आहोत. गोपाळकाला, गणेशोत्सव, नवरात्र, दसरा, दिवाळी ठाण्याचा प्रत्येक सण शक्तीचे प्रदर्शन असते. ठाणेकर हे माझे कुटुंब आहे. त्यांच्याच आशीर्वादाने मी मुख्यमंत्री झालो. आज मला आनंद दिघे आणि बाळासाहेब ठाकरे यांची आठवण झाली. बाळासाहेबांनी ठाण्यावर प्रेम केलं, दिघे साहेबांनी विकास केलाय. म्हणूनच ठाण्याला सणांची पंढरी म्हणतात असे एकनाथ शिंदेंनी म्हणाले. दरम्यान, शेतकरी संकटात असताना शिवसेना आणि महायुती सरकार त्यांच्यासोबत उभं आहे. आम्ही दिलेलें वचन पाळले. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीचा पैसा पोहोचतोय. या पुरात धाराशिव जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांच्या गायी वाहून गेल्या, त्या शेतकऱ्यांना १०१ दुभत्या गायी देण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. कारण शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेणं ही आमची संस्कृती आहे. संकटात धावून जाणं आम्हाला बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांनी शिकवलं आहे. त्यामुळे आम्ही केवळ बोलत नाही, कृती करून दाखवतो असंही एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# शनिवार वाड्यातील नमाज पठणावरून महायुतीत जुंपली

## राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून मेधा कुलकर्णींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पुणे, दि. २० प्रतिनिधी**

पुणे शहरातील शनिवारवाड्यात दोन दिवसापूर्वी काही मुस्लीम महिलांनी नमाज पठण केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. हा व्हिडीओ पाहिल्यानंतर भाजपा नेत्या आणि राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी रविवारी दुपारी काही हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन शनिवारवाड्यात प्रवेश केला. तथाकथित मुस्लिम महिलांनी ज्या ठिकाणी नमज पठण केले होते त्या जागेवर गोमूत्र शिंपडलं आणि ती जागा शेणाने सारवली. तसेच सर्व कार्यकर्त्यांबरोबर त्या ठिकाणी शिववंदना केली. यासह मेधा कुलकर्णी व त्यांच्याबरोबर आलेल्या कार्यकर्त्यांनी शनिवारवाडा परिसरातील मजार काढून टाकण्याची मागणी केली.

यावरून मेधा कुलकर्णी यांच्यावर काँग्रेससह विरोधी पक्षांनी टीका केली आहे.



त्यापाठोपाठ त्यांच्याच मित्रपक्षांनी देखील त्यांच्यावर नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) नेत्या रूपाली ठोंबरे-पाटील यांनी खासदार मेधा कुलकर्णी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. यासह त्यांनी भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने मेधा कुलकर्णी यांना समज द्यावी असंही सुचवले आहे.

रूपाली ठोंबरे म्हणाल्या, “मेधा कुलकर्णी यांच्यासारख्या अशिक्षित बाईने आम्हाला हिंदुत्व शिकवू नये. त्यांच्या या नौटंकीमुळे पुण्यात हिंदू मुस्लिमांमध्ये तेढ निर्माण होत आहे. समाजातील सामाजिक सलोखा बिघडतोय. त्यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल झाला पाहिजे आणि कारवाई केली पाहिजे.

राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे म्हणाल्या, “आपल्या धर्माचा स्वाभिमान असणं ही वेगळी गोष्ट आणि दुसऱ्या धर्माच्या भावना दुखावणं वेगळं. आपल्या धर्माचा प्रत्येकाला स्वाभिमान असायला पाहिजे. परंतु, ते करत असताना दुसऱ्या धर्माच्या भावना दुखावत असतील तर तो कायद्याने गुन्हा आहे. मेधा कुलकर्णी यांचं कृत्य बेकायदेशीर आहे. मेधा कुलकर्णी शिक्षिका असल्या तरी त्यांना ही गोष्ट माहीत नसेल की शनिवार वाडा हे मराठ्यांच्या विजयाचं प्रतीक आहे. शनिवारवाडा मेधा कुलकर्णी यांच्यासारख्या बुरसटलेल्या बुद्धीचं प्रतीक नाही. ते पेशवे सुद्धा आज वरून मेधा कुलकर्णी यांना शिव्या शाप देत असतील.”

## धाटाव पंचायत समितीसाठी सौ. मिनल बामुगडे यांच्या उमेदवारीची
## राष्ट्रवादी युवांकडून जोरदार मागणी



**रोहा प्रतिनिधी ।**
रोहा तालुक्यातील धाटाव पंचायत समिती गणासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सौ. मिनल महेश बामुगडे यांना उमेदवारी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी स्थानिक युवा कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.
पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते महेश बामुगडे यांच्या पत्नी असलेल्या सौ. मिनल बामुगडे या सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय आहेत.
सामान्य कार्यकर्त्यांच्या प्रतिनिधीत्वासाठी आणि गावागावांतील समस्यांना आवाज मिळण्यासाठी सौ. बामुगडे यांची उमेदवारी आवश्यक आहे, असे मत युवकांनी व्यक्त केले आहे.
महेश बामुगडे यांचे पक्षाशी असलेले जुने योगदान आणि निष्ठा लक्षात घेऊन, सौ. बामुगडे यांच्या उमेदवारीमुळे पक्षाला स्थानिक पातळीवर अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.
युवक कार्यकर्त्यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन ही मागणी अधिकृतरित्या सादर केली आहे.

# "उमटे धरण 'गढूळ' कारभाराचा भंडाफोड!
## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्फोटक अहवालातून सत्य उघड

**अलिबाग प्रतिनिधी ।**
उमटे धरणावर जनतेच्या जीवाशी खेळ करणारा कोट्यवधींचा पाण्याचा घोटाळा उघडकीस आला आहे! पिण्याच्या पाण्याऐवजी नागरिकांना गढूळ आणि लालसर पाणी पुरवठा होत असल्याची गंभीर तक्रार उमटे धरण संघर्ष ग्रुपचे अँड. राकेश पाटील यांनी २४ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (म.जी.प्रा.) विभाग माणगाव येथे दाखल केली होती.
या तक्रारीनंतर शासन यंत्रणा अक्षरशः ॲक्टिव्ह मोडवर आली असून, कार्यकारी अभियंता स्वतः धरणावर धडकले! फिल्टर प्लांटची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी पाणीपुरवठा विभागाच्या भोंगळ कारभाराचा पर्दाफाश केला आहे.
सहा वर्षांपासून बंद असलेला



कोट्यवधी रुपयांचा फिल्टर प्लांट, तरीही कर्मचाऱ्यांना नियमित पगार — हा नेमका कोणत्या हितसंबंधाचा खेळ? अशीच विचारणा आता स्थानिक नागरिकांमध्ये सुरू आहे. शासनानेही या गंभीर प्रकरणाची दखल घेत चौकशीला सुरुवात केली आहे.
कोटी रुपये खर्च करून २०१५-१६ मध्ये जिल्हा परिषदेने उमटे धरणाजवळ जलशुद्धीकरण केंद्र उभारले आणि २०१८-१९ मध्ये कार्यान्वित केले. पण प्रत्यक्षात मागील सहा वर्षांपासून संपूर्ण प्लांट बंद पडलेला असून, फिल्टर बेड, फ्लॉक्युलेटर, क्लोरीनेशन यंत्रणा काहीच कार्यरत नाहीत.
पाहणीदरम्यान कार्यकारी अभियंत्यांना असे दिसून आले की, धरणातून येणारे कच्चे पाणी फक्त तुरटीचा डोस देऊन नागरिकांना पुरवले जाते! म्हणजेच, पाणी फिल्टर न होता थेट नळांमधून घराघरात पोहोचते. तरीसुद्धा या बंद पडलेल्या प्लांटवरील कर्मचाऱ्यांना पगार नियमितपणे देण्यात येत असल्याचे सत्य समोर आले आहे. यावरून पाणीपुरवठा विभागातील भ्रष्टाचार आणि लपवाछपवीचा वास अधिक तीव्र झाला आहे.

> शासनाने तातडीने चौकशी सुरू केली असली तरी, जबाबदार अधिकारी व विभागांवर कारवाई होणार का, हा खरा प्रश्न आहे. उमटे धरणाच्या गढूळ पाण्यामागे असलेला फिल्टर प्लांट घोटाळा रायगड जिल्ह्यातील प्रशासनाची पारदर्शकता आणि जबाबदारी दोन्हीवरच प्रश्नचिन्ह उभे करतो!
>
> **- अँड. राकेश पाटील**
> **अध्यक्ष**
> **उमटे धरण संघर्ष समिती**

## महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट मार्फत प्रशिक्षण कार्यक्रम



**पेण प्रतिनिधी ।**
प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत (पाणलोट विकास घटक २.०) रोहा तालुक्यातील सात गावांमध्ये (खारगाव, खांबेरे, शेडसई, अरे बुद्रुक, सरसोळी, खैरे खुर्द, महालुंगे) न्यू जनरेशन पाणलोट विकास प्रकल्पाचे प्रशिक्षण सुरू आहे.
महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट प्रकल्प प्रशिक्षण संस्था (पीटीओ) व उपजीविका संसाधन संस्था (एलआरए) म्हणून हे प्रशिक्षण घेत आहे.
प्रशिक्षणाचा उद्देश:
* प्रकल्पाची जाणीव जागृती करणे.
* पाणी व्यवस्थापनासाठी विविध उपचार पद्धतीचे मार्गदर्शन करणे.
* लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करणे.

या प्रशिक्षणात सरपंच, ग्रामसेवक, पाणलोट समिती सदस्य, बचत गट सदस्य आणि शेतकरी वर्ग सहभागी होत आहेत. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा आणि जलसंधारण विभाग, रायगड यांच्या सहकार्याने हे कार्य सुरू आहे

## विद्यार्थ्यांनी निष्फळ वेबसाइट्स आणि सोशल मीडियावर वेळ वाया घालवू नये

**कर्जत प्रतिनिधी ।**
'फक्त पैशाचा विचार करू नका, स्वत:च्या प्रगतीवर आणि कौशल्य वृद्धीवर लक्ष केंद्रित करा. आणि सातत्यपूर्ण सरावाद्वारे उत्कृष्टता साधा.
विद्यार्थ्यांनी बाजारातील अफवा किंवा टिप्सवर विश्वास ठेवू नका. निरीक्षण आणि विश्लेषण या गुणांचा शेअर बाजारात तितकाच महत्त्वाचा उपयोग होतो जितका तो औषधनिर्माण क्षेत्रात आहे. ज्ञानाधारित गुंतवणुकीद्वारे आर्थिक स्वातंत्र्य साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहावे.' असा मौलिक सल्ला अवधूत साठे ट्रेडिंग अकॅडमी (ASTA) चे संस्थापक अवधूत साठे यांनी विद्यार्थ्यांना दिला.
याप्रसंगी डॉ. रूपाली येवले, डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. निलोफर खान, प्रा. प्रियांका बांदीवडेकर, स्वीटी दळवी आदी उपस्थित होते.

## दांडगुरी तलाठी कार्यालयाच्या ईमारतीचे काम रेंगाळले



नागरीकांचा सवाल जोथ्याचे कामास वर्ष लोटला तलाठी कार्यालयाच्या ईमारतीचे बांधकाम पुर्ण कधी होणार

**बोर्लीपंचतंन प्रतिनिधी ।**
दांडगुरी येथील तलाठी कार्यालयाच्या ईमारती बांधकामाचे भुमी पुजन होउन वर्ष लोटले तरी अध्याप ईमारतीचे काम पुर्ण झाले नसुन संबधीत आधिकार्याचे ही सदर बांधकामा कडे दुर्लक्ष झाल्याचे समजते
12ऑक्टोबर 2024रोजी याचे भुमीपुजन करण्यात आले होते सदर चे काम हे महसुल व वनविभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ. यांच्या संयुक्त विध्यमाने करण्यात येत आहे.
परंतु वर्ष लोटले तरी फक्त या कामाचे फक्त पायाचेच काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे या बाबत सदर कामाचे ठेकेदाराना विच्यारले आसता त्यांच्या कड्डन समर्क पणे उत्तर मिळु शकले नाही.
सदर कामाचे इंजिनिअर यांनी या कामा बाबत ठेकेदारास काही अडचणी असतील तर त्या सोडवाव्यात असे नागरिकांचे म्हणणे आहे.
या ईमारतीचे पुर्ण बांधकामा किती कालावधी पर्यत पुर्ण करण्याचे आहे पायाचे कामास वर्ष लोटले पुर्ण ईमारतीस किती कालावधी लागेल असा सवाल नागरीक करीत आहेत

# आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तळा भाजपची आढावा बैठक संपन्न



**तळा प्रतिनिधी ।**
आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तळा भाजपची आढावा बैठक संपन्न झाली. शहरातील कुणबी सभागृहात या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या आढावा बैठकीत तळा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दोन व पंचायत समितीच्या चारही जागांसाठी भाजप कडून उमेदवारांची चाचपणी करण्यात येत असून भाजपने तालुक्यातील सर्वच्या सर्व जागांवर आपले उमेदवार उभे करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.गेली कित्येक वर्षे तळा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून येत आहेत.राज्यात महायुती असली तरी तालुक्यात राष्ट्रवादी कडून मित्र पक्षाला जागा सोडण्याची शक्यता धूसर असल्याने सर्वच पक्ष आपापले उमेदवार उभे करण्याच्या तयारीत आहेत. त्याअनुषंगाने भाजपच्या आढावा बैठकीत जर पक्षश्रेष्ठींनी आदेश दिला तर तालुक्यातील सर्व जागांवर भाजपचे उमेदवार उभे करण्याची तयारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. याप्रसंगी भाजपचे जिल्हा सरचिटणीस प्रशांत शिंदे,महिला सरचिटणीस हेमाताई मानकर,माजी तालुका अध्यक्ष ॲड निलेश रातवडकर,शहर अध्यक्ष राकेश कासार यांसह भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डिपॉझिट परत देण्याच्या वादातून चाकूने भोसकले




**पनवेल प्रतिनिधी ।**
डिपॉझिट परत देण्याच्या वादातून आरोपीने भोसकल्याची घटना पनवेल शहरातील वडाळे तलाव परिसरात घडली आहे.
फिर्यादी गोविंद राठोड यांना आरोपी आनंद जाधव यांनी ०२ लाख रू हेवी डिपॉझीट वरती फिर्यादी यांचेकडुन फिर्यादी यांचे भावाचे नावे असलेली सदनिका भाडे तत्त्वावर घेतली होती. आरोपी याचे सोसायटीमधील सदस्यांशी वाद झाल्याने आरोपी आनंद जाधव याने फिर्यादी गोवीद राठोड यांचेकडे डिपॉझीटचे पैसे परत मागीतले असता सदरचे पैसे देण्यासाठी फिर्यादी हे वडाळे तलाव परिसरामध्ये गेले असता आरोपी आनंद जाधव याने माझे पुर्ण पैसे मला परत कर असे बोलुन फिर्यादी यांची कॉलर पकडुन त्यांना शिवीगाळ करून आरोपीने त्याचे जवळील चाकु फिर्यादी यांचे पोटामध्ये उजव्याबाजुस खुपसुन फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने गंभीर जखमी केले म्हणुन पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर दिव्यांच्या लखलखाटाने उजळले

**पनवेल प्रतिनिधी ।**
दिवाळी सणाच्या पार्श्ववभूमीवर सर्वत्र झगमगाट सुरु आहे. दिव्यांची आकर्षक रोषणाई ही आता पनवेलची एक वेगळी ओळख होत आहे. यामध्ये दिवाळी निमित्त पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालय, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, प्रभाग कार्यालयांना , विविध कार्यालये, चारही प्रभागातील चौक, रस्ते यांना आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे शहरातील टिळक रोड परिसर हा केदार बिल्डकॉन मुळे झगमगला असून अनेकजण या ठिकाणी उभे राहून या रोषणाईचा आनंद घेत आहेत. तर तरुण वर्ग सेल्फी व व्हिडिओ काढून आपला आनंद द्विगुणित करीत आहेत.
या भागात अंत्यत मोठी व जुनी अशी यशोमंगल सोसायटीचे नुकतेच पुनर्विकासाचे काम



सुरु झाले आहे. या ठिकाणी पियुष भाई यांचे कार्यालय असलेले केदार बिल्डकॉन ने ही सोसायटी डेव्हलप करायला घेतली आहे. इतर बांधकाम व्यवसायिक हे फक्त आपल्या बिल्डिंगचे बांधकाम बघतात परंतु केदार बिल्डकॉन हे कधीच व्यवसाय न पाहता सामाजिक बांधिलकी जपत परंपरागत सण उत्सव सुद्धा साजरे करतात. या उद्देशानेच आज दिवाळीच्या सणानिमित्त यशोमंगल सोसायटी परिसर हा केदार बिल्डकॉनच्या माध्यमातून पूर्ण रोषणाई करून त्यांनी आगळा वेगळा उपक्रम राबवला आहे. या भागातील नागरिक तसेच इतर अनेकजण या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई पाहण्यासाठी येथे गर्दी करीत आहेत व केदार बिल्डकॉनचे कौतुक करत आहेत. आकर्षक बांधकाम, वाजवी दर व ग्राहकाचे समाधान या तत्वावर केदार बिल्डकॉनचे पनवेल शहर, नवीन पनवेल, वाशी, मुंबई या ठिकाणी मोठं मोठे प्रोजेक्ट कार्यन्वित आहेत.

## रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे श्री धन्वंतरी पूजन



**कर्जत प्रतिनिधी ।**
धनत्रयोदशी आणि श्री धन्वंतरी जयंतीनिमित्त
रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे श्री धन्वंतरी पूजन करण्यात आले.
रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे कर्जत मेडिकल असोसिएशन आणि निमा कर्जत तालुका शाखे च्या संयुक्त विद्यमाने कर्जत मधील रॉयल गार्डन येथे श्री धन्वंतरी पूजन करण्यात आले.
या वेळी प्रास्ताविक करताना रायगड चे अध्यक्ष डॉ आशुतोष कुलकर्णी म्हणाले की देवाजवळ हीच प्रार्थना करतो की पुन्हा राज्य नको,स्वर्ग प्राप्ती नको, पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागला तरी चालेल पण माझ्या हातानी रुग्णांची सेवा होऊ दे, त्यांचे दुःख,रोग कमी करण्यासाठी शक्ती आम्हा सर्व डॉक्टरांना दे .
ह्यावेळी निमा चे अध्यक्ष डॉ मिलिंद सोनावले ह्यांनी डॉक्टरांनी आपले स्वतःचे आरोग्य आधी जपावे असे आवाहन केले. तसेच डॉ श्रीकांत डहाके, डॉ नितीन भोपतराव, डॉ प्रभाकर काळे, डॉ जयश्री देशमुख यांनी देखील मार्गदर्शन केले.
रायगड मेडिकल असोसिएशन चे सचिव डॉ प्रशांत गांगल यांनी सूत्रसंचालन केले तर रायकॉन चे कार्यकारी सचिव डॉ भावेश ओसवाल यांनी श्री धन्वंतरी स्तवन गायले.

# 'कमांडर – युद्धपट दिवाळी विशेषांका'चं प्रकाशन मुंबईत संपन्न

**पनवेल प्रतिनिधी ।**
'राष्ट्रभक्ती, युद्धपट' असा आगळावेगळा विषय घेऊन कमांडरने आपला 29 वा दिवाळी अंक प्रकाशित केला.
"मर्यादित साधनसामग्रीतही विषयांचं वैविध्य जपणे हा 'कमांडर' चा प्रयत्न स्तुत्य आहे!", असं प्रतिपादन कालनिर्णयचे सहसंस्थापक व संपादक जयराज साळगांवकर यांनी केलं.
'कमांडर' दिवाळी - युद्धपट तथा देशभक्तीपर चित्रपट विशेषांकाचं मुंबईत संपन्न झालं, त्यावेळी ते बोलत होते.'कमांडर'चा या वर्षीचा 29 वा दिवाळी अंक हा 'युद्धपट विशेषांक' (देशभक्तीपर चित्रपट) आहे.
29 वर्षापासून सातत्य ठेवून 'कमांडर'ने विविध विषयांवर विशेषांक प्रकाशित केल्याचं ऐकून त्यांनी आवर्जून कौतुक केलं. गतवर्षीच्या रंगकर्मी या विशेष अंकाचाही त्यांनी विशेष



कौतुक केले आणि 'कमांडर'ला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.
"आपल्या देशाच्या सरहद्दीवरील वर्तमानपरिस्थिती,आणि नुकत्याच झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर, जनसामान्यांच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत पुन्हा जागी करण्यासाठी युद्धपट आणि देशभक्तीपर चित्रपटांवर दिवाळी विशेषांक काढण्याचं आम्ही ठरवलं", असं या विषयाचं औचित्य यावेळी बोलताना 'कमांडर'चे संपादक डॉ.राजू पाटोदकर यांनी स्पष्ट केलं.
यावेळी डॉ.पाटोदकर यांनी 'कमांडर'च्या आतापर्यंत झालेल्या प्रवासाबद्दल थोडक्यात माहितीदेखील दिली. 'कमांडर' दिवाळी अंक राज्यात नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर, गोवा, बेळगाव, पुणे, मराठवाडा, कोकण, इंदोर, पनवेल, मुंबई, नवी मुंबई भागात लोकप्रिय असल्याचं सांगितलं
'कमांडर'चा या वर्षीचा २९ वा दिवाळी अंक हा 'युद्धपट विशेषांक' (देशभक्तीपर चित्रपट) आहे.
या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी 'कमांडर'च्या सहसंपादक पत्रकार नयना रहाळकर, पत्रकार - लेखक अविनाश कोल्हे आदी उपस्थित होते.

## इन्फिनिटी फाऊंडेशन तर्फे आपटे गावात 'जॉय कॅम्प' व दीपोत्सवाचे आयोजन

**पनवेल प्रतिनिधी ।**
इन्फिनिटी फाऊंडेशन तर्फे दिवाळीच्या निमित्ताने पनवेल तालुक्यातील आपटे गावातील आदिवासी वाडीत रविवारी 'जॉय कॅम्प' आयोजित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत दिपोत्सव, वस्त्रदान मोहीम, फराळ वाटप, तसेच स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.
या शिबिराचे मुख्य आकर्षण होते २५० वर्षे जुन्या शिव मंदिर परिसरातील 'दीपोत्सव.' ज्यामध्ये फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी मिळून आपटे गावातील २५० वर्षे जुने शिव मंदिराचा परिसर स्वच्छ केला व संध्याकाळी २०० हून अधिक दिवे प्रज्वलित केले. संपूर्ण परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला आणि ग्रामस्थांसाठी हा आनंदाचा सोहळा ठरला.
या उपक्रमाचा उद्देश फक्त दिवाळी साजरी करणे नव्हे, तर आदिवासी बांधवांसोबत सणाचा आनंद वाटणे आणि त्याचबरोबर प्राचीन वारसा



आणि संस्कृतीचे जतन करणे हा होता.
या 'जॉय कॅम्प' उपक्रमाला एन एस एस युनिट सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, तसेच एन एस एस युनिट केलेई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स तसेच ग्रामस्थ आदिवासी बांधव यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी व स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेत सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले.
या उपक्रमासाठी इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, उपाध्यक्ष मिहिर रेड्डी, समन्वयक शीतल घारगे, सरचिटणीस प्रणय उसाटकर, सरचिटणीस यश दुबे व इतर सदस्य उपस्थित होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते 'दैनिक किल्ले रायगड'च्या 59 व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन



**पनवेल प्रतिनिधी ।**
ज्येष्ठ पत्रकार प्रमोद वालेकर संपादित दैनिक किल्ले रायगडच्या ५९ व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज संपन्न झाले. या प्रसंगी त्यांच्यासोबत सहसंपादक प्रदीप वालेकर, व्यवस्थापक तुषार तटकरी, सा. रायगड प्रभातचे संपादक विजय पवार, प्रसिद्धी प्रमुख हरेश साठे, पत्रकार उमेश भोईर, आदी उपस्थित होते.
या प्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दैनिक किल्ले रायगडचा दिवाळी विशेषांक दरवर्षी वजनदार लेखकांच्या लेखणीतून साकारत असल्याचे अधोरेखित केले. यंदाचाही अंक परिपूर्ण व दर्जेदार झाल्याची पावती त्यांनी किल्ले रायगडच्या टीमला दिली. दर्जेदार साहित्यातूनच उत्कृष्ट अंकांची निर्मिती होत असते. त्या परंपरेला वृद्धिंगत आणि टिकवून ठेवण्यासाठी किल्ले रायगडच्या संपादकीय टीमने घेतलेली अपार मेहनत या अंकातून स्पष्ट जाणवते, असे मत लोकनेते ठाकूर यांनी व्यक्त केले. स्वर्गीय ल. पा. वालेकर हे पत्रकारिता क्षेत्रातील आधारस्तंभ होते, त्यांचा वारसा पुढे चालविण्याचे काम त्यांचे कुटुंबीय करीत आहेत असे सांगतानाच किल्ले रायगड साहित्यिकांची परंपरा महाराष्ट्रभर मांडण्याचे काम करीत असल्याचे गौरवोदगारही त्यांनी यावेळी काढले.
या विशेषांकामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि समकालीन विषयांवर विविध मान्यवर लेखकांचे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. दरवर्षीप्रमाणेच यंदाचा अंकही वाचकांना विचारप्रवृत्त, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरणार आहे, असा विश्वास किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांनी व्यक्त केला.

## खासदार तटकरे यांची विकासकामांची घोडदौड सुरु



**मुरुड प्रतिनिधी ।**
खासदार सुनील तटकरे यांनी जिल्हा नियोजन समितीमार्फत मुरुड तालुक्याच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी २ कोटी ८२ लाख रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह संचारला आहे.
ग्रामीण भागाचा विकास आणि खेडी समृद्ध करणे.
आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये पक्षाला याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.
सुतारवाडी येथे खासदार तटकरे यांनी निधीच्या मंजुरीचे पत्र राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, मनोज भगत, मंगेश दांडेकर यांच्यासह प्रमुख मान्यवरांना सुपूर्द केले.
चिंचघर डॅम रस्ता, तेलवडे अंतर्गत रस्ता, काकलघर रस्ता, मजगाव, बारशीव स्मशानभूमी रस्ता, कोर्लई आणि वावे येथील रस्ते या निधीतून विकसित होणार आहेत.
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मनोज भगत यांनी याबद्दल तटकरे साहेब यांचे विशेष आभार मानले असून, यामुळे ग्रामीण भागाचा विकास वेगाने होईल, अशी आशा व्यक्त केली आहे.

## शिवसेनाच्या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा धडाका

**महाड प्रतिनिधी ।**
महाड तालुक्यातील दासगाव खाडी पट्ट्यात गेले अनेक वर्ष विकास कामांचा धडाका सुरूच असून खाडी पट्टा हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून समजला जातो याच बालेकिल्ल्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पक्ष प्रवेशाचा धडाका पाहायला मिळाला शिवसेनेने विकास कामे न केल्याने ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाण्याचा निर्णय घेतला आणि याच अनुषंगाने खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत दाभोळ खलाटी व प्पर तुडील आदे ग्रामस्थांनी शिवसेनेला कंटाळून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला या प्रवेशाने येणाऱ्या आगामी निवडणुका जिल्हा परिषद व पंचायत समिती याला फटका पडणार असल्याचे दिसत आहे

## फेक पार्सल कॉलपासून सावध राहा

**भाईंदर, दि. २० : प्रतिनिधी**

फेक पार्सल कॉलपासून सावध राहण्याचे आवाहन सायबर पोलिसांच्या मार्फत करण्यात आले आहे.

सध्या "पार्सल स्कॅम" प्रकारचे सायबर फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत.फसवणूक करणारे स्वतःला कस्टम अधिकारी, कुरिअर एजंट किंवा पोलिस अधिकारी म्हणून ओळखवतात आणि तुमचं पार्सल संशयास्पद आहे", त्यात ड्रग्ज आढळले आहेत किंवा तुमच्यावर कारवाई होईल असे सांगण्यात येते.अशा फेक कॉलद्वारे ते सर्व सामान्य लोकांना घाबरवून आधार क्रमांक, बँक डिटेल्स किंवा OTP मागतात किंवा व्हिडिओ कॉलवर कागदपत्र दाखवण्यास सांगतात.त्याना एकदा माहिती मिळाल्यानंतर त्या व्यक्तीच्या खात्यातील पैसे लंपास करत फ्रॉड करतात.त्यामुळे अश्या फेक फ्रॉड कॉलपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही कॉलवर विश्वास ठेऊ नका. आपला आधार क्रमांक, OTP, बँक माहिती कोणालाही देऊ नका. कुरिअर कंपनी किंवा कस्टम विभाग कधीही अशा माहितीची मागणी करत नाही. संशयास्पद कॉल आल्यास त्वरित पोलीस ठाणे किंवा सायबर हेल्पलाइन शी संपर्क साधावा असे सांगण्यात आले आहे.

## कार्यकर्त्यांच्या बळावर मोखाडा पंचायत समितीवर सभापती भाजपाचाच उपजिल्हाध्यक्ष संतोष चोथे यांचा विश्वास

**मोखाडा, दि. २० : प्रतिनिधी**

काही महिन्यावर येऊन ठेपलेल्या पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका याच अनुषंगाने तालुक्यातील सायदे येथे तालुका अध्यक्ष मिलिंद झोले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत भाजपने तालुक्यातील सर्वच बूथ कमिटीचे कार्यकर्ते बोलवून एक ऊर्जा कार्यकर्त्यांमध्ये निर्माण व्हावी आणि त्याच ऊर्जेने काम करावे आणि पंचायत समितीवर सभापती भाजपचा व्हावा पण तो कार्यकर्त्यांच्या मनातला असे यावेळी जिल्हा उपाध्यक्ष संतोष चोथे यांनी सांगितले

तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितलं की कार्यकर्ता म्हणजे पक्षाचा जीव असतो आणि पक्ष वाचवायचा असेल तर पक्षातील कार्यकर्ता जगला पाहिजे आणि कार्यकर्त्यांच्याच बळावर आम्ही निवडणूक लढवत असतो पण ह्या वेळेस आम्ही मोखाडा पंचायत समितीवर आमच्या कार्यकर्त्यांचे आणि आमच्या पक्षाचे कमळ फुलवणार आणि शिवसेनेची पंचवीस वर्षाची परंपरा आम्ही मोडीत काढणार



आणि भाजपचा झेंडा पंचायत समिती मोखाडा येथे रोवणार असे निकम या कार्यकर्ता मेळाव्याप्रसंगी म्हणाले.

माझा वाढदिवस हे फक्त निमित्त असून त्याच अनुषंगाने हा कार्यकर्ता मेळावा आयोजित केला आहे जिल्हा परिषदेसाठी माझी वर्णी लागणार होती पण महिला आरक्षण पडले त्यामुळे आता मी माघार घेऊन माझ्या कोणत्याही महिला भगिनीला त्याच ऊर्जेने काम करून निवडून आणणार असे यावेळी तालुका अध्यक्ष मिलिंद झोले यांनी वाढदिवसा प्रसंगी सांगितलं.

यावेळी जिल्हा सरचिटणीस विठ्ठल चोथे, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप गाटे,बांधकाम सभापती नगरपंचायत प्रतीक पाघारे, ईश्वर गांगुर्डे, एकनाथ झुगरे, नरेंद्र पाटील, गणेश पाटील,बूथ कमिटी अध्यक्ष आणि कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्त्यावर अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई

**भाईंदर, दि. २० : प्रतिनिधी**

मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या रस्त्यावर अस्वछता करणाऱ्यांवर भाईंदर पश्चिमेला पालिका अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या मार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

भाईंदर पश्चिम परिसरात जे.पी. इन्फ्रास्ट्र.कं. मनपाच्या रस्त्यावर अस्वच्छता निर्माण केल्याने १५,०००/-रुपये व विशेष दंड २,५००/- असा ऐकून १७,५००/-रुपये दंड वसुल करत कारवाई करण्यात आली आहे. उप आयुक्त डॉ.सचिन बांगर व सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन,स्वच्छता निरीक्षक नितीन खैरे, रविंद्र पाटील, मनपा मुकादम राजाराम मनगटी , रोहीत चंडालिया, वैभव गायकवाड नंदु बंगारा , गणेश मुरुगण व सहकार्य यांच्या समवेत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

## ऐन दिवाळीत देखील घाटकोपर आणि शहापुर येथे १६३ निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान

**शहापुर, दि. २० : प्रतिनिधी**

सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांची शिकवणूक जीवनात उतरवत मानव सेवा हीच ईश्वर सेवा या भावनेचा हृदयस्पर्शी आदर्श प्रस्तुत करत संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून घाटकोपर आणि शहापुर (जि. ठाणे) येथे रविवारी, 19 ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या दोन रक्तदान शिबिरांमध्ये 163 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

शिवाजी हॉल, कामा लेन, एसएनडीटी कॉलेज जवळ, घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये मिशनच्या पंतनगर व विद्याविहार या दोन शाखांमधील निरंकारी श्रद्धालु भक्तांनी भाग घेतला आणि एकंदर 65 जणांनी रक्तदान केले.

या शिबिराला अनेक मान्यवर व्यक्तींनी सदिच्छा भेट दिली. त्यामध्ये मुख्यत: माजी नगरसेवक सर्वश्री परमेश्वर कदम आणि प्रविण छेडा यांचा समावेश होता. या प्रसंगी मान्यवरांनी मिशनच्या निष्काम भावनेने केल्या जाणाऱ्या विविध सामाजिक सेवांचे कौतुक केले. मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक श्री प्रकाश जोशी यांनी शिबिरामध्ये उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढविला. संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले मार्फत या शिबिरामध्ये रक्त संकलन करण्यात आले.



पंतनगर ब्रांच मुखी श्रीमती प्रभा सावर्डेकर व विद्याविहार ब्रांच मुखी श्री.जयबीर सिंह यांनी सेवादल आणि संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडले.

याच दिवशी संत निरंकारी सत्संग भवन, शहापुर (जि.ठाणे) या आदवासी भागामध्ये आयोजित रक्तदान शिबिरामध्ये एकंदर 98 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले ज्यामध्ये 86 पुरुष व 12 महिला रक्तदात्यांचा समावेश होता. या रक्तदान शिबिरामध्ये संत निरंकारी रक्तपेढी व जे.जे. महानगर रक्तपेढी यांचेकडून रक्त संकलन करण्यात आले. मिशनच्या शहापुर, कसारा व वासिंद शाखांमधील निरंकारी भक्तांनी या शिबिरात भाग घेतला.

संत निरंकारी मंडळाच्या कल्याण विभागाचे सेक्टर संयोजक श्री.जगन्नाथ म्हात्रे यांच्या उपस्थितित प्रभुनामाचे स्मरण करुन या शिबिराला सुरवात करण्यात आली. या शिबिराला अनेक मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. त्यामध्ये प्रामुख्याने शिवसेना शहापुर तालुका अध्यक्ष प्रकाश वेखंडे शिवसेना तालुका संपर्क प्रमुख अरुण कासारे यांच्यासह सामाजिक एवं राजकीय क्षेत्राामध्ये कार्य करणाऱ्या अनेक मान्यवर व्यक्तींचा समावेश होता. सर्व मान्यवर व्यक्तीनी मिशनच्या मानवतावादी कार्याची प्रशंसा केली.

## श्री वज्रयोगिनी आई वज्रेश्वरी देवी पालखी उत्सवाचा मान पालघर जिल्ह्यातील डोंगरपाडा (प्रांत विरार) गावास प्रदान

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

इ.स १७३९ ऐतिहासिक वसई विजयानंतर उत्तर कोकणातील गडकिल्ल्यांवर, गावागावांत मराठमोळे सण उत्सव पुन्हा नियमितपणे सुरू झाले. पोर्तुगीजांच्या धार्मिक व सांस्कृतिक अत्याचारास बळी पडलेल्या देवदेवतांची व पौराणिक मंदिराची पुन्हा उभारणी करण्यात आली. गावागावांतून देवतांची पालखी मिरवणूक, गोंधळ उत्सव इत्यादी परंपरा पुढील शंभर वर्षे सुरू राहिल्या. १८ व्या शतकात महाराष्ट्र प्रांताच्या राजकारणात शिरकाव केलेल्या ब्रिटिश सरकारने सर्व सण, उत्सव, समारंभावर बंदी आणली. यातच अनेक गडकिल्ले, ऐतिहासिक मंदिरे यांवर जाण्यासाठी असणारे मार्गच बंद उध्वस्त करण्यात आले. पुढील १५० वर्षे गडकिल्ल्यांच्या पालखी सोहळ्याचा खेळखंडोबा होत पालखी सोहळे बंद होण्याच्या मार्गावर लागले. पुन्हा भारत देशास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ऐतिहासिक कागदपत्रे नोंदीचे संशोधन मागे पडले व पाश्चात्य संस्कृतीचे नवीन वादळ समोर आल्याने पालखी उत्सवाला वाली उरला नाही. आज महाराष्ट्रात काही मोजक्याच गडकोटांवर पालखी सोहळा, ऐतिहासिक विजयोत्सव परंपरा सुरू आहेत. नरवीर चिमणाजी आप्पांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी इसवी सन १७३९ मध्ये पोर्तुगीज राजवटींचे समूळ उच्चाटन करून उत्तर कोकणात सर्व उत्सव, परंपरा पुन्हा सुरू केल्या. आज त्याच इतिहासाचे वंशज म्हणून या परंपरा, उत्सव जपण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन ठेपली आहे. किल्ले वसई मोहीम परिवार अंतर्गत २००३ सालापासून उत्तर कोकणातील दुर्गांवर ऐतिहासिक विजयोत्सव, देवतांचे पालखी सोहळा, दुर्गसंवर्धन, दुर्गसंशोधन इत्यादी परंपरा जपण्यासाठी अविरतपणे कष्ट घेण्यात येत



आहेत. याच मोहिमेचा एक भाग म्हणून २०२६ साली होणाऱ्या श्री वज्रयोगिनी आई वज्रेश्वरी देवी पालखी उत्सवाचा मान पालघर प्रांतातील डोंगरपाडा प्रांत विरार गावास प्रदान करण्यात आलेला आहे. सन १७३९ ते २०२६ हा पालखी उत्सवाचा कालखंड पाहता यंदा पालखी सोहळ्याचे २८७ वे वर्षे व केळवे माहीम विजयोत्सवाचे २८८ वे वर्षे आहे. वसई मोहिमेच्या रणसंग्रामात विरार मधील जीवधन डोंगर, अर्नाळा कोट, शिरगाव माडी, आगाशी माडी या ऐतिहासिक स्थळांच्या घेऱ्यात अनेक गावांचा सहभाग होतो. या विविध गावांतील शिलेदारांनी वसई मोहिमेत व नंतरच्या कालावधीत महत्वाचे योगदान दिले आहे. पालघर जिल्ह्यातील पाडा ही नामावली धारण केलेल्या गावांनी मराठेशाहीला धान्य रसद पुरवठा केलेला आहे. ऐतिहासिक कागदपत्रांचा मागोवा घेताना वसई विरार सोपारा प्रांतातील गावांनी मराठेशाहीच्या इतिहासात वेळोवेळी पुरवलेली सर्वोतोपरी रसद तपशीलवार नमूद आहे. यात भात उडीद इत्यादी धान्य नमूद आहे. विशेष म्हणजे येथील काही शेतांची नावे श्रीदत्त राऊत यांनी संशोधन करून पुढे आणली आहेत. यात माणिकपूर पाडा, आगाशी पाडा, डोंगर पाडा, बाहाद्दरपूर पाडा, निळे मोरे, गास अशी गावे आजही इतिहास जपत आहेत. या गावांत पिढ्यानपिढ्या पुजलेली स्थानिक ग्रामदैवते यांचा ज्ञात अज्ञात इतिहास आहे. विरार प्रांताचा भव्य इतिहास लक्षात घेऊन डोंगरपाडा गावाने पालखी सोहळ्याची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली आहे. १९ ऑक्टोबर २०२५ रविवार रोजी समस्त ग्रामस्थांच्या सोबत आयोजित केलेल्या मार्गदर्शन बैठकीत ऐतिहासिक पालखी सोहळ्याबाबत किल्ले वसई मोहीम प्रमुख व इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी स्थानिक मान्यवर ग्रामस्थ व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यंदा १० व ११ जानेवारी २०२६ रोजी श्री वज्रेश्वरी देवी पालखी उत्सव, केळवे माहीम विजय दिन उत्सव साजरा करण्यात येणार आहे. श्री वज्रेश्वरी देवी पालखी उत्सव व केळवे माहीम विजयोत्सव हा अमूल्य सांस्कृतिक ठेवा जपण्यासाठी समस्त भाविक व दुर्गमित्र सातत्याने कटिबद्ध आहेत.

## पाकिस्तानच्या तुरुंगातील मच्छीमारांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा

**पालघर, दि. २० : प्रतिनिधी**

पाकिस्तानच्या तुरुंगात असलेल्या पालघर जिल्ह्यातील १८ आदिवासी कुटुंबीयांना त्यांचा प्रलंबित मच्छीमारांच्या असलेला निधी तातडीने देण्यात यावा अशी मागणी शांततावादी कार्यकर्ते जतिन देसाई यांनी पालघर जिल्हाधिकारी निवेदनाद्वारे केली आहे. पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आदिवासी बांधव गुजरात राज्यात मासेमारी बोटीवर कामासाठी जातात यावेळी पाकिस्तानच्या सीमेमध्ये चुकून मासेमारी करताना या मच्छीमारी नोका सीमा ओलांडून पाकिस्तानी सैनिकांच्या तावडीत सापडल्यावर त्यांची रवानगी तिथल्या तुरुंगात होते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येते गेले तीन ते चार वर्षे हे आदिवासी पाकिस्तानच्या तुरुंगात आहेत त्यांची शिक्षा बऱ्याच आधी पूर्ण झाली आहे व त्यांचे राष्ट्रीयत्व सुद्धा भारत सरकारने स्पष्ट केले आहे. ते लवकरात लवकर सुटून त्यांच्या घरी परत येतील यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे अशी विनंती ही देसाई यांनी केली आहे ते पाकिस्तानच्या अटकेत असल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. मासेमारी करताना पकडल्या गेलेल्या मच्छीमारांना गुजरात राज्य ज्या दिवशी मच्छीमार पकडला गेला त्या दिवसापासून प्रतिदिन तीनशे रुपये त्यांच्या कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी देत असते गुजरात प्रमाणे महाराष्ट्र शासनाने सुद्धा मच्छीमार जेवढे दिवस पाकिस्तानच्या तुरुंगात असतील तेवढे दिवस प्रति दिन तीनशे रुपये त्यांच्या कुटुंबाला देण्याचा निर्णय २ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णयामार्फत घेण्यात आला आहे. त्या आदेशात काही त्रुटी असल्या तरी सरकारने जून व जुलै महिन्यात १६.२० लाख रुपयांचा पहिला हप्ता त्यांचा कुटुंबीयांना दिला. मे महिन्यापर्यंत ही रक्कम अधिक होत होती. मे पर्यंतचे ५१.२६ लाख रुपये व आतापर्यंतची अधिक रक्कम तात्काळ देण्यात यावी व गुजरात प्रमाणे त्यांना दर महिन्याला ही मदत मिळाली पाहिजे तसेच अटकेतील सर्व आदिवासी असल्याने त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी अशी ही मागणी देसाई यांनी केली आहे.

## नेपाळ मधून होते अमली पदार्थांची तस्करी

### दोन जणांना अटक, ३७ लाखांचे अमली पदार्थ जप्त

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

वसई विरार मध्ये पाकिस्तान पाठोपाठ आता नेपाळ येथील सीमेलगत भागातूनही अमली पदार्थांची तस्करी होत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. नुकताच वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून त्यांच्या कडून ३७ लाख ५१ हजार रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

८ ऑक्टोबरला वसई पूर्वेकडील खैरपाडा येथे एक इसम राहत्या घरातुन चरस अंमली पदार्थ विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी पथक तयार करून छापा टाकून इरफान सुलेमान खत्री (७०) याला ताब्यात घेतले त्याच्याकडे १ किलो ८८ ग्रॅम वजनाचा चरस अंमली पदार्थ, मोबाईल, रोख रक्कम असा एकुण १६ लाख ३७ हजार ८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर ही पोलिसांचा तपास सुरू होता.

याच दरम्यान मुख्य आरोपी तबरेज अमीन मियान खान (२५) याला ही पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून १ हजार ३८६ ग्रॅम वजनाचा चरस अंमली पदार्थ व १ हजार ५० ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ, रोख रक्कम, मोबाईल असा मुदेमाल जप्त केला. दोन्ही आरोपीताकडुन ३७ लाख ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ऍक्ट) कलम ८ (क), २०(ब), ए (क), २९, ८ (क), २०(ब), (ब) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.


अटक करण्यात आलेला तबरेज खान हा मूळचा बिहार राज्यातील चंपारण जिल्ह्यातील आमदोई या गावातील आहे. नेपाळ ची सीमा त्याच्या गावापासून अगदी काही अंतरावर आहे. तेथील ओळखीच्या तस्करांच्या माध्यमातून नेपाळ मध्ये जाऊन चरस आणि गांजा खरेदी करत होता. व त्यानंतर कपड्याच्या बॅगेत भरून रेल्वे मार्गाने भिवंडीत घेऊन येत असल्याचे तपासात समोर आले आहे.

वालीवचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप घुगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गोरक्षनाथ जैद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक विश्वासराव बाबर, फौजदार शैलेश पाटील, पोलीस हवालदार किरण म्हात्रे, आनंद मोरे, बाळु कुटे, विनायक राऊत, अनिकेत पाटील, सचिन लांडगे, केतन गोडसे, नागनाथ केंद्रे यांनी केली आहे

## नायगाव उड्डाण पुलाच्या उंची मर्यादा कमानी तुटल्या, अवजड वाहनांची चलती सुरु

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलावरून अवजड वाहनांनी वाहतूक करू नये यासाठी उंची मर्यादा लोखंडी कमानी बसविल्या होत्या. मात्र वाहनांच्या धडकेत दोन्ही बाजूच्या कमानी तुटल्या आहेत त्यामुळे सर्रासपणे अवजड वाहनांची ये जा सुरू झाली आहे. नायगाव पूर्व व पश्चिमेचा परिसर शहराला जोडण्यासाठी उड्डाण पूल तयार करण्यात आला आहे. या पुल सद्यस्थितीत केवळ हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी असून अवजड वाहनांना या पुलावर बंदी घातली आहे. अवजड वाहने या पुलावरून जाऊ नये यासाठी पुलाच्या पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूने लोखंडी उंची मर्यादा कमानी बसविण्यात आल्या



आहेत. मात्र या दोन्ही बाजूच्या उंची मर्यादा कमानी वाहनांच्या धडकेत तुटल्या आहेत. त्यामुळे सहजरीत्या आता पूर्व पश्चिम अशी अवजड वाहनांची वाहतूक होऊ लागली आहे. अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे वळणाच्या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे अशी वाहने सुरू राहिल्यास पुलाला सुद्धा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे असे येथील नागरिकांनी सांगितले आहे. नुकताच एका टेम्पोच्या धडकेत पश्चिम भागातील लोखंडी कमान तुटली आहे. तुटलेली कमान वेळीच काढून न टाकल्याने ती धोकादायक स्थितीत आहे. यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. यापूर्वी सुद्धा चार ते पाच वेळा ही लोखंडी कमान कोसळण्याची घटना घडली होती.सातत्याने कमान कोसळत असल्याने ही कमान केवळ वेल्डिंग न करता पूर्ण कमानच नवीन करण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## वसई विरार महापालिकेच्या भंगार बसेस अजूनही कार्यरत प्रवासी जीव मुठीत घेऊन करतात प्रवास



**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

सन २०१२ साली सुरू झालेली वसई विरार शहर महानगरपालिकेची परिवहन सेवा जर्जर अवस्थेत सुरू आहे करदात्या नागरिकांकडून कराची स्वरूपात मोठ्या प्रमाणात पैसे घेऊ नये नागरिकांना सोयी सुविधा देण्यात पालिका प्रशासनाने हाय काय केल्याचा प्रत्यय ही सेवा पाहताना होतो. पालिकेच्या परिवहन विभागात १४७ बसेस असून त्यांच्या मार्फत ३६ मार्गावर ही सेवा दिली जात आहे. दररोज या बसेस मधून ६० ते ६५ हजार इतके प्रवासी जीव मुठीत घेऊन प्रवास करतात.

थोर प्रदूषणासह यातील काही जर्जर झालेल्या बसेस रस्त्यावरून धावताना कोसळून पडतील अशी स्थिती आहे. याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांना असतानाही अशा बसेस भंगारात जमा केल्या जात नाहीत.

वसई विरार शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेच्या परिवहन विभागाने ई बस सेवा पुरविण्यावर भर दिला आहे. पालिकेला आता पंतप्रधान अनुदान योजनेतून १०० ई बस सुरू करण्यात आल्या परंतु तरीही वसईच्या रस्त्यावर अशा भंगार बसेस प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून दिल्या जातात.

एखादा मोठा अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का असा सवाल वसईतील नागरिकांनी उपस्थित केला आहे. यापूर्वी वसई तालुक्यात एसटी मार्फत सेवा दिली जायची. ही सेवा बंद करून पालिकेची बससेवा सुरू करण्यात आली सुरुवातीला या सेवेचे मोठे कौतुक करण्यात आले . वेळापत्रक नसणे फेऱ्या रद्द होणे रात्री उशिरापर्यंत बस सेवा उपलब्ध नसणे यामुळे विशेषत: ग्रामीण भागामध्ये नागरिकांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या.

आता बहुतांश बसेस याच पद्धतीने तिरक्या होऊन धावत असतात यामुळे बस मध्ये बसलेल्या प्रवाशांसह रस्त्यावरून जाणाऱ्या अनेक वाहनधारक पादचारी यांच्याही जीवाला धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे अशा भंगार बसेस त्वरित बंद करण्याची मागणी केली जात आहे.

## भाईंदर येथे बसच्या चाकाखाली येऊन दीड वर्षाच्या चिमुकल्याचा बळी

**भाईंदर, दि. २० : प्रतिनिधी**

रस्त्यावर दुचाकी घसरल्याने बसच्या चाकाखाली येऊन दीड वर्षीय चिमुरड्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी नया



नगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. भाईंदरच्या गोल्डन नेस्ट परिसरात रविवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली. मिरा-भाईंदर रोडवर दीपक हॉस्पिटलहून भाईंदरच्या दिशेने सोहेल पठाण हे दुचाकीवरून प्रवास करत होते. त्यांच्या मागे मित्र मुस्तकीन सुजरा हा सोहेलचा सव्वा वर्षांचा मुलगा हातात घेऊन बसला होता.

दरम्यान, रस्त्यावर टाकण्यात आलेल्या खडीमुळे दुचाकी घसरली. त्यामुळे मुस्तकीनच्या हातातील मुलगा रस्त्याच्या कडेला फेकला गेला. त्याचवेळी बाजूने जाणाऱ्या बेस्ट बसच्या चाकाखाली तो आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. आता पर्यंत या मार्गावर मागील वर्षभरात अनेक जणांचा मृत्यू झाला आहे.

# बापू, आम्हाला माफ कराल ना?

बापू, यदा कदाचित स्वर्गातून तुम्ही पृथ्वीवर आलात, तर आम्हाला सगळ्यांना तुम्ही माफ कराच. कारण तुमचं नाव घेण्याची ज्यांची लायकी नाही, त्यांनी उठावं आणि तुमच्याबद्दल काहीही बोलावं. त्यामुळे आम्हालाच आमची लाज वाटते. मूर्खांच्या सानिध्यात राहणाऱ्यांना मूर्खच म्हटलं जातं, मग गाढवाच्या सानिध्यात राहणाऱ्यांना काय म्हणणार? सरकार मुझसे डरती है, दाऊद इब्राहिम मुझसे डरता है, असा दावा करणारा कुणीतरी विद्वान (?) सरकारच्या आशीर्वादाने काहीही बोलतो आणि सरकार त्याला संरक्षण देते, हेच या जनतेचं दुर्भाग्य समजावे लागेल. मी ह्यएन्काऊंटर होण्याच्या टप्प्यावर होतो, असं म्हणणाऱ्याचा खरोखरच 'एन्काऊंटर' झाला असता, तर आज महात्मा गांधींबद्दल इतके वाईट उद्गार कोणी काढलेच नसते. स्वतःचा डीएनए डाकूंच्या खानदानीतला असताना व त्याची कबुली खुलेआम दिल्यानंतर इतरांचा डीएनए तपासायची या विद्वानाला गरजच काय? महात्मा गांधींची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसे, धर्मवीर आनंद दिघे व एकनाथ शिंदे यांचा डीएनए सारखाच असल्याचा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मान्य आहे का? हे त्यांनी एकदा तरी जाहीर करावे. तसं जर नसेल तर कायद्याचं अगाध ज्ञान (?) असलेल्या गुणरत्न सदावर्ते नामक वैचारिक कफल्लकाला सरकार म्हणून शिंदे काय सजा देणार? कुणाची तुलना कुणाबरोबर करावी याची जर अक्कल नसेल तर सरकारने देखील अशा वैचारिक देवळाखोरांना का सांभाळावे? जो माणूस महात्मा गांधींच्या खुन्याला 'पंडित' उपाधी लावून बोलतो, ते भाजपला, संघाला मान्य जरी असले तरी एकनाथ शिंदेंना ते कसे काय मान्य आहे? त्याचा खुलासा त्यांनी केला नाही तर शिंदेंची सेना भाजपमध्ये विलीन करायला काहीही हरकत नाही.स्वर्गवासी आनंद दिघे नथुराम गोडसेला मानत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आनंद दिघे यांना मानतात. याचाच अर्थ या तिघांचाही डीएनए सारखाच आहे, असा दावा गुणरत्न सदावर्ते करतात. पण हा दावा शिंदेंनी अद्यापही खोडलेला नाही. नथुराम गोडसेंना मानणाऱ्या आनंद दिघेंचा आणि एकनाथ शिंदेंचा डीएनए एक असल्याचे सदावर्ते म्हणाले, तरीही कुणीच काहीही प्रतिक्रीया द्यायची नाही? महात्मा गांधींची हत्या करणाऱ्या व्यक्तीला पंडित असं ते कसं म्हणू शकता? पण याबाबत जेव्हा या सदावर्तेंना विचारण्यात येते, त्यावेळी त्यांच्याकडून आलेली उत्तरे डोक्याला हात लावणारीच असतात. दुर्लक्ष करावे तर समाजामध्ये चुकीचा संदेश जातो. त्यामुळे सरकारनेच एकदा या महाशयांचा योग्य तो 'बंदोबस्त' केला तर बरे होईल असे वाटते. अन्यथा अशा लोकांचा बंदोबस्त करणारी यंत्रणा समाजामध्ये असतेच. पण कुणीही कायदा हातात घेऊ नये अशी भूमिका सरकारची असते. एका बाजूला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घ्यायचे व दुसऱ्या बाजूला त्यांच्याच विचारांना तिलांजली द्यायची, असा वकील सरकारी आश्रयाने समाजामध्ये दुही माजवतो. पण सरकार काही करत नाही याचे शल्य जनतेमध्ये मात्र पोहोचले आहे.





गुणरत्न सदावर्ते हे महाराष्ट्रातील विधिज्ञ आहेत. महाराष्ट्र शासनाने २०१८ साली मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवगातंर्गत आरक्षण दिले होते.

मात्र मराठ्यांना दिलेले आरक्षण हे असंवैधानिक असल्याची याचिका त्यांनी सर्वोच्च न्यायालयात यशस्वीपणे लढवली. तेव्हापासून ते प्रकाश झोतात आले. अर्थात ही सर्व कामे त्यांच्याकडून करून घेतली जातात, त्याबद्दल सर्व माहिती मराठा आंदोलकांकडे आहे. सदावर्ते यांना पुढे करून अनेकांची बदनामीची मोहीम देखील सुरू झाली आहे.

परंतु ताळतंत्र नसलेल्या सदावर्तेंकडून एक दिवस महाराष्ट्रात उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही असे बोलले जाते. भारतीय राज्यघटनेवर पीएच.डी केलेले सदावर्ते ज्या पद्धतीने वर्तन करतात, त्यावरून त्या पीएच.डी बद्दलही चर्चा सुरू झाली आहे. मराठवाड्यातील रमेश पाटील नावाच्या एका कार्यकर्त्याने सदावर्तेंना त्यांच्याच भाषेत दिलेली उत्तरे समाज माध्यमांमध्ये सतत पसरत असतात. त्यावेळी जो काही संवाद आहे तो ऐकल्यावर सदावर्तेंचे 'स्टॅंडर्ड' लक्षात येते.



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

महात्मा गांधीं बद्दल सतत गरळ ओकणाऱ्या सदावर्तेंकडून नथुराम गोडसे याचे सतत कौतुक केले जाते. त्यामुळे एका विशिष्ट वर्गाचे ते लाडके बनले गेले आहे. परंतु त्यांच्या संगतीत असणाऱ्यांवर कधीही बुमरॅंग होऊ शकते असे त्यांचे वर्तन असते.

मुंबई एसटी बॅंकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत काही दिवसांपूर्वी झालेल्या गोंधळानंतर वकिल गुणरत्न सदावर्ते वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. सदावर्ते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटातील कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या वादाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता सदावर्ते यांनी महात्मा गांधी, नथूराम गोडसे, एकनाथ शिंदे व आनंद दिघे यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले आहे.

### गांधीजींची हत्या नेमकी का झाली?

महात्मा गांधी यांची हत्या अत्यंत क्लेशदायक असली तरी भारताबरोबर जगालाही त्यावेळी धक्का बसला होता. कारण संपूर्ण जगाच्या पाठीवर मानवतेचा, शांततेचा व अहिंसेचा मंत्र देणारे ते युगपुरुष ठरले होते. पण अविचारामुळे त्यांची हत्या झाली व त्याचे समर्थन दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांकडून सुरू झाले. महात्मा गांधींनी मुख्यतः अहिंसा, सर्वधर्म समभाव, आणि हिंदू-मुस्लीम एकता यांसारख्या धोरणांवर भर दिला होता. त्यांचे काही निर्णय, जसे की पाकिस्तानला आर्थिक मदत देणे किंवा मुस्लिमांसाठी अधिक सहानुभूती दाखवणे, हे काही हिंदू राष्ट्रवाद्यांना योग्य वाटले नाही. त्यांना वाटायचं की गांधींच्या धोरणांमुळे हिंदू समाजावर अन्याय होत आहे. या कारणांमुळे गोडसेने गांधींच्या हत्या केली आणि त्यामुळं काही लोकांना ते कृत्य योग्य वाटलं. महात्मा गांधींच्या धोरणांमध्ये अहिंसा आणि शांती यांना प्रामुख्याने स्थान होते, पण ते त्यांच्या काळातील हिंदू-मुस्लीम तणावांवर आणि भारताच्या विभागणीच्या प्रश्नांवर एकूणच वेगळ्या दृष्टिकोनातून पाहत होते. गोडसे आणि काही इतर राष्ट्रवादी नेते गांधींच्या या धोरणांवर नाराज होते, कारण त्यांना वाटायचं की गांधींनी हिंदू समाजाच्या हितांचा विचार कमी केला आणि मुस्लिमांसाठी जास्त सहानुभूती दाखवली. यामुळे काही लोकांना गोडसेचं कृत्य समजण्यास मदत झाली आणि त्या दृष्टीकोनातून ते कृत्य उचित वाटलं. पण गांधींना समजून घेण्यास अनेक जण कमी पडले. ज्यांना गांधी पूर्णपणे समजले, ते कधीही त्यांच्या हत्येचे समर्थन करणार नाही. येणारा काळ त्याचे उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही.

### सदावर्तेंना गांभीर्याने घेण्याची गरजच नाही

महात्मा गांधींच्या हत्येचे समर्थन नथुराम गोडसे आणि त्यांच्या काही साथीदारांनी केले होते, ज्यांनी गांधींच्या भारत फाळणीदरम्यान मुस्लिमांबद्दल असलेल्या भूमिकेमुळे असंतोष व्यक्त केला होता. हिंदू महासभा या राजकीय पक्षाचा सदस्य असलेल्या गोडसे आणि त्यांच्या साथीदारांनी गांधींच्या हत्येचा कट रचला होता. गांधींच्या हत्येचा निर्णय या सर्वांच्या विचारांवर आधारित होता आणि त्यांनीच हत्येचे समर्थन केले होते. महात्मा गांधींची हत्या ३० जानेवारी १९४८ रोजी वयाच्या ७८ व्या वर्षी बिर्ला हाऊस (आता गांधी स्मृती)च्या कंपाऊंडमध्ये झाली. त्यांचा मारेकरी नथुराम विनायक गोडसे, पुणे येथील हिंदू महासभा या राजकीय पक्षाचा सदस्य होता. फाळणी दरम्यान गांधींनी मुस्लिमांना महत्त्व दिले, याबद्दल गोडसे आणि त्यांच्या साथीदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती, जे त्यांच्या हत्येमागील एक प्रमुख कारण मानले जाते. अनेकदा त्यांना मारण्याचे प्रयत्न झाले होते. पण आता महात्मा गांधींची हत्या होऊन इतके वर्ष झाले तरी त्यांच्या मारेकऱ्यांना आदरार्थी संबोधले जाते. भारताचे पंतप्रधान जगभरात प्रवास करतात. परदेशात ज्या ज्या ठिकाणी महात्मा गांधींचा पुतळा असेल, तेथे ते नतमस्तक होतात. पण अलीकडच्या काळात त्यांच्याच विचारांची माणसे गांधीजींची हत्या करणाऱ्यांना देव मानू लागले. त्यामुळे समाजमन अस्वस्थ होत चालले आहे. गुणरत्न सदावर्ते यांना गांभीर्याने घेण्याची गरज नाही. तेवढी त्यांची लायकी पण नाही. पण म्हणतात ना 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो'.

सतत प्रसिद्धीच्या प्रकाश झोतात राहण्यासाठी ते नेहमी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना बोलावतात व नको त्या स्टाईलने बिभत्स आरडाओरड करतात. त्यांच्या पत्नी देखील त्यांना समर्थन करतानाचे विनोदी चित्र संपूर्ण महाराष्ट्र पाहत असतो. अनेकांना हसू फुटते. परंतु बोलण्याच्या ओघात सदावर्ते कोणत्याही दिशेला जातात. पण सदावर्तेंचे उद्योग फार काळ चालू शकणार नाही. एक ना एक दिवस त्याचा महाराष्ट्रात उद्रेक होईल, त्याचवेळी कदाचित सरकारला जाग येईल असे वाटते!

---

## एक कोटी झाडे लावणाऱ्या हिरोची कहाणी!

(कालच्या अंकावरून पुढे)

--------------------

पाय दुखावला पण हात तर काम करू शकतात ना! म्हणून रामय्याने घरात रोपं लावायचं काम चालू ठेवलं. त्याचं काम अजिबात थांबलं नाही.

एका व्यक्तीने आपल्या मुलाच्या लग्नाच्या निमित्ताने रामय्यांच्या कामासाठी मदत म्हणून ५००० रुपये देणगी स्वरूपात दिले. तर तेही रामय्याने वृक्ष लागवडीच्या कामात खर्च केले.

नसा-नसात निसर्ग प्रेम भरलेल्या ह्या रामय्याला लोकांनी सल्ले दिले की, तू लावलेली झाडे तू विकून पैसे मिळव तुला भरपूर पैसे मिळतील. तर रामय्या म्हणाले, या काळ्या आईच्या पोटातून जन्मणाऱ्या झाडांना मी विकण्यासाठी नाही लावलं.



उत्तरार्ध

या झाडांमुळे आपल्या सगळ्यांनाच फायदा होणार आहे. शुद्ध हवा, भरपूर पाऊस आणि पर्यावरणाचा समतोल राखला जाईल, म्हणून मी ही झाडं लावलीत.रामय्यांचे म्हणणे आहे की, निसर्ग आपण न मागता आपल्याला उपयोगी पडणाऱ्या सगळ्या झाडांची निर्मिती करतो. आपल्याला चांगली फळे फुले देतो. तर मग आपले कर्तव्य आहे की आपण निसर्गाचे रक्षण केलेच पाहिजे.

पुढे ते असेही म्हणतात की,तुम्ही तुमच्या मुलांना फक्त फळे खायला देऊ नका. त्यांना त्या झाडाचे रोप आणून द्या आणि लावायला सांगा. त्याची निगा राखायला शिकवा. म्हणजे मुले मोठी झाल्यानंतर त्यांना त्याच झाडाची गोड फळे चाखता येतील. त्यातला आनंद काही वेगळाच असेल.

आज जी लहान मुलं आहेत तीच उद्याचे नागरिक होणार आहेत. मग लहानपणीच त्यांना निसगार्चे ज्ञान द्या म्हणजे मोठेपणी त्यांना आनंद मिळेल. निसर्गाबद्दल प्रेम वाटेल.

ते म्हणाले होते, मी सरकारलाच सांगणार आहे की तुम्ही सरकारी जमिनीत रक्तचंदनाची झाडे लावून ती मोठी झाल्यावर सरकारतर्फेच लिलावाच्या पद्धतीने विका. म्हणजे तुम्हाला भरपूर पैसे मिळतील.

ही रामय्यांची सूचना सरकारने मान्य देखील केली. रामय्याची आपल्या कामावर निष्ठा आहे. त्यांनी केलेल्या कामाचे फळ आता सगळीकडून त्यांना मिळायला लागले आहे. लोक आता त्यांच्या कामाची वाहवा करायला लागले आहेत. त्यांना आपोआपच नावलौकिक मिळायला लागला आहे.

काही राज्यस्तरीय सरकारी पुरस्कारांसोबत त्यांना २०१७ साली भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार ही मिळाला आहे.प्रसिद्धीची आस नसलेल्या, धनाची लालसा नसलेल्या, पण निसर्गाची समृद्धी सतत वाढत राहो या उत्कट इच्छेने काम करणाऱ्या या अवलीयाला शतशः प्रणाम..!

■ ■ ■

---

## दीपोत्सव स्नेहपूर्ण आनंदाचा !

आधुनिक जीवनशैली मुळे व्यस्त झालेली माणसं ही स्वतःच्या संस्कृतीला पर्यायी मार्ग शोधीत सण उत्सव साजरा करताना पूर्वजांनी लावलेली परंपरा यामागचा शास्त्रीय दृष्टिकोन तसेच महत्त्व विसरून सण साजरा करतांना ट्रेंड प्रमाणे बदलत उत्सव साजरा करतो.

ही भारतीय संस्कृती विसरून पाश्चात्य विचारांचे अनुकरण करणे कितपत योग्य आहे? हा प्रत्येकाचा प्रश्न जरी असला तरी दिवाळी सारख्या प्रकाशमय पर्वावर एकजूट होऊन त्यातून आनंदाची देवाणघेवाण, एकोपा, सहयोग, प्रेम, वैचारिक फराळ दिवाळी अंकाचं, भेटीघाटीचा उत्साह, सुट्टीचा आनंद, भावंडात असणार प्रेम,खरेदीचा आनंद, ही जगण्याची मज्जा भारतीय संस्कृती आपणास देते.

दिवाळी म्हटलं की आनंद ,उत्साह, ऊर्जा, उमेद, अन दीपोत्सव सर्वत्र आनंद खाण्याची चंगळ , नवीन कपडे खरेदी, व बरच काही ...ज्या सणाची आपण वर्षभर वाट पाहतो, काहीही नवीन योजल किंवा घ्यायचं असेल वर्षभर तरी... आपण दिवाळीतघेऊ म्हणून ती वेळ हाणून नेतो ...थोडक्यांत आपल्या इच्छा पूर्ण करणारा सण म्हणजे दिवाळी....

पूर्वी दिवाळी ची वाट पाहणारी आपण सर्व नियोजन करून दिवाळी साजरी करण्यासाठी वेळ, परिश्रम, यांचा वाटा असायचा. दिवाळीपूर्वी घरातील साफसफाई करतांना अडगळीत पडलेल्या वस्तू आठवणी सांगून व्यवस्थित ठेवत असत. तेव्हा कमी मिळकतीत सर्वांच्या गरजा पूर्ण करून उरलेल्या पैशाची जी बचत व्हायची ती साठवून वर्षातील दिवाळी व्हायची. मोजक्या पैशात घराची साफसफाई, रंगरंगोटी, कपडे, वस्तू, किराणा सजावटीचे सामान खरेदीची लगबग व्हायची.

कमी पैसा कमी गरजा व काटकसर नियोजनातून मिळालेली प्रत्येक वस्तु आनंद देणारी होती. आज पैसा आहे पण त्या काटकसर दिवाळीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही, खर्चाचा खरा हिशोब ठेवणारी ती रुपयांची किंमत ह्या ऑनलाईन जमान्यात हेत नाही.

खिशात दमडी असल्याशिवाय काही घेण्याची हिम्मत नव्हती. आपण जाणीवपूर्वक रांगोळी पासून तर तोरण, दिवे, झाडू पर्यन्त प्रत्येक गोष्ट ही ऑनलाईन खरेदीतून विकतघेतो आपल्या आसपास ची काही मंडळी छोट्या छोट्या , घरगुती वापरातील गोष्टी फुटपाथ वर विक्रीसाठी बसून सकाळ पासून तर सायंकाळ पर्यंत दोन पैसे कमवून दोन वेळचे पोट भरण्यासाठी धडपड करीत असतात त्यांना काही श्रीमंत होण्याची ओढ नसते फक्त मिळालेली मिळकत व धडपड ही जगण्याचा उद्देश असते



आता ह्या धावपळीच्या जीवनात वेळेअभावी घरातील साफसफाई ही कामवाली बाई पासून सुरू होऊनकर्त्या घराची मालकीण ऑनलाइन शॉपिंगच्या प्लॅटफर्मवर खरेदी साठी आपला नसणारा वेळ ह्या मोबाईलवर घालवून ऑफरच्या विळख्यात फसलेली असते.



उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्ण विहार, नागपूर
9518571138
ikhe.soil@gmail.com

घरात पूर्वी दिवाळी साठी खास घरगुती उटणे तयार करणारी मंडळी आता ऑनलाईन बाजार खरेदी करून घेतात कपडे दिवे, किराणा, सजावट साहित्य, फराळ हे सर्व ऑनलाईन खरेदी करणारे आपण सर्व कधी काळी प्रत्येकाच्या आवडी निवडीप्रमाणे चव जपणारे घरगुती पदार्थ तयार करून प्रेमाने एकमेकांच्या घरी देवाणघेवाण करून आनंदाचा फराळ वर्षभराच्या स्नेहासाठी पुरेसा असतो तोही आता बाजारातील मिठाईच्या बॉक्स ने दुरावला आहे

दिवाळीचा आनंद व्यक्त करताना परिभाषा ही बदलल्या पूर्वी मातीची पणती व त्यांची झगमगाट ही मोहून टाकायची एक पणती जी कुंभाराच्या तालमीत घडलेली व प्रत्येकाच्या आयुष्यात तेजोमय करणारी ती पणती तिमिरातुनी तेजाकडे नेणारी आज कृत्रिम, मेणाच्या, शोभेच्या, चायनिज वस्तूमुळे दबली आहे सर्वत्र झगमगाट फक्त चायनीज लायटिंग व कृत्रिम दिव्यांचाच असतो . तसेच तोरण व फुलेही कृत्रिम, रांगोळी ही स्टिकरचीच, फटाक्यांची आतिषबाजी ही निव्वळ देखाव्याचा भाग. श्रीमंतीचें प्रदर्शन करणारे मात्र झेंडूची फुले, तोरण, रांगोळी, पणत्या, लाह्या बत्ताशे, झाडू , आकाशदिवे घेतांना फुटपाथवर भाव करून वस्तु कवडीमोल मिळाव्यात यासाठी बोली लावतात . हीच का ती श्रीमंती....! ऑनलाईन घरेदी करतांना कुठल्याही मर्यादा न पाळता वस्तु विकत घेऊन स्थनिक विक्रेते छोटे दुकानदार यांना डावलून आपला उद्देश सार्थ जरी करित असलो तरी सामाजिक विषमता निर्माण होत आहे.

दिवाळी प्रकाशपर्व साजरे करताना वर्षभरात जोडलेली माणसं मग रोजचा भाजीवाला पासून तर कचरेवाला पर्यंत, दुकानदार, सहकारी, मित्र, नातेवाईक यांच्य पर्यंत स्नेह वाढविणारा आनंदाचे , प्रेमाचे, सहयोगाचे नाते जोळसणारा खरा आनंद उत्सव आहे.

**दिवाळी साजरा करणारा संकल्प :-**

घरगुती सजावट साहित्य हे फुटपाथवर बसणाऱ्या छोट्या विक्रेत्याकडून घ्यावीत .

आनंदाचा दीप तळागाळातील गरजू लोकांसोबत लावून त्यांना प्रेमाचा सहवास, फराळ, गरजेच्या वस्तु देऊन साजरा करूया.

एक दिवा हा आपल्या अवतीभवती असणाऱ्या अनाथ अपंग, आश्रमात, वृद्धाश्रम येथे भेट देऊन मदतीचा नंदादीप लावून उजळूया.

फटाके फोडण्यापेक्षा त्या पैशाचे गरजु लोकांना मदत करून आनंद प्रकाशित करा.

फराळ विकत घेतांना गृह उद्योग यांच्या कडून घ्यावा म्हणजे बचतगट, यांचे सक्षमीकरण होईल व जगण्याची उमेद निर्माण होईल इथे ऑफरचा खेळ नसला तरी पैसे कमविण्यासाठी आपण त्यांना ऑफर देऊ शकू.

जुनी कपडे ,साहित्य, पुस्तके हे रद्दीत विकल्या पेक्षा गरजू होतकरू, लोकांना मोफत द्या.

मातीचे दिवे, कागदी आकाश कंदील हे सर्व स्थानिक बाजारातील लहान विक्रेते यांच्या कडून घेतांना अपंग व्यक्तीच्या कडून खरेदीला प्राधान्य द्या खरेदी मॉल शॉपिंग प्लॅटफॉर्म वरून करण्या ऐवजी विविध दुकानातून माल घेऊन त्यांच्या हातांना काम द्यावे.

लख्ख प्रकाश करतांना एक तरी दिवा अंधकार असणाऱ्या जागेवर लाऊन आशेचा किरण प्रज्वलित करा.

सफाई कर्मी, घरातील कामवाली ,गार्ड यांनाही आपल्या आनंदात सामाहून घ्या त्यांना या निमित्ताने यथाशक्ती भेटवस्तू, मदत, सन्मान देऊन आनंद द्विगुणीत करा.

व्यर्थ खचार्चा उधळपट्टी न करता ती पुंजी भविष्यातील नियोजनासाठी ठेवा .

विविध दुकानातून वस्थु खरेदी करताना भाव न करता फुटपाथवर बसणारी मंडळींच्या आनंदाचे भागीदार व्हा.

दोन शब्द प्रेमाचे अन आपुलकीचे देणे हेही प्रकाशमय पवार्ची नांदीच आहे.

दिपपर्व साजरा करताना कुणाला न दुखवता, प्रत्येकाला आपल्या आनंदात सामील करा म्हणजेच खरा स्नेहपूर्ण दीपोत्सव! शुभ दीपावली!

■ ■ ■

---

## वाचक लिहितात

### : भाऊबीज : काळानुसार दिलेली ओवाळणी

कार्तिक शुक्ल द्वितीयेला भाऊबीज साजरी केली जाते. भाऊबहिणीच्या प्रेमळ, निर्मळ नात्याचे प्रतीक म्हणजे भाऊबीज!

या दिवशी मृत्यूची देवता यम आपल्या बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला; म्हणून या दिवसाला यमद्वितीया असेही म्हटले जाते. या दिवशी बहीण भावाला ओवाळते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. भाऊ, बहिणीचे रक्षण करण्याचे वचन देतो. तसेच ओवाळणी म्हणून भेटवस्तू, कपडे, अलंकार देतो.

सहजच मनात विचार येतो की, अशा भेटवस्तूंसोबतच जर भावाने बहिणीला आजच्या काळानुसार आवश्यक असणारी ओवाळणी दिली, तर नक्कीच तिला त्याचा खरा लाभ होईल. कारण आजची स्थिती पाहता कोणतीही स्त्री सुरक्षित नाही. दररोज कुठे ना कुठे स्त्रियांवर बलात्कार, अत्याचार, एकतर्फी प्रेमातून होणारी हत्या अशा घटना घडतच आहेत.

अशा परिस्थितीत भावाचे कर्तव्य आहे की त्याने बहिणीचे रक्षण करावे. तसेच स्वतःचे रक्षण करण्यासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे, याचे महत्त्व बहिणीला पटवून द्यावे. आज हिंदू तरुणींवरील अजून एक संकट म्हणजे लव्ह जिहाद! लव्ह जिहादच्या जाळ्यात न अडकण्यासाठी धर्मशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर लव्ह जिहादविरुद्ध कायदा बनवावा याकरिता महाराष्ट्रात नवरात्रोत्सवाच्या काळात हिंदू जनजागृती समितीने स्वाक्षरी अभियान चालवले. हा अतिशय स्तुत्य उपक्रम होता, ज्याद्वारे व्यापक प्रमाणात समाजात जागृती निर्माण झाली. भाऊबीजेच्या निमित्ताने बहिणीला स्वसंरक्षणार्थ सिद्ध होण्यासाठी प्रोत्साहित व प्रशिक्षित करणे, हीच खऱ्या अर्थाने काळानुसार दिलेली ओवाळणी ठरेल!

■ ॲड. सौ. वैशाली परांजपे, नागपूर.

### लक्ष्मीपूजनाचे महत्व

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी वर्षभरातील जमाखचार्चा हिशेब केला जातो. वर्षभरातील हा जमाखर्चाचा हिशोब लक्ष्मीसमोर ठेवायचा असतो. आपल्या वर्षभरातील जमाखर्चाचा लक्ष्मीसमोर ठेवून प्रार्थना करायची असते की, हे माते तुझ्या कृपेने आणि आशीवार्दाने मिळालेल्या या धनाचा उपयोग आमच्याकडून सत्कायार्साठी आणि ईश्वरीकायार्साठी होऊ देत. आम्ही जो हिशेब तुज्यासमोर ठेवत आहोत त्याला तुझी संमती असू देत. आम्ही तुज्यापासून काहीही लपवून ठेवू शकत नाही. आम्ही जर तुझा योग्य वापर केला नाही तर तू आमच्या जवळून निघून जाशील. याची जाणीव सतत आम्हाला राहू देत. लक्ष्मीदेवीला अशा प्रकारची प्रार्थना केल्यामुळे आपल्यामधील कर्तेपणाची भावना नष्ट होते आपल्याकडे असलेल्या धनामुळे आपल्याला त्याचा उन्मद किंवा गर्व न होता आपल्यामध्ये विनयशीलता येते.


■ शंकर पवार, सातारा.

---

## स्वयंपाक करताना कोणते तेल वापरणे आरोग्यासाठी चांगले?

सणासुदीच्या काळात, किंवा रोजचा स्वयंपाक बनवण्यासाठी देखील एक गोष्ट आहे ज्याशिवाय जेवण तयार होऊ शकत नाही. ते म्हणजे तेल. भाजी बनवण्यासाठी, काही तळण्यासाठी तेल हे लागतेच.

बहुतेक घरांमध्ये स्वयंपाकासाठी मोहरीचे तेल किंवा रिफाइंड डालडा तेल वापरले जाते. तथापि, हे आरोग्यासाठी खूप हानिकारक मानले जाते. मग आरोग्यासाठी चांगले असणारे स्वयंपाकाचे तेल कोणते जे कोणताही विपरीत परिणाम करत नाही. या तेलांमध्ये बनवलेले अन्न खाल्ल्याने तुमचे हृदय आणि मनही निरोगी राहील आणि वजन वाढण्यासही प्रतिबंध होईल. स्वयंपाकासाठी कोणते तेल वापरले पाहिजेत हे जाणून घेऊयात.





प्रसिद्ध गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्टांच्या म्हणण्यानुसार तुम्ही योग्य स्वयंपाक तेल निवडले तर तुमच्या आरोग्याचे कधीही नुकसान होणार नाही. खरं तर, ते तुमचे आरोग्य सुधारेल आणि तुम्हाला तंदुरुस्त ठेवेल.

**नारळाचे तेल** : आपण वर्षानुवर्षे नारळाचे तेल वापरत आहोत, पण तुम्ही कधी ते स्वयंपाकासाठी वापरले आहे का? या तेलात बनवलेले अन्न लवकर खराब होत नाही किंवा जळत नाही. ते कमी तेलकट देखील मानले जाते. नारळाचे तेल शरीराला ऊर्जा प्रदान करते.

**शेंगदाणा तेल** : स्वयंपाकासाठी शेंगदाण्याचे तेल देखील वापरू शकता. शेंगदाण्याच्या तेलात आरोग्यासाठी उपयुक्त असे अनेक पोषक घटक असतात. शिवाय, त्यात शिजवलेले अन्न खराब होत नाही.

**तूप** : शतकानुशतके भारतीय स्वयंपाकघरांमध्ये तूप वापरले जात आहे. तथापि, तूप महाग आहे, म्हणून लोक बहुतेकदा तेल किंवा रिफाइंड तेलाचा वापर करतात. तुम्ही तूप वापरून देखील स्वयंपाक करू शकता. पण नक्कीच प्रमाणातच वापर करा.

**एवोकॅडो तेल** : ॲव्होकॅडो तेल हे देखील सर्वोत्तम तेल मानले जाते. ॲव्होकॅडो तेलाला सुगंध असतो आणि त्यात तयार केलेले पदार्थ चांगले टिकतात .तसेच त्यात तळलेले पदार्थ खाल्ल्याने त्रास होत नाही

दरम्यान या तेलापैकी कोणतेही तेल वापरत असाल तरी ते प्रमाणातच वापर करा. कारण कोणतीही गोष्ट अतिप्रमाणात खाणे हानिकारकच असते. त्यामुळे प्रमाणात वापर केल्यास त्याचे आरोग्याला फायदे नक्की मिळतात.

■ ■ ■

---

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## दीपोत्सव...!

मानवतेप्रती हृदयात
व्हावी संवेदनांची निर्मिती
तर भुतलावर नांदेल
भौ सुख समृद्धी शांती..

अज्ञानच तर आहे
मानवी समस्यांचे मुळ
दिपोत्सवाने व्हावा
त्याचा विनाश समुळ ...

अडल्या नडलेल्याच्या
जो येतो कामी
त्यावर कृपा करते
माता महालक्ष्मी ..

# दिवाळी पुराण आणि इतिहास



**दिवाळी** संदर्भात असलेल्या गमतीदार माहितीने पुराणात तसेच इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच हा सण एखाद्या विशिष्ट समूहाचा न राहता संपूर्ण राष्ट्राचा बनला आहे. दिवाळीविषयी काही रंगतदार व गमतीदार माहिती खालीलप्रमाणे:–

- प्रभू राम रावणाचा पराभव केल्यानंतर अयोध्येला परतत असताना त्यांच्या वाटेवर लोकांनी दिवे लावून स्वागत केल्याचे त्रेतायुगात सांगितले आहे.
- श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध केल्यानंतर गोकुळवासियांनी आपला आनंद दिवे लावून व्यक्त केल्याची कथा प्रचलित आहे.
- देवीने महाकालीचे रूप धारण करून राक्षसांचा वध केला होता. त्याचा वध केल्यानंतरही महाकालीचा क्रोध कमी झाला नव्हता, तेव्हा भगवान शंकराने स्वत: देवीच्या चरणी लोटांगण घातले. शंकराच्या शरीर स्पर्शाने महाकालीचा क्रोध शांत झाला. त्याची आठवण म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाते. या दिवशी तिच्या रौद्ररूपाची पूजा करण्याची प्रथा आहे.
- बळीराजाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर त्रैलोक्यावर विजय मिळविला होता. या विजयाने भयभीत झालेल्या देवांनी भगवान विष्णूची प्रार्थना केली. त्यांची प्रार्थना ऐकून विष्णूने वामन रूप धारण करून बळी राजाला तीन पायांत दान मागितले. विष्णूने तीन पायाने त्रैलोक्य घेतले. बळीच्या दानशूरपणामुळे प्रसन्न झालेल्या विष्णूने त्याला पाताळाचे राज्य देवून भू-लोकवासी त्याच्या आठवणीनिमित्त प्रत्येक वर्षी दिवाळी साजरी करतील असे आश्वासन दिले.
- शिखांचे सहावे गुरू हरगोविंदसिंग बादशाह जहांगीरच्या कैदेतुन सुटून कार्तिक अमावस्येच्या दिवशी अमृतसरला आले होते.
- दिवाळीच्या एक दिवस अगोदर म्हणजे चतुर्थीला श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला होता. यामुळे आनंदी झालेल्या गोकुळवासियांनी दुसऱ्या दिवशी अमावस्येला दिवे लावून आनंद साजरा केला होता.
- इसवी सन पूर्व ५०० वर्षापूर्वी मोहेंजोदडो येथे सापडलेल्या अवशेषांमध्ये एका मातीच्या मूर्तीनुसार त्याकाळी दिवाळी साजरी केली जात असल्याचे समजते. मूर्तीच्या दोन्ही बाजूला दिवे जळताना दिसून येत होते.
- इसवी सन पूर्व २५०० वर्षांपूर्वी गौतम बुद्धांच्या अनुयायांनी त्यांच्या स्वागतासाठी लाखो दिवे लावून दिवाळी साजरी केली होती.
- सम्राट विक्रमादित्याचा राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्याच दिवशी दिवे लावून जनतेने आनंद साजरा केला होता.
- इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील कौटिल्य अर्थशास्त्रानुसार कार्तिक अमावस्येच्या दिवशी मंदिरात आणि घाटावर (नदी किनारी) मोठ्या प्रमाणात दिवे लावले जात असल्याचे सांगितले आहे.
- अमृतसर येथील सुवर्णमंदिराचे बांधकाम दिवाळीच्या दिवशी सुरू झाले होते.
- जैन धर्माचे चोविसावे तीर्थकर भगवान महावीर यांनी दिवाळीच्या दिवशीच बिहारमधील पावापुरी येथे आपल्या शरीराचा त्याग केला होता. 'महावीर सवंत' त्यांच्या दुसऱ्या दिवशी सुरू होते. त्यामुळे अनेक प्रांतातील लोक याला नवीन वर्षाची सुरवात मानतात. प्राचीन जैन ग्रंथात दीपोत्सवाचे वर्णन आहे. महावीर निर्वाणामुळे जी अंर्तज्योती कायमची विझून गेली होती, तिची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण बर्हिज्योतीचे प्रतीक म्हणून दिवे लावू या असे कल्पसूत्रात सांगितले आहे.

१३. पंजाबमध्ये जन्मलेल्या स्वामी रामतीर्थ आणि महाप्रयाण या दोघांचा जन्म दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्यांनी दिवाळीच्या दिवशी गंगाकिनारी स्नान करताना 'ओम' म्हणून समाधी घेतली होती.

# प्रकाशोत्सव दीपावली



दीपोत्सव म्हणजे आनंद, उत्साहाने साजरा करण्यात येणारा प्रकाशाचा उत्सव होय. दीपोत्सव हा केवळ उत्सव नसून उत्सवांचे स्नेहसंमेलन आहे. दिवाळी, नरकचतुर्थी, धनत्रयोदशी, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज या पाच सांस्कृतिक विचारधारा असलेल्या सणांचा उत्सव आहे.

धनत्रयोदशी म्हणजे लक्ष्मी पूजन! भारतीय संस्कृतीत लक्ष्मीला महत्त्वाचे स्थान आहे. 'सुईला छेदल्यास तिच्यातून उंट निघतो. परंतु, धनवंताला स्वर्ग मिळत नाही. या ख्रिश्चन धर्मातील म्हणीला भारतीय सहमत नाहीत. त्यांच्या दृष्टीकोनातुन श्रीमंत लोकच देवाचे लाडके असतात.

लक्ष्मी चंचल नाही तर मनुष्याची वृत्ती चंचल आहे. पैसा या शक्तीच्या आधारे मनुष्य देव किंवा राक्षस बनू शकतो. लक्ष्मी केवळ उपभोगाचे साधन आहे असे मानणाऱ्या मनुष्याचे लवकरच अध:पतन होते. परंतु, तिची पूजा करून तिला परमेश्वरी प्रसाद मानणारा मनुष्य स्वत: पवित्र आणि सृष्टीलाही पवित्र बनवितो. वाममार्गाने वापरलेल्या लक्ष्मीची अलक्ष्मी होते. स्वार्थ आणि परमार्थासाठी वापरलेल्या लक्ष्मीला वित्त आणि धनलक्ष्मी असे म्हणतात. देवकार्यासाठी वापरलेली लक्ष्मी महालक्ष्मी असते.

महालक्ष्मी हत्तीवर बसून सजून येते. हत्ती औदार्याचे प्रतीक आहे. सांस्कृतिक कार्यात उदारपणे लक्ष्मीचा वापर करणाऱ्यांजवळ पिढ्यान–पिढ्या ती राहते. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रघुवंश होय. ती एक महान शक्ती असल्यामुळे नेहमी चांगल्या लोकांच्या हातात राहिली पाहिजे. कारण तिचा चांगला उपयोग होऊ शकतो.

नरक चतुर्थीला महाकालीची पूजा केली जाते. स्वतःच्या स्वार्थासाठी शक्ती खर्च करणारा दुर्योधन, दुसऱ्याच्या चरणी शक्ती ठेवणारा कर्ण आणि देवकार्यात शक्तीचे हवन करणारा अर्जुन या महाभारतातील तीन पात्रांना महर्षी व्यासांनी उत्कृष्टपणे आपल्यासमोर मांडले आहे. नरकचतुर्थीला कालचतुर्थी असेही म्हणतात. त्यामागे अशी कथा आहे की, नरकासूर नावाच्या राक्षसाने पृथ्वीवर अत्याचाराचे थैमान मांडले होते. त्याच्या अत्याचारापासून स्त्रियांचीदेखील सुटका झाली नव्हती. त्याने सोळा हजार स्त्रियांना बंदी करून ठेवले होते. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने त्याचा वध करण्याचा विचार केला. श्रीकृष्णाच्या मदतीने सत्यभामेने नरकासूराचा वध करून स्त्रियांचा उद्धार केला. अमावस्येच्या त्या रात्री सर्व लोकांनी दिवे लावून आनंदोत्सव साजरा केला होता.

दिवाळी म्हणजे वैश्यांच्या (व्यापाऱ्यांच्या) हिशोब–वही पूजेचा दिवस! संपूर्ण वर्षाचे लेखा परिक्षण करण्याचा दिवस होय. या दिवशी मनुष्यानेही त्याच्या जीवनाचा लेखा–जोखा तयार केला पाहिजे. राग, द्वेष, मत्सर यांना दूर करून नवीन वर्षाच्या दिवशी प्रेम, श्रद्धा आणि उत्साह वाढविण्याचा प्रयत्न करावा.

**बलिप्रतिपदा (पाडवा):**

नवीन वर्षाला बलिप्रतिपदा असेही म्हटले जाते. वैदिक विचारांची उपेक्षा करून वर्णाश्रम व्यवस्थेला उध्वस्त करणाऱ्या बळीचा विष्णूने पराभव केला होता. म्हणून त्याच्या स्मरणार्थ बलिप्रतिपदा साजरी केली जाते. बळी दानशूर राजा होता. या दिवशी त्याच्या आठवणींना उजाळा दिला जातो.

दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीकडे पूज्य दृष्टीने पहावे. भाऊबीजेच्या दिवशी समस्त स्त्रियांकडे आई किंवा बहिणीच्या नजरेने पाहिले पाहिजे. स्त्री ही आदरणीय आहे. मोह म्हणजे अंधकार! दीपोत्सव म्हणजे अज्ञान आणि मोहाच्या खोल अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे प्रयाण करणे होय. दिवाळीला दिवे बाहेर जळतात. परंतु आपल्या मनात योग्य दीप प्रकट झाला पाहिजे. मनात अंधकार असल्यास बाहेर जळणारे दिवे निरर्थक ठरू शकतात. दीपक ज्ञानाचा प्रतीक आहे.

# धनत्रयोदशी आणि धन्वंतरि जयंतीचे महत्त्व

आश्विन वद्य त्रयोदशी या तिथीला धनत्रयोदशी (धनतेरस) हा सण साजरा केला जातो. दीपावलीला जोडून येणाऱ्या या सणाच्या निमित्ताने नवीन सुर्वणालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. व्यापारीवर्ग आपल्या तिजोरीचे पूजनही याच दिवशी करतात. धनत्रयोदशी म्हणजेच देवतांचा वैद्य धन्वंतरी देवता' यांची जयंती. या दिनाचे माहात्म्य या लेखातून जाणून घेऊया.

भावार्थ : ज्यामुळे आपल्या जीवनाचे पोषण सुरळीत चालू आहे, त्या धनाची या दिवशी पूजन करतात. येथे धन म्हणजे शुद्ध लक्ष्मी. श्रीसूक्तात वसू, जल, वायू, अग्नी आणि सूर्य यांना धनच म्हटले आहे. ज्या धनाला खरा अर्थ आहे, तीच खरी लक्ष्मी ! अन्यथा अलक्ष्मीमुळे अनर्थ घडतो.

वैशिष्ट्ये : हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो; कारण धनप्राप्तीसाठी श्री लक्ष्मीदेवीचे पूजन केले जाते. या दिवशी ब्रह्मांडात श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व प्रक्षेपित होत असते. त्यामुळे जिवाला श्री लक्ष्मीदेवी आणि नारायण यांची कृपा संपादन करता येते. ती कृपा जिवाच्या भावावर टिकून राहाते. आताच्या काळात साधकांना शक्तीची आवश्यकता आहे, तसेच व्यावहारिक सुखापेक्षा जगणे आणि आयुष्य टिकवणे महत्वाचे आहे. त्यामुळे साधना करणाऱ्या जिवासाठी हा दिवस महापर्वणी समजला जातो. साधनेसाठी अनुकूलता आणि ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठी या दिवशी धनलक्ष्मीची पूजा करतात. वर्षभर योग्य मार्गाने धन कमवून वार्षिक उत्पन्नाचा १/६ भाग धर्मकार्यासाठी अर्पण करावा.



महत्त्व : या दिवसाला बोलीभाषेत धनतेरस असे म्हटले जाते. या दिवशी व्यापारी तिजोरीचे पूजन करतात. व्यापारी वर्ष दिवाळी ते दिवाळी असे असते. नव्या वर्षाच्या हिशोबाच्या वह्या या दिवशीच आणून त्यांचे पूजन करून वापरात आणल्या जातात.

धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन सुवर्ण विकत घेण्याचा प्रघात आहे. त्यामुळे वर्षभर घरात धनलक्ष्मी वास करते. वास्तविक लक्ष्मीपूजनाच्या वेळी वर्षभराचा आयव्यय (जमाखर्च) द्यायचा असतो. त्या वेळी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेली संपत्ती प्रभुकार्यासाठी व्यय केल्यास सत्कार्यात धन व्यय झाल्यामुळे धनलक्ष्मी शेवटपर्यंत लक्ष्मीरूपाने रहाते. धन म्हणजे पैसा. हा पैसा घामाचा, कष्टाचा, धवलांकित असलेला आणि वर्षभरात पै–पै करून जमा केलेला असावा. या पैशाचा न्यूनतम १/६ भाग प्रभुकार्यासाठी व्यय करावा, असे शास्त्र सांगते.

परात्पर गुरु पांडे महाराज

पूर्वी राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्री दान करून खाली करायचे. तेव्हा त्यांना धन्यता वाटायची. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा आहे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता देत असे. त्यामुळे साहजिकच परत खजिना भरत असे. सत्कार्यासाठी धनाचा विनियोग झाल्यामुळे आत्मबलही वाढत असे.

# लक्ष्मीपूजन करण्याची पद्धत आणि महत्त्व

आश्विन अमावास्येच्या, म्हणजेच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्व मंदिरांत, दुकानांत, तसेच घराघरांत श्री लक्ष्मीपूजन केले जाते. आश्विन अमावास्येचा हा दिवस दीपावलीचा एक महत्त्वपूर्ण दिवस मानला जातो. सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; परंतु दीपावलीतील ही अमावस्या शरद पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेप्रमाणेच कल्याणकारी आणि समृद्धिदर्शक आहे. या दिवशी श्री लक्ष्मीपूजनासोबत अलक्ष्मी नि:सारणही केले जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करावयाच्या कृतीमागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.

**१. इतिहास**

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे.

**२. सण साजरा करण्याची पद्धत**

प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन् ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी लतापल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे.

लक्ष्मीपूजन करतांना एका चौरंगावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. काही ठिकाणी कलशावर ताम्हण ठेवून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. लक्ष्मीजवळच कलशावर कुबेराची प्रतिमा ठेवतात. त्यानंतर लक्ष्मी आदी देवतांना लवंग, वेलची आणि साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. मग हातातील चुडीने पितृमार्गदर्शन करतात. ब्राह्मणांना आणि अन्य क्षुधापीडितांना भोजन घालतात. रात्री जागरण करतात.

लक्ष्मीपूजनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले नाही, तर जेवढे उपलब्ध आहे, त्या साहित्यात भावपूर्णरित्या पूजाविधी करावा. बत्तासे आदी साहित्य न मिळाल्यास, देवाला घरातील तूपसाखर, गूळसाखर किंवा एखादा गोड पदार्थ यांचा नेवैद्य दाखवावा.

**लक्ष्मी कुणाकडे वास करते ?**

आश्विन अमावास्येच्या रात्री जागरण करतात. पुराणांत असे सांगितले आहे की, आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जिथे स्वच्छता, शोभा आणि रसिकता आढळते, तिथे तर ती आकर्षित होतेच; शिवाय ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त, तसेच क्षमाशील पुरुष आणि गुणवती अन् पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते.

**३. लक्ष्मीपूजनाच्या दिवसाचे महत्त्व**

सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; पण त्याला अपवाद या अमावास्येचा आहे. हा दिवस शुभ मानला आहे; पण तो सर्व कामांना नाही; म्हणून या दिवसाला शुभ म्हणण्यापेक्षा आनंदी दिवस म्हणणे योग्य !

**४. श्री लक्ष्मीदेवीला करावयाची प्रार्थना**

जमा–खर्चाच्या हिशोबाची वही लक्ष्मीसमोर ठेवायची आणि प्रार्थना करायची, हे लक्ष्मी, तुझ्या आशीर्वादाने मिळालेल्या धनाचा उपयोग आम्ही सत्कार्यासाठी आणि ईश्वरी कार्य म्हणून केला आहे. त्याचा ताळमेळ करून तुझ्यासमोर ठेवला आहे. त्याला तुझी संमती असू दे. तुझ्यापासून मी काही लपवून ठेवू शकत नाही. जर मी तुझा विनियोग योग्य प्रकारे केला नाही, तर तू माझ्या जवळून निघून जाशील, याची मी सतत जाणीव ठेवतो. तेव्हा हे लक्ष्मीदेवी, माझ्या खर्चाला संमती देण्यासाठी भगवंताजवळ तू माझी शिफारस कर; कारण तुझ्या शिफारशीशिवाय तो त्याला मान्यता देणार नाही. पुढील वर्षीही आमचे कार्य सुरळीत पार पडू दे.




**५. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री केर का काढतात ?**

अलक्ष्मी नि:सारण

महत्त्व : गुण निर्माण केले तरी दोष नाहीसे झाले, तरच गुणांना महत्त्व येते. येथे लक्ष्मीप्राप्तीचा उपाय झाला, तसेच अलक्ष्मीचा नाशही झाला पाहिजे; म्हणून या दिवशी नवीन केरसुणी विकत घेतात. तिला लक्ष्मी म्हणतात.

कृती : मध्यरात्री नवीन केरसुणीने घरातील केर सुपात भरून तो बाहेर टाकावा, असे सांगितले आहे. याला अलक्ष्मी (कचरा, दारिद्र्य) नि:सारण म्हणतात. एरव्ही कधीही रात्री घर झाडणे वा केर टाकणे करायचे नसते. फक्त या रात्री ते करायचे असते. कचरा काढतांना सुपे आणि दिमडी वाजवूनही अलक्ष्मीला हाकलून लावतात.

**६. लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक का काढावे ?**

आश्विन अमावास्येच्या दिवशी केल्या जाणाऱ्या श्री लक्ष्मीपूजनाच्या वेळी अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यांवरच श्री लक्ष्मीची स्थापना केली जाते. सर्व देवतांची पूजा करतांना त्यांना अक्षतांचे आसन दिले जाते. अन्य देवतांच्या तुलनेत श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व अक्षतांमध्ये ५ टक्के जास्त प्रमाणात आकृष्ट होते; कारण अक्षतांत श्री लक्ष्मीच्या प्रत्यक्ष सगुण गुणात्मक, म्हणजेच संपन्नतेच्या लहरी आकृष्ट करण्याची क्षमता असते. अक्षतांमध्ये तारक आणि मारक लहरी ग्रहण करून त्यांचे संचारण करण्याची क्षमता असल्याने लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढावे. स्वस्तिकामध्ये निर्गुण तत्त्व जागृत करण्याची क्षमता असल्याने श्री लक्ष्मीच्या आसनाच्या स्वरूपात स्वस्तिक काढावे.

**७. लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणण्याचे कारण**

एखाद्या देवतेची उपासना केली की, त्या देवतेचे तत्त्व उपासकाकडे येते आणि त्यानुसार लक्षणे दिसतात, उदा.श्री लक्ष्मीची उपासना केली की, धनप्राप्ती होते. उपासना कमी झाली, अहं जागृत झाला की, देवतेचे तत्त्व उपासकाला सोडून जाते. अशाच कारणांमुळे श्री लक्ष्मी उपासकाला सोडून जाते. तेव्हा स्वतःची चूक मान्य न करता व्यक्ती म्हणते, लक्ष्मी चंचल आहे. येथे लक्षात घेण्यासारखे सूत्र हे की, लक्ष्मी चंचल असती, तर तिने श्रीविष्णूचे चरण केव्हाच सोडून दिले असते.

परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते

संकलन : **सौ. अंजली पाध्ये, नागपूर**
संपर्क : ९९७५५ ३६९०६

# जीवनांतील अमुल्य तत्वे...!

सुखी जीवनाची खरी गुरूकिल्ली म्हणजे आयुष्यात अमुल्य तत्वांचा अधिक वापर करणे होय. अतिषय महतवाचा घटक म्हणजे आपली स्वतःची वेळ होय. जीवनात वेळे अभावी सर्व अर्थहिन आहे. आपण स्वतः कोणत्याही तत्वाची कधीही टिंगल करू नये, हा स्वतःचा अनादर होईल. आपल्याला ध्यैयपुर्ण, समाधानी जीवन जगावयाचे असेल तर वेळेचा आदर करणे महत्वाचे आहे हिच जीवनाची सफलता आपल्याला टिकविणे गरजेचे आहे. आपण वेळेचे नियोजन व्यवस्थितरित्या केल्यास कधीही त्रास होणार नाही व कामे वेळेवर झाल्यास दुसरे कार्य होण्यास मार्ग सुकर होईल. हेच समाधानी व्यवस्थितकरण होय. वेळेवर कोणतेही कार्य केल्यास आपल्या स्वतःला वेगळेपण प्राप्त होते. आयुष्यात एकदा वेळ गेली की, कधीही परत येत नसते. अर्थातच जीवन जगतांनी माणसाला वेळेचे भान असणे महत्वाचे नाही काय?

वेळ : आपण कोणतेही कामे करीत असाल तर आपण स्वतः आठवडयातील, महिन्याची कामे कषी करावयाची हि आखणी महत्वाची आहे. या योजनाबध्द आखणीमुळे आपण स्वतः वेळेचा उपयोग केल्यास स्वतःची कामे त्रास न होता वेळेवर होतातच हे मात्र खरे! वेळेवर कामे केल्यास जीवनाला योग्य असा आकार, स्वतः चे व्यकितमत्वाचा विकास व्हायला सोयीस्तरपणे वाव मिळतो व आनंद निर्माण होतो हे मानवी जीवनाचे खरे गुपीत होय. खाया अर्थाने पाहू जाता क्षमता ही अफाट जरी असली तरीपण आपण वेळेवर कार्य केल्यास हि क्षमता अधिकच कार्यषील राहील व आपल्याला जीवनात वेगळेपण अनुभवयाला मिळेल. षिवाय, आपण स्वतःच आयुष्याचा मालक बनु शकतो हेच आयुष्याचे अमुल्य घटक आहे असे समजावे.

पैसा : जीवन जगतांना आपण स्वतः कमायीचे साधन पाहुन खर्च करणे महत्वाचे आहे. आपण आयुष्यात कुणाबरोबर स्पर्धा करता कामा नये, असे केल्यास स्वतःला पैसे पुरेनासे होऊन निराषा येत असते. आपण विद्यार्थी दक्षेत असतांना किंवा बाहेरगावी षिकत असतांना येणाया पैषाचे खर्च करण्याचे नियोजन केल्यास पैसा बरोबर पुरेल व परिवार सदस्यांना त्रास न होता षिक्षण पूणत्वाकडे जाण्यास मदत होईल व आनंद मिळेल. पैसा खर्च करतांना कोणत्या कामाला किती पैसे खर्च करावे किंवा कोणते कार्य अगोदर करावे, याचे नियोजन करणे महत्वाचे असते, तेव्हा आपल्या जीवनात यषस्वी होण्यास अधिक मदत होते. आपण नियोजन करतांना भविष्याची दूरदृष्टी ठेवुन योग्य आखणीबध्द पध्दतीने खर्चाचे नियोजन केल्यास आपल्याला स्वतःला पुरेनासे होईल व वेळेवर पैसा असल्यामुळे त्रास होणार नाही हे सामान्यातुन षिकण्यासारखे आहे. पैषाची नियोजनबध्द कामे केल्यास जीवनात अतिउत्तम, समाधान मिळाल्याषिवाय राहणार नाही या व्यतिरिक्त आनंदाची दारे आपल्या स्वतःसाठी नेहमी उघडीच राहील व त्यात समाधानाची ज्योत नेहमीच तेवत राहील. जीवनात स्वतः कष्ट करून कामे केल्यास पैसा आपल्याजवळ अखेरपर्यंत टिकुन राहील. अन्यथा वाम मार्गाने किंवा कुण्या व्यक्तिला त्रास देवुन मिळविलेला पैसा आपल्याजवळ टिकुन राहत नाही हे अनुभवाअंती सिध्द झालेले आहे हे मात्र खरे! पैषाचे नियोजन खाया अर्थाने सोयीस्तररित्या करणे अगत्याचे आहे.

संयम : जीवनात, आपल्या वाईट काळात आपली किंमत कमी करण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो, मात्र संयम राखला तर आपले अस्तित्व कोणीच संपवु, हिरावुन शकत नाही. त्यासाठी आपले संयमाला टिकविणे फार महत्वाचे आहे. कोणतीही गोष्ट करतांना थोडाफार संयम राखल्यास मनासारख्या गोष्टी होण्यास स्वतःलाच मदत होत असते व जीवनात आनंद निर्माण होईल संयम बाळगणे हा आपला मानवी जीवन जगण्याचा सर्वोत्तम भाग असला पाहीजे. जीवनात संयम हा गुण व योजनाबध्द सर्व कामाची आखणी केल्यास स्वतः ला समाधान मिळेल. आपण निरर्थक गोष्टींना फार महत्व न देता किंवा सोयीस्कररित्या तिलांजली दिल्यास व स्वतः नाराज न राहता संयम राखल्यास येणारे दिवस आनंदात राहील. स्वतः आपण कार्यक्षम राहा, काही कामात वेळा पाळणे गरजेचे, कोणतेही कार्य मन राहुन केल्यास यषासाठी संयम राखल्यास नवी उर्जा, नवी चेतना प्राप्त होऊन यष संपादन होईल! संयम हे आपल्या जीवनावर परिणाम साधणारी व आयुष्याला खाया अर्थाने आकार व उर्जा देणारी गोष्ट असुन त्याचा उपयोगाला प्राधान्य देणे आवष्यक आहे. हे तत्वज्ञान जीवन आनंदीत होण्याचे खरे मार्गदर्षक ठरू शकतात. चुक नसतांनाही केवळ वाद टाळावा म्हणुन घेतलेली माघार हे संयमाच फार मोठ प्रतिक आहे.

विश्वास : कौत्युक करणाऱ्या शेकडो व्यतिपेक्षा प्रोत्साहीत करणारी एक व्यक्ती सोबत असावी जी आयुष्यात सर्व नकारात्मकतेला पुरून उरेल पण यासाठी स्वतःवर विष्वास, दुसायावर विष्वास असणे महत्वाचे आहे. जीवनात काही गोष्टी संयम बाळगुन करावयाच्या असेल तर स्वतःवर कायम विष्वास ठेवणे फार गरजेचे आहे. आपल्या विचारामध्ये, स्वप्नामध्ये हरवुन गेलेल्या व्यक्तीच्या गर्दीत एकांकी वाटु नये यासाठी स्वतःवर, इतरावर, कुटुंबातील सदस्यावर व स्वतःच्या व्यक्तीवर विष्वास बाळगणे, ठेवणे आदराणे संयमाने वागणे हेच आनंदमय जीवनाचे खरे गणीत आहे. पण, विष्वास हा माणुसकीला धरून असावा त्यामुळे आयुष्यात गुंतागुंत होत नाही. स्वतःच्या मर्जीने केलेल्या कामावर कार्यावर थोडाफार विष्वास ठेवल्यास स्वतःलाच त्याची यष प्राप्ती झाल्याषिवाय राहणार नाही. आपल्याला वैभवाच्या षिखरावर जात असतांना आपल्या स्वतःच्या व्यक्तीवर खाया अर्थाने विष्वास हा ठेवावाच लागेल. भविष्यात संयम आणि विष्वास एकत्र नांदले तर स्वतःच्या व इतरांच्या आयुष्यात आनंदाची पर्वणी यायला वेळ लागणार नाही हे मात्र तेवढेच खरे! यासाठी आपण ईष्वराचे आभार मानायला हवे कि ज्यांनी हा देह पृथ्वीस्थलावर चांगले करण्यासाठी पाठविला? माणसाचे वागणे नितळ असलं की, त्याच प्रतिबिंब कुठेही आणि कितीही गर्दी असली तरी उठुनच दिसत. पण, यासाठी विष्वास या गोष्टीवर अपार श्रध्दा बाळगल्यास मन आनंदीत होते. अर्थातच, आनंदी राहण्यासाठी पैषाने कमविलेल्या वस्तुपेक्षा स्वभावाने कमावलेली माणसे जास्त सुख देतात हेच विष्वास ठेवल्याचे खरे यष आहे असे म्हणता येईल.

व्यतिमत्व : चांगले व्यतिमत्व, स्वभाव हा आनंदापेक्षाही मोठा असा आनंद आहे. तो त्यालाच मिळतो ..... ही जो स्वतःला विसरून इतरांना आनंदीत करतो हेच व्यतिमत्व विकासासाठी पायाभरणी करून मन यषाकडे नेऊन आनंदाचे दार नेहमी उघडत असतो. पण शरीर सुंदर असेल किंवा नसेल, मात्र शब्द आणि मन, स्वभाव व्यतिमत्व शुध्द असायला हवे. कारण, माणसाची सवय आहे की, तो चेहरा लवकर विसरतो पण शब्द आणि चांगले मन, व्यतिमत्व कधीच विसरत नाही. हाच चांगुलपणाचा मार्ग जिवनात मनाची बाळगल्यास यषाचे क्षेत्रफळाचा प्रवास करता येईल. व्यक्तिमत्वात नेहमी खरेपणा असणे आवष्यक आहे तोच ध्येयापर्यंत आपल्याला खाया अर्थाने पोहचु शकतो यासाठी व्यतिमत्वाचा विकास, सवय, चारित्र्य, सन्मान, हरवेपण, त्याग, संयम या विविधांगी गोष्टीचा संग्रह ठेवणे अत्यंत गरजेचा आहे तरच चांगला विकास साधुन आपण सर्व विकासाच्या दिषेने जाण्यास सक्षम असु. कारण माणुस कळायला माणुसकी लागते. चांगल जगायला सुंदर विचार लागतात. भरभरूण जगायला पैसा नाही, तर आयुष्य लागत हेच सुखी आणि व्यक्तीमत्व विकास आणि चांगल्या विचाराचे खाया अर्थाने एक प्रकारचे आयुष्याचे समीकरण आहे. पाठीवरचा ओझ्यापेक्षा मनावरचं ओझ नेहमी जड असतं... ते हलकं करायचं म्हटलं की, झेलणारा देखील तितकाच आपलासा असावा लागतो.तरच आनंदी सुखी जीवनाचे चाके समांतररित्या पूढे–पूढे चालत राहणार हाच सुखी जीवनाचा प्रवास म्हणता येईल. जीवनांत सुख दुःखाच्या खडतर वाटेवरून जातांना माणसं मिळवायचे असतात, शत्रु वजा करायचे असतात, सुखानी गुणायचे असते दुःखानी भागायचे असते, त्यामधुन उरते, ती बाकी म्हणजे जीवनाचे, आयुष्याचे खरे समाधान हेच जीवन प्रवासाचे खरे सोबती असतात.

जाता जाता.... आपल्याला यषस्वी जीवनाची वाटचाल करतांना वेळ पैसा, संयम, विष्वास आणि व्यतिमत्व, स्वभाव इत्यादी विविधांगी अमुल्य घटकाकडे जातीने लक्ष देणे महत्वाचे आहे. तरच सुखी जीवनाचे स्वप्न साकार करता येईल. जीवन सुंदर आहे त्याची सुंदरता कायम ठेवण्यासाठी स्वतःचा स्वभावाने, व्यतिमत्वाने अधिक सुंदर करू शकतो यासाठी संयम हळवेपण त्याग, मानसिकता, आदर सन्मान, दुसायाच्या विचाराचे समर्थन, स्वतःच्या व्यतिसोबत चर्चा तसेच आचार विचाराचे मंथन या विविध गोष्टी स्वतः सोबत बाळगल्या की, जीवनातील यष आपलेच आहे, असे समजावे. परिस्थिती प्रमाणे बदलणारी माणसे सांभाळण्यापेक्षा, परिस्थिती बदलविणारी माणसे सांभाळा... आयुष्यात कधीही अपयष अनुभवायला मिळणार नाही तसेच जलद गतीने मिळणारे यष अहंकार निर्माण करतात तर उषिरा मिळणारे यष आपलं व्यतिमत्व तयार करतं. स्वतःसोबत जेव्हा दुसायाच्या मनाचा देखील जेथे विचार केला जातो, तिथेच माणुसकीचं सुंदर नात तयार होतं. हेच सुखी व समृध्द जीवनाचे कोड तसेच अमुल्य घटक आहे, असे म्हणणे रास्त ठरावे!



: शब्दांकन :
**विजय सीताराम सोनारघरे**
२४, उदयनगर, नागपूर
मो.नं. ९३२५७३३८३६

# आदिवासी पाड्यात मानवसेवा ट्रस्टकडून दिवाळी साजरी

**डहाणू, दि. २० : प्रतिनिधी**



डहाणू तालुक्यातील बऱ्हाणपूर (पाटीलपाडा) या आदिवासी भागात मानवसेवा चॅरिटेबल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट, मुंबई यांच्या वतीने दिवाळीचा सण साजरा करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत पाड्यातील अनेक कुटुंबांना दिवाळी फराळाचे साहित्य आणि गोडधोडाचे डबे वाटप करण्यात आले.

शहरांमध्ये दिवाळी म्हटली की झगमगाट, फटाके, रंगीबेरंगी कंदील आणि विविध फराळाचे पदार्थ यांची रेलचेल असते. मात्र, आदिवासी पाड्यांमध्ये दिवाळी अजूनही अत्यंत साधेपणाने साजरी केली जाते. पारंपरिक भात कांडून तयार केलेले लाडू, स्थानिकरित्या उपलब्ध असलेले कंदमुळे व थोड्याफार गोडधोडीच्या सोबतीने दिवाळी साजरी होते. याच पार्श्वभूमीवर, मानवसेवा चॅरिटेबल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट, मुंबईच्या सामाजिक बांधिलकीतून या भागातील कुटुंबांना दिवाळीचा विशेष आनंद देण्याचा प्रयत्न करण्यात आला. ट्रस्टकडून लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वांसाठी फराळाचे पारंपरिक पदार्थ लाडू, चकल्या, करंज्या, चिवडा आदी गोडधोडाचे डबे वाटप करण्यात आले. यामुळे पाड्यावरील वातावरण उत्साहवर्धक बनले. अनेक वर्षांनी अशा स्वरूपात दिवाळी साजरी झाल्याचा आनंद ग्रामस्थांनी व्यक्त केला.

या उपक्रमात ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विकास येवले, मिलिंद येवले, पुनम येवले, ज्येष्ठ पत्रकार सुभाष जाधव, चंद्रकांत घाटाळ, नंदुकशेठ करवीर, मनोज करवीर, तसेच स्थानिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून दिवाळीचा आनंद सामूहिकपणे साजरा केला. ट्रस्टकडून गेल्या काही वर्षांपासून डहाणू परिसरातील आदिवासी पाड्यांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. आरोग्य शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप, स्वच्छता मोहीमा, अन्नधान्य वितरण आदींचा यामध्ये समावेश आहे. या उपक्रमांमुळे आदिवासी भागात सकारात्मक बदल घडत असल्याचे चित्र दिसून येते. यंदाचा दिवाळी उपक्रमही केवळ फराळपुरता मर्यादित न राहता, माणुसकी, एकोपा आणि समाजभावनेचा एक सुंदर अनुभव देणारा ठरला. "दिवाळी म्हणजे फक्त रोषणाई नव्हे, तर मदतीचा आणि आनंद वाटण्याचा सण आहे" हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

# "वसई दुर्ग दीपोत्सव" उत्साहात साजरा

## १०० मशाली व हजारो दिव्यांनी उजळला वसई किल्ला !



**वसई, दि. २० : प्रतिनिधी**

पोर्तुगीजांच्या जाचातून हतबल झालेल्या वसईकरांना मुक्त करण्यासाठी हिंदवी साम्राज्याचे २१ हजार मराठे हुतात्मा झाले. आपल्या घरी दिवाळी-दसरा साजरी व्हावा म्हणून त्यांनी बलिदान दिले. स्वतःच्या कुटुंबाचा व जीवाचा त्याग केला. दिवाळीत एकीकडे संपूर्ण वसई - विरार शहर, घरे, दुकाने, मंदिर , चर्च, मॉल्स, रस्ते प्रकाशमान होऊन झगमगत असतात तर दुसरीकडे पराक्रमी हिंदवी सैन्याच्या शौर्याचा व बलिदानाचा साक्षीदार असलेला वसईचा किल्ला (नागेश महातीर्थ) मात्र अंधारात असतो. पूर्वापार अनेक परिवार व धर्मसभा वसई किल्ल्यातील नागेश महातीर्थावर दीपावली साजरी करतात.

आमची वसई सामाजिक समूह, धर्मसभा व वसई - विरार, नायगाव नालासोपारा च्या देश व धर्माभिमानी नागरिकांनी दिपोत्सवात हजारो पणत्या प्रज्वलित करून भव्य आकाश कंदिल उजळवला. १०० मशालींच्या दिमाखदार उजेडात, वाद्यांच्या गजरात व जय वज्राई-जय चिमाजी च्या जयघोषात अवघे वातावरण दुमदुमले होते.

# श्रीकृष्ण उपासना क्षेत्र डोंगस्ते यांच्यावतीने दीपावली भेट उत्सव उत्साहात संपन्न



**वाडा, दि. २० : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील श्रीकृष्ण उपासना क्षेत्र डोंगस्ते येथे रविवार (ता.१९) रोजी रोटरी क्लब ऑफ मुंबई ( कांदिवली) यांच्या वतीने दीपावली भेट उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा दीपावली भेट उत्सव कार्यक्रम आसमंत संस्थेच्या अध्यक्षा निशा सवरा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

श्रीकृष्ण उपासना सेवा संस्था ही महिलांसाठी प्रशिक्षण, रोजगार प्रबोधन व युवक - युवतींसाठी आध्यात्मिक उपक्रमातून आरोग्य व प्रबोधन असे कार्यक्रम नेहमीच राबवित असते. श्रीकृष्ण उपासना क्षेत्र डोंगस्ते व रोटरी क्लब ऑफ मुंबई (कांदिवली) यांच्या संयुक्त विद्यमाने डोंगस्ते ( मुळगाव) येथील महीला भगिनींना भाऊबीज भेट म्हणून साडी व मिठाई देण्यात आली. दीपावली भेट हे एक निमित्त असून या कार्यक्रमातून महीलांप्रति आदर व सद्भाव जपणे व भविष्यात विविध उपक्रम राबविण्यात आपला सहसंबंध जोडणे हा संस्थेचा प्रमूख उद्देश आहे.

या कार्यक्रम प्रसंगी आसमंत संस्थेच्या अध्यक्षा निशा सवरा, माजी उपसभापती मेघना पाटील, भाजपा महीला आघाडीच्या मंडळ अध्यक्षा अंकिता दुबेले, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रशांत मिश्रा, उपाध्यक्ष संजय पातकर,श्रीकृष्ण उपासना सेवा संस्थेचे अध्यक्ष सुनील मेणे,निवृत विस्तार अधिकारी शिवाजी पाटील,शिक्षिका सुवर्णा पाटील आदींसह डोंगस्ते परिसरातील महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# दिवाळीच्या सणानिमित्त मनोर बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी

**मनोर, दि. २० : प्रतिनिधी**

दिवाळीच्या आगमनाने मनोर बाजारपेठेचा चेहरा खुलून गेला आहे. शनिवारी आठवड्याच्या बाजाराचा दिवस आणि दीपोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण परिसरात खरेदीचा उत्साह ओसंडून वाहत आहे. मनोर परिसरातील सुमारे ७५ खेडोपाड्यांमधील आदिवासी बांधव आपापल्या कुटुंबासह दिवाळीच्या खरेदीसाठी मनोर गावात दाखल झाले आहेत. बाजारपेठेत दिवाळीला लागणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तूंची रेलचेल पाहावयास मिळाली. फटाके, मातीच्या दिव्या, फराळासाठी लागणारे बेसन, रवा, साखर, शेंगदाणे, तूप, तेल, मिठाईचे साहित्य, नवीन कपडे, खेळणी, सजावटीच्या वस्तू, कंदील, रांगोळी रंग, फुलबाजे, लहान मुलांचे कपडे, चप्पल, दागिने, साड्या, धोतर, ओवाळणीसाठी लागणारे नारळ, फुले आणि सोन्याच्या दागिन्यांच्या नकल्या



अशा असंख्य वस्तूंच्या खरेदीत ग्रामीण जनतेचा उत्साह ओसंडून वाहत होता. महागाईच्या झळा बसत असल्या तरी गोरगरीब आदिवासी बांधवांनी आपापल्या कष्टार्जित पैशातून आपल्या लहानग्यांची दिवाळी उजळवण्यासाठी मोठ्या आनंदाने खरेदी करताना पाहावयास मिळाले.वर्षभर मोलमजुरी करून काही थोडे पैसे साठवलेत, मुलांची दिवाळी तरी चांगली जावी अशी भावना प्रत्येक पालकाच्या चेहऱ्यावर दिसत होती. दुकानदारांसाठीही हीच वेळ सर्वात गजबजलेली ठरली. छोट्या गाळ्यांपासून ते भाजीवाल्या, कपड्यांच्या दुकानांपासून ते मिठाई विक्रेत्यांपर्यंत सर्वांनाच चांगली उलाढाल झाली. शनिवारचा पारंपरिक आठवडा बाजार आणि दिवाळीचा उत्सव या दुहेरी पार्श्वभूमीवर मनोर बाजार म्हणजे ग्रामीण जनतेसाठी एक मॉल ठरला आहे. शहरात जाऊन महाग खरेदी करण्याऐवजी ग्रामीण जनता मनोर बाजारातच सर्व काही घेताना दिसली.

**वाहतूक पोलिसांचा चौक बंदोबस्त**

गर्दीमुळे काही वेळा वाहतुकीला अडथळा निर्माण झाला असला तरी जिल्हा वाहतूक पोलिसांनी वेळेवर नियोजन करून वाहतूक सुरळीत ठेवली.पोलिसांनी केलेल्या वाहतूक व्यवस्थापनामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत त्यांचे आभार मानले. गावोगावी दिवाळीचा सण साजरा करण्याची लगबग सुरू असून घराघरांत स्वच्छता, रंगरंगोटी, फुलांची आरास आणि दिव्यांची सजावट करण्यात येत आहे. गोरगरीब जनतेची दिवाळी जरी साधी असली तरी ती मनापासून आनंदाने साजरी केली जाते. मुलांना नवीन कपडे, थोडे गोड खाद्य, आणि थोडेफार फटाके एवढ्यानेच त्यांचा आनंद गगनात मावेनासा होतो. दिवाळीचा सण म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि एकतेचा संदेश देणारा सण मानला जातो. मनोरसारख्या ग्रामीण भागातही हा उत्सव तितक्याच उत्साहात साजरा होत आहे. वर्षभर कठोर परिश्रम करणाऱ्या आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर दिव्यांच्या उजेडासारखे समाधान दिसत आहे.

# आरोग्य मदतीसाठी एकच छत्रछाया

## राज्यात 'वॉर रूम'ची मोठी घोषणा

**मुंबई, दि. २० : प्रतिनिधी**

आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीत होणारा गोंधळ, निधीचा अपव्यय आणि नागरिकांना मिळणाऱ्या मदतीतील विलंब या सगळ्यावर आता सरकारने 'कडक' उपाययोजना आखली आहे. रुग्णांना योग्य योजनेचा तातडीने लाभ मिळावा आणि सर्व योजना एकाच ठिकाणी समन्वयित व्हाव्यात यासाठी राज्यात एक अत्याधुनिक 'आरोग्य वॉर रूम' उभारण्यात येत आहे. ही वॉर रूम थेट मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या नियंत्रणाखाली काम करणार आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली हा कक्ष कार्यरत होईल. नागरिकांना महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी यासारख्या सर्व योजनांचा लाभ एका ठिकाणावरून मिळणार आहे. याचसोबत एकाच रुग्णाकडून एकापेक्षा अधिक योजनांचा गैरवापर टाळण्यासाठी कडक यंत्रणा तयार केली जात आहे. आरोग्य सेवांसाठी एकच टोल-फ्री क्रमांक 1800 123 2211 सुरू करण्यात आला आहे. या क्रमांकावरून नागरिकांना योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया, मार्गदर्शन आणि तक्रार निवारणाची सुविधा मिळेल. या उपक्रमासाठी 12 सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत आरोग्य, सामाजिक न्याय, कामगार, आदिवासी विकास, महिला व बालकल्याण आणि दिव्यांग कल्याण विभागातील वरिष्ठ अधिकारी सहभागी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आरोग्य योजनांचे एकत्रीकरण आणि पारदर्शकतेद्वारे गरजू रुग्णांपर्यंत निधी पोहोचवण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. "प्रत्येक पात्र रुग्णापर्यंत योग्य योजना पोहोचवून कोणालाही उपचारांपासून वंचित राहू नये, हा या 'वॉर रूम'चा हेतू आहे," असं मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितलं.

# "व्हिजन २०४७"ची तयारी जोरात

## महाराष्ट्र सज्ज एका मोठ्या परिवर्तनासाठी!

**मुंबई, दि. २० : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या विकासाचा नवा आराखडा आकार घेत आहे... 'विकसित भारत' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नाला साकार रूप देण्यासाठी राज्याने कंबर कसली आहे. सत्तेच्या पातळीवर मोठ्या हालचाली सुरू झाल्या असून या आराखड्यामुळे महाराष्ट्राचे भविष्य ठरवणारा एक ऐतिहासिक दस्तऐवज निर्माण होणार आहे. हा दस्तऐवज केवळ नकाशा नसून 'विकसित महाराष्ट्र 2047' या महाअभियानाचा भक्कम पाया ठरणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे 'विकसित महाराष्ट्र 2047 सल्लागार समिती'ची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. राज्याला केवळ इतर राज्यांशी नाही, तर जगाशी स्पर्धा करण्यास सक्षम बनवणारा आराखडा या बैठकीत अंतिम स्वरूपात मांडला गेला. तीन टप्प्यात 2029, 2035 आणि 2047 महाराष्ट्राला विकसित राष्ट्राच्या शर्यतीत अग्रेसर बनवण्याचा रोडमॅप यात समाविष्ट आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी हा मसुदा लवकरच सादर केला जाणार आहे.

या बैठकीस मंत्री मंगलप्रभात लोढा, पंकजा मुंडे, नितेश राणे, तसेच वरिष्ठ सचिव उपस्थित होते. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड कम्प्युटिंग आणि एलएलएम (लार्ज लँग्वेज मॉडेल) यांचा वापर करून शासकीय निर्णय प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवण्यावर भर देण्यात आला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आदेश दिला की, मंजुरीच्या प्रक्रियेत एआय-आधारित प्रणाली तातडीने उभारावी.

दरम्यान, राज्यातील नागरिकांचा या आराखड्याला जबरदस्त प्रतिसाद मिळाल्याचंही समोर आलं आहे. १९ जून ते २८ जुलै २०२५ या काळात झालेल्या सर्वेत तब्बल ४ लाख नागरिकांनी सूचनांचा पाऊस पाडला, त्यात ३५ हजार ऑडिओ मेसेजेसचा समावेश होता. ७ लाखांहून अधिक नागरिकांनी विभागीय सर्वेमध्येही सहभाग नोंदवला. या सूचनांवर आधारित 'विकसित महाराष्ट्र 2047'चा पाया घातला गेला असून राज्याच्या भविष्यासाठीचा हा आराखडा निर्णायक ठरणार आहे.

# वसईत दिवाळी पहाट कार्यक्रमाला तुफान गर्दी

## बविआ, मराठी नाट्य रसिक परिवार, यंग स्टार्स ट्रस्टचे आयोजन

**वसई, दि. २० : प्रतिनिधी**






बहुजन विकास आघाडी , मराठी नाट्य रसिक परिवार यंग स्टार्स ट्रस्ट विरार अध्यक्ष हितेंद्र ठाकूर , वाय. एम. सी. ए. माणिकपूर विद्यमाने वसई पश्चिम येथील सभागृहात मराठी पाऊल पडते पुढे या सुमधुर गाण्यांची दिवाळी पहाट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनानेझाली.

दिवाळी पहाट कार्यक्रमात माजी महापौर नारायण मानकर , माजी विरोधी पक्ष नेता विनायक निकम , स्थायी समितीचे माजी सभापती कवियित्री ज्योती बालिका, संदेश जाधव, वायएम सीएचे अध्यक्ष तथा माजी उपमहापौर प्रकाश रॉड्रिग्ज , वसई तालुका कला क्रीडा विभागाचे प्रकाश वनमाळी , साहित्यिक अशोक मुळे , माजी सभापती वृंदेश पाटील, वसई विकासिनी दृक कला महाविद्यालयाचे विश्वस्त सचिव विजय वर्तक , कोमसापचे वसई अध्यक्ष प्रकाश पाटील यांच्यासह मराठी नाट्य रसिक परिवार , माजी नगरसेवक , बविआ , यंग स्टार्स ट्रस्ट पदाधिकारी कार्यकर्ते , रसिक उपस्थित होते सभागृह पूर्णपणे भरले होते तर रसिकांनी बाहेर देखील गर्दी केली होती.

.मराठी पाऊल पुढले पुढे या कार्यक्रमात गायक श्रीरंग भावे, प्राजक्ता रानडे, धनश्री देशपांडे , विश्वजीत बोरवणकर यांनी गाणी सादर केली तर सुसंवादीका म्हणून दीपाली केळकर यांनी गायक , गीतकार आदींची माहिती करून दिली व वादक प्रशांत लळीत, सागर साठे विजय तांबे दत्ता तावडे, सूर्यकांत सुर्वे, अनिल करंजवकर, अभिजित सावंत, बाबू शेट्ये यांची साथ मिळाली व उत्तरोत्तर कार्यक्रम बहरत गेला.कवियित्री ज्योती बालिका यांनी रचलेले गीत देखील गायिकेने गायले व रसिकांनी मोठ्या प्रमाणात दाद गाण्याला दाद दिली.

कार्यक्रमाचा समारोप मराठी पाऊल पडते पुढे या गीताने करण्यात आला यावेळी उपस्थित नागरिकांनी गायकांना भरभरून दाद दिली उपस्थितांचे आभार प्रकाश वनमाळी यांनी मांडत असताना बविआ राजकारण करत नाही तर वसईतील रसिकांना अधिकाधिक आनंद घेता यावा यासाठी प्रयत्न करते , माजी आमदार हे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून नेहमीच प्रयत्नशील असतात म्हणून अनेक वर्ष वसई तालुका कला क्रीडा महोत्सव सुरु आहे असे सांगितले.

वसई विरार शहर महापालिकेने मॅरॅथॉन , शालेय कला क्रीडा महोत्सव रद्द केला दिवाळी पहाट कार्यक्रमात सहभाग नाही. मात्र बहुजन विकास आघाडीने अविरतपणे रसिकाच्या आग्रहास्तव दिवाळी पहाट सुरु ठेवला आहे त्यामुळे नागरिकांना मराठी गाण्यांचा आस्वाद दिवाळीच्या पहिल्या दिवशी घेता आला असे मत माजी विरोधी पक्ष नेता विनायक निकम यांनी मांडले आहे.

वसईला साहित्याची संस्कृती लाभली आहे येथील रसिक हे दर्दी आहेत त्यामुळे नगराध्यक्ष असताना दिवाळी पहाट कार्यक्रम सुरु केला व आजतायागत सुरूच आहे माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या संकल्पेतून अनेक कार्यक्रम यशस्वी झाले आहेत यंदा नागरिकांची गर्दी गतवर्षीपेक्षा अधिक दिसून आली त्यामुळे रसिक वर्ग वाढत आहे असे माजी महापौर नारायण मानकर यांनी सांगितले.

# कामोठे मध्ये ऐन दिवाळीत पाण्यासाठी नागरिकांचे ठिय्या आंदोलन

**पनवेल, दि. २० : प्रतिनिधी**

देशभरात दिवाळी साजरी होत असताना कामोठ्यामध्ये तीव्र पाणीटंचाई असल्यामुळे लोकांनी अभंग स्नान कसे करावे हा मुख्य प्रश्न भेडसावत आहे. पाणी नसल्याने नागरिक संतापले आहेत. सेक्टर 6अ, 6, 9, 17,18,19, 22,23,24 मध्ये नागरिकांना पाणी पिण्यासाठी वापरायचे कि अभ्यंग स्नान करायचे हा प्रश्न पडलेला आहे.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक शंकरशेठ म्हात्रे यांनी सांगितले येथील स्थानिक आमदार प्रशांत ठाकूर हे पाण्याचा प्रश्न सोडू शकत नाहित हे ह्या सत्ताधाऱ्यांचं अपयश आहे. लवकरात लवकर पाण्याचा प्रश्न सोडवला गेला नाही तर आम्ही तीव्र आंदोलन करू. गेले 2ते 3 महिने झाले सिडको कडून कोणतेही ठोस आश्वासन मिळत नसल्याने कामोठेकर जनतेने महाविकास आघाडी कामोठे विभाग मार्फत सिडकोच्या पाणी पुरवठा विभाग सेक्टर 6अ मध्ये मा. आ. बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन केले, यावेळी महिलांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना अक्षरशः धारेवर धरले, शेवटी सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून सेक्टर 17 आणि 18 मध्ये नवीन पाईप 23 तारखे पर्यंत आणण्यात येईल तर प्रत्यक्ष काम 27 ऑक्टोबर ला सुरु होईल. तसेच सेक्टर 34,35 आणि 36 मध्ये नवीन पाईप लाईन चा प्रास्तव मान्यते करिता पाठवला असून एक महिन्यात निविदा काढण्यात येतील. तर ज्या ठिकाणी कमी पाणी पुरवठा होतो तिथे तात्पुरता स्वरूपात काही दिवसांसाठी टँकर द्वारे पाणी पुरवण्यात येईल, लवकरच कामोठे ला नियमित पाणी पुरवठा सुरु होईल असे लेखी आश्वासन दिल्या नंतरच नागरिकांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले. यावेळी मा. आ. बाळाराम पाटील यांच्या सोबत मा. नगरसेवक शंकर म्हात्रे, प्रमोद भगत, सखाराम पाटील, लिना गरड, शेकाप कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे,ॲड.सिद्धार्थ साळवी, शिवसेनेचे प्रभाकर गोवारी, अवचित राऊत, रंजना सलोडीकर, रमेश गोरे, उषा झणझणे, संगीता राऊत, कुणाल भेंडे, सुनील शिरीषकर, मनसे शहर अध्यक्ष मनोज कोठारी, रुपाली धिवार, विश्वास भगत, सचिन झणझणे, ज्ञानेश्वर म्हात्रे, मधुकर सुरते, प्रमोद म्हात्रे, राहुल पाखरे तसेच बहुसंख्येने विविध सोसायटी मधील रहिवाशी उपस्थित होते.

## बदलापूरमध्ये 'स्वच्छतेची दिवाळी' उपक्रम

# २५ हजार दिव्यांनी उजळले शहरातील चौक

**बदलापूर, दि. २० : प्रतिनिधी**

बदलापूर शहरात 'स्वच्छतेची दिवाळी' या उपक्रमांतर्गत नगरपालिकेने शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी विशेष प्रयत्नांची परंपरा कायम ठेवली आहे. मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या मोहिमेद्वारे शहरात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. रस्त्यावरील दुभाजकांना रंगरंगोटी, चौक स्वच्छ करून सजावट, तसेच रस्त्यांवरील डेब्रिज हटविण्याची मोहीमही राबविण्यात आली. संपूर्ण शहर स्वच्छ करण्यात आले. यानंतर, दिवाळीच्या पहिल्या दिवशी शहरातील १० प्रमुख चौकांमध्ये २५ हजारांहून अधिक दिव्यांची आकर्षक रोषणाई करण्यात आली. या उपक्रमांमुळे शहरात स्वच्छता, सुंदरता आणि उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी नगरपालिकेच्या आरोग्य विभाग आणि बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या रोषणाईमुळे शहराचा उत्सवी आणि स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला. यासोबतच, बदलापूर नगरपालिका प्रशासनाने शहरभर स्वच्छतेची मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.

# मस्त साबुदाणा भेळ

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, उपवासाला साबुदाण्याची खिचडी बनवली जाते. हा झटपट होणारा पदार्थ आहे. पण प्रत्येक वेळी साबुदाणा खिचडी खाऊन खूप कंटाळा येतो. उपवासाचे इतर पदार्थ वेळखाऊ असतात. अशावेळी झटपट होणारी साबुदाणा भेळ ट्राय करून बघा.

**सामग्री:** अर्धा कप साबुदाणा, एक बटाटा, दाण्याचं कूट एक चमचा, थोडे काजू, एक चमचा लिंबाचा रस, सैंधव मीठ, दोन चमचे शेंगदाणा तेल, बटाट्याचा फराळी चिवडा, चिरलेली कोथिंबिर.

**कृती:** साबुदाणा धुवून दोन ते तीन तास भिजवून ठेवा. बटाट्याचे छोटे तुकडे करून घ्या. आता गॅसवर कढई ठेवा. त्यात तेल घाला. तेल थोडं गरम झाल्यावर त्यात बटाटे



घालून सोनेरी रंगावर तळून घ्या. काजूचे तुकडे करून घ्या. आता कढईत काजूचे तुकडे आणि शेंगदाणे घालून तळून घ्या. बटाटे, काजू आणि शेंगदाणे एका भांड्यात काढून ठेवा. आता याच तेलात साबुदाणा परतून घ्या. आता हा साबुदाणा भांड्यात काढा. त्यात तळलेले बटाटे, काजू आणि शेंगदाणे घाला. चवीनुसार मीठ घाला. त्यात बटाट्याचा चिवडा घालून हलवून घ्या. वरून कोथिंबिर घाला. आता लिंबाचा रस घालून मिक्स करा. यात डाळिंबाचे दाणेही घालता येतील.




## शेर की जुबानी

| | | |
|---|---|---|
| एक परवाह ही बताती है कि ख्याल कितना है, वरना कोई तराजू नहीं होता, रिश्तों में। | जिंदगी गुजर जाए, पर दोस्ती कम ना हो, याद हमें रखना चाहे पास हम ना हो। | काश दिल की आवाज में इतना असर हो जाए, हम याद करें और उसको खबर हो जाए। |



# ...अन्यथा लवकर म्हातारे व्हाल

**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, व्यायामामुळे तुम्ही तंदुरुस्त होता. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. सकाळी छान ताजंतवानं वाटतं. हे जरी खरं असलं तरी काही चुकांमुळे तुम्ही खूप लवकर म्हातारे दिसू लागता. व्यायाम करताना कोणत्या चुका होतात ? जाणून घेऊ.

✻ व्यायाम करताना शारीरिक स्थितीचा विचार करा. जीममध्ये व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने उभं राहिल्याने, वाकल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याला बाक येतो. मग तुम्ही वाकून चालू लागता. हे टाळण्यासाठी व्यायाम करताना शरीराच्या स्थितीकडे लक्ष द्या. चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

✻ कार्डिओ हा खूप चांगला व्यायामप्रकार असला तरी त्याच्या अतिरेकाने शरीराचं नुकसान होऊ शकतं. विशिष्ट वयानंतर हाडं आणि स्नायूंना पुरेसा व्यायाम मिळाला नाही तर त्यांच्या कार्य मंदावतं. तसंच १८ ते ५० या वयोगटातल्या व्यक्तींनी वेट लिफ्टिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करावं, असं एक संशोधन सांगतं. स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे स्नायूंना बळकटी मिळते. शिवाय कॅलरीही खर्च होतात.

✻ 'हाय इंटेंसिटी इंटरवल ट्रेनिंग' गरजेचं आहे. या व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. शारीरिक क्षमताही वाढते. या सगळ्यामुळे आपण बराच काळ तरुण रहातो.

✻ शरीर ताणण्याच्या व्यायामाकडे दुर्लक्ष करू नये. व्यायामाआधी आणि नंतर शरीर ताणायला हवं. शरीर ताणण्याचे व्यायाम केले नाहीत तर स्नायू आणि त्यातल्या टिश्यूंवर अकारण ताण येतो. तसंच या व्यायामामुळे शरीर लवचिक होतं आणि व्यायाम करताना त्रास होत नाही.

✻ सतत जीममध्ये व्यायाम करत राहिल्याने आपण तंदुरुस्त राहू हा समज चुकीचा आहे. व्यायामाप्रमाणेच शरीराला विश्रांतीचीही गरज असते. स्नायूंची झीज भरून काढण्यासाठी शरीराला वेळ देणं गरजेचं आहे. त्यामुळे एखादा दिवस विश्रांती घ्या.

# सुजीतकुमारच्या यशाची सांगीतिक किनार

**अचिव्हर**

बिहासमधील सुजीत कुमार यांनी फक्त ५० हजार रुपयांमध्ये मेहनतीने आणि आवडीने संगीतजगतात ठसा उमटवला आहे. सुजीतने छोट्या गुंतवणुकीतून स्टुडिओ सुरू केला होता. पुढे धाडसाने आणि समर्पणभावनेतून काम केल्यामुळे त्याचा हाच 'राधिका स्टुडिओ' कोसी प्रदेशातील एक प्रसिद्ध नाव बनले आहे. हा स्टुडिओ सुजीतची यशोगाथाच नाही तर अनेक तरुण प्रतिभावान कलाकारांच्या स्वप्नांना एक व्यासपीठदेखील प्रदान करतो.

सुजीतला लहानपणापासूनच संगीताची आवड आहे. संगीत शिकण्यासाठी त्याने अनेक राज्यांमध्ये प्रवास केला आहे. त्याला नवोदित कलाकारांना शिकवू शकेल अशा एका स्टुडिओच्या उभारणीची आस होती. परंतु निधीअभावी



स्टुडिओ उघडण्यात अडचणी आल्या. कसेबसे ५५ हजार रुपये उभे करता आले. मात्र स्थानिक कलाकारांसाठी आज हाच स्टुडिओ वरदान ठरला आहे. सहरसा येथील नया बाजार बायपास रोडवर असणारा हा स्टुडिओ अनेकांना घडवतो. येथे केवळ हजार रुपयांमध्ये गाणे रेकॉर्ड करता येते तर नवीन स्वर तयार करण्यासाठी तीन हजार रुपये खर्च येतो. कोसी प्रदेशात असा परवडणारा स्टुडिओ दुर्मीळ म्हणावा लागेल. जिल्ह्यातील हा पहिलाच असा स्टुडिओ आहे जिथे उच्च दर्जाच्या रेकॉर्डिंगसोबतच नवीन कलाकारांना योग्य दिशा दिली जाते.

आपल्या वाटचालीबद्दल सुजीत म्हणतो, कलाकारांच्या कौशल्यांना चालना देणे आणि त्यांना देशात तसेच परदेशात ओळख मिळवून देणे हेच माझे उद्दिष्ट आहे. या स्टुडिओने अनेक लहान-मोठ्या गायकांना संधी दिली असून ते संगीत जगतात नाव चमकवत आहेत. सुजीत आता कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचा मालक आहे. स्वाभाविकच तो अनेकांसाठी एक उदाहरण बनला आहे. सुरुवातीच्या काळात त्याने अनेक अडचणींचा सामना केला पण धैर्याने व्यवसायात झेप राहिली. आज त्याने अनेक ठिकाणी जमीन खरेदी केली असून एक आलिशान घरदेखील बांधले आहे.


## टेक्नो टॉक




### राऊटरचा वेग वाढवायचाय ?

आजकाल प्रत्येक घरात वाय-फाय राउटर असतो; परंतु इंटरनेट स्पीडबद्दल तक्रारीही बऱ्याच असतात. इंटरनेट स्पीड कमी झाल्यास व्हिडीओ स्ट्रीमिंगमध्ये व्यत्यय येणे, वेबपेज उघडण्यास विलंब आणि वारंवार नेटवर्क डिस्कनेक्ट होणे आदी समस्या सतावतात. बऱ्याचदा लोक कंपनीची सेवा चांगली नाही... असे म्हणत वैतागतात. परंतु यामागील खरे कारण घरात चुकीच्या ठिकाणी राउटर ठेवणे आणि त्याच्या जवळ ठेवलेल्या वस्तूमध्येही दडलेले असू शकते. वाय-फाय रेडिओ वेव्सवर काम करतो. त्यामुळेच राउटरजवळ मोठे आरसे असतील तर सिग्नल रिफ्लेक्ट होऊ शकतात आणि दिशा बदलून कव्हरेज कमी होते. त्याचप्रमाणे लोखंड-स्टीलदेखील रेडिओ वेव्सना ब्लॉक करतात. अशा वस्तू जवळ असल्यास नेटवर्क कमकुवत होते. हे लक्षात घेता राउटर कधीही काचेच्या किंवा धातूच्या वस्तूंजवळ ठेवू नये. स्पीकर्स, माऊस, की बोर्ड सारख्या ब्लूटूथ डिव्हाइसेसचाही वाय-फायवर परिणाम होतो. ब्लूटूथ आणि वाय-फाय दोन्ही २.४ गीगाहर्ट्झ फ्रिक्वेन्सीवर चालतात. त्यामुळे वायफाय स्पीडमध्ये व्यत्यय वाढतो आणि इंटरनेटचा वेग कमी होतो. हे टाळण्यासाठी ब्लूटूथ गॅझेट्सपासून राउटर काही अंतरावर ठेवणे चांगले.

## स्मार्ट टॉक




### ...तरी कॉल करता येणार

'भारत संचार निगम लिमिटेड' (बीएसएनएल) ने ग्राहकांसाठी एक आकर्षक आणि नावीन्यपूर्ण सेवा सुरू केली आहे. 'व्हीओवायफाय कॉलिंग' ने आता 'बीएसएनएल' ग्राहकांना मोबाइल नेटवर्क नसतानाही 'वायफाय' किंवा ब्रॉडबँडच्या मदतीने स्पष्ट आणि अखंडित कॉलिंगचा अनुभव घेता येणार आहे. ही सेवा सध्या दक्षिण आणि पश्चिम भारतातील ग्राहकांसाठी उपलब्ध असून लवकरच देशभरात त्याचा विस्तार होणार आहे. विशेष बाब म्हणजे ही सेवा सर्व बीएसएनएल ग्राहकांसाठी पूर्णपणे मोफत आहे. 'बीएसएनएल'ने २५ व्या वर्धापनदिनानिमित्त ही सेवा सुरू केली आहे. दूरसंचार विभागाचे सचिव नीरज मित्तल यांनी नुकतेच या सेवेचे सॉफ्ट लॉन्च केले. 'व्हीओवायफाय' सेवेमुळे ग्राहकांना घरात किंवा कमी नेटवर्क असणाऱ्या भागातही वायफायद्वारे कॉल करता येणार आहे. यासाठी फक्त 'व्हीओवायफाय' सपोर्ट करणारा स्मार्टफोन आवश्यक आहे जो बहुतांश आधुनिक अँड्रॉइड आणि आयफोनमध्ये आधीपासून उपलब्ध असतो. 'बीएसएनएल'ने याशिवाय देशभरात फोर जी नेटवर्कचा विस्तारही केला आहे. कंपनीने एक लाखांहून अधिक मोबाइल टॉवर्स उभारले असून आणखी ९७ हजार पाचशे टॉवर्स उभारण्याची योजना आहे. मुंबईत फोर जी आणि ई-सीम सेवाही सुरू झाल्या आहेत. या सर्व घडामोडी 'बीएसएनएल'ला जिओ, एअरटेल आणि व्होडाफोन-आयडियासारख्या खासगी कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी तयार करत आहेत.

# करिअरसाठी योग्य कोर्स निवडा


**हे लक्षात घ्या**

करिअरसाठी किंवा शिक्षणासाठी मुख्य अभ्यासक्रमाबरोबर पूरक प्रमाणपत्र अभ्यासक्रम निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवा.

✻ **स्पष्ट उद्देश ठरवा :** तुम्हाला कोर्स नोकरीसाठी, व्यवसायासाठी की ज्ञानासाठी निवडायचा आहे हे उद्देश स्पष्ट असेल तर योग्य कोर्स निवडणे सोपे जाते.

✻ **संशोधन करा :** तुमच्या इंडस्ट्रीमध्ये सध्या कोणत्या कौशल्यांची मागणी आहे ते पाहा. (उदा., डेटा नालिटिक्स, डिजिटल मार्केटिंग, वेब डेव्हलपमेंट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट, कोडिंग, ग्राफिक डिझाइन इ.). त्यानुरुप प्रसिद्ध आणि विश्वासार्ह संस्थांचे अभ्यासक्रम शोधा.

✻ **आढावा घ्या :** आधीच्या विद्यार्थ्यांचे रिव्ह्यूज वाचून कोर्सची गुणवत्ता समजून घ्या. कोर्समध्ये प्रत्यक्ष काय शिकवले जाणार आहे



ते सिलॅबसवरून तपासा.

✻ **वेळेचे व्यवस्थापन :** कोर्ससाठी आठवड्यातून किती तास द्याल ते आधीच ठरवा. एक नियमित वेळापत्रक बनवा आणि त्याच्याशी जुळवून घ्या.

✻ **सक्रिय सहभाग :** फक्त व्हिडिओ पाहून कोर्स पूर्ण करू नका. प्रॅक्टिकल साइनमेंट्स, क्विझेस आणि फोरममध्ये सक्रियपणे भाग घ्या. हे शिकण्याच्या प्रक्रियेसाठी खूप महत्त्वाचे आहे.

✻ **प्रमाणपत्राचा योग्य वापर करा :** अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर मिळालेले सर्टिफिकेट लिंक्डेन प्रोफाइलवर जोडा. इंटरव्ह्यूदरम्यान तुम्ही हे नवीन कौशल्य शिकल्याचा उल्लेख करू शकता.

# इन्स्टाग्रामचे मॅप फीचर

**जाणून घ्या**

इंस्टाग्रामने भारतीय वापरकर्त्यांसाठी एक नवे आणि रोमांचक मॅप फीचर आणले आहे. ते रिअल टाइम लोकेशन शेअर करण्याची सुविधा देते. हे फीचर ऑगस्टमध्ये जागतिक स्तरावर लॉन्च झाले होते. आता ते भारतातही उपलब्ध आहे. हे फीचर तुम्हाला जवळपासच्या पार्ट्या, कार्यक्रम आणि ट्रेंडिंग ठिकाणांची माहितीही देईल.



या मॅपद्वारे तुम्ही कॅफे, लोकप्रिय ठिकाणे किंवा मित्रांच्या प्रवासाशी संबंधित पोस्ट, रील्स व स्टोरीज पाहू शकता. उदाहरणार्थ, तुमच्या शहरात कोणत्या ठिकाणी खास प्रोग्राम होत आहेत किंवा कोणती जागा ट्रेंडिंग आहे, याची रिअलटाइम माहिती इथे मिळेल. हे फीचर स्नॅपचॅटप्रमाणेच आहे; पण इंस्टाग्रामने यात काही खास वैशिष्ट्ये जोडली आहेत. अर्थात हे गुगल किंवा ॲपल मॅप्ससारखे नेव्हिगेशनसाठी नाही तर इंस्टाग्राम ॲपमधील एक स्वतंत्र फीचर आहे.

गोपनीयतेच्या दृष्टीने इंस्टाग्रामने यात विशेष काळजी घेतली आहे. डीफॉल्ट सेटिंगनुसार लोकेशन शेअरिंग बंद असते. तुम्हाला ते स्वतः चालू करावे लागेल. त्याचबरोबर एक इंडिकेटर तुम्हाला लोकेशन शेअर होत आहे की नाही हे दाखवेल; पण लक्षात ठेवा एकदा लोकेशन शेअरिंग सुरू केले तर ते बंद करेपर्यंत सुरू राहील.

या फीचरमुळे इंस्टाग्रामचा अनुभव मजेदार तर होणारच आहे; पण एक छोटीशी चूकही तुम्हाला महागात पडू शकते हे लक्षात घ्यायला हवे. लोकेशन सेटिंग सुरू करताना चूक झाली तर तुमची माहिती नको त्या कनेक्शनंसोबतही शेअर होऊ शकते. त्यामुळे गोपनीयतेची काळजी घेण्यासाठी सेटिंग्ज तपासायला विसरू नका.

## स्टाईल मंत्रा

### दाढी कोरण्याबरोबरच रंगसंगतीलाही प्राधान्य



सणासुदीच्या हंगामात तरुणांचे एकमेव आकर्षण केवळ पोशाख, शूज आणि बाईक नाहीत. सध्या दाढीची फॅशन प्रचलित आहे. विविध सलूनमधील तरुण हेअरस्टाइलसह वेगवेगळ्या दाढीच्या लूकवर लक्ष केंद्रित करत आहेत. आजकाल तरुणांना दाढीचे विंटेज किंवा व्ही-आकार आवडतात.

खरं तर, ही शैली जुन्या काळातील राजे आणि सम्राटांशी जोडली जात आहे. या शैलीमध्ये, दाढी हनुवटीवर अधिक ठळकपणे दिसते तर चेहऱ्याच्या उर्वरित भागावर कमी दिसते. यात बरगंडी आणि सोनेरी कलरिंगला प्राधान्य दिले जात आहे. तरुण दाढीच्या मऊपणावर लक्ष केंद्रित करत आहेत. दाढी मऊ ठेवण्यासाठी तरुणांनी स्मूथिंग आणि स्टायलिंग उत्पादने वापरण्यास सुरुवात केली आहे. यासाठी प्रथिने, सीरम, शॅम्पू, तेल आणि कंडिशनर यासारख्या उत्पादनांचा वापर केला जात आहे. आता दाढीचे विशिष्ट शॅम्पू, कंडिशनर आणि कंगव्यांची मागणीही वाढत आहे. दाढी राखण्यासाठी तरुण स्पाकडे वळत आहेत. दाढीशी जुळणारे हेअरस्टाईलदेखील आकर्षक लूक देण्यास कारक ठरत आहे.

# तिच्या पालकांचा विरोध आहे!



**मॅच मेकिंग**

मी २८ वर्षांचा तरुण असून गेल्या चार वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये आहे. आमच्या दोघांच्या नात्यात जातीचा अडसर आहे. आमची जात वेगळी असल्यामुळे तिच्या घरच्यांच्या आमच्या नात्याला विरोध आहे. आमच्या नात्याबद्दल कळल्यानंतर तिच्या घरच्यांची तिच्याशी अबोला धरला आहे. माझ्या घरातून वडिलांचा पाठींबा आहे. पण मैत्रिणीचे पालक खूपच जुन्या विचारांचे असल्याने त्यांनी तिला सक्त ताकीद दिली आहे. माझ्याशी संपर्क ठेवला तर ते तिचं बाहेर जाणंच बंद केलं जाणार आहे. त्यामुळे तिनेही हे नातं संपवायचं ठरवलं आहे. पण आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे. एकमेकांपासून दूर जाण्याचा विचार आम्ही करू शकत नाही. अशा परिस्थितीत मी काय करू?

**उत्तर :** तुमचं नातं खूपच गुंतागुंतीचं होऊन बसलं आहे. अशा परिस्थितीत तिच्या पालकांना समजावून सांगणं गरजेचं आहे. यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा. तुझ्या मैत्रिणीला पालकांशी बोलायची भीती वाटत असेल तर नात्यातल्या काही लोकांना याची जबाबदारी देता येईल. नात्याला असणारा विरोध ही बाब फारच नाजूक आहे. मुलीच्या पालकांचं मन वळवण्यासाठी बरीच मेहनत करावी लागेल. तुम्हाला धीर धरावा लागेल. त्यांची समजूत घालणं नक्कीच सोपं नाही.

# हंपीला जाताय, मग दोन दिवस काढाच


**भटकंती**

हंपी इतिहास, शिल्पकला आणि निसर्ग यांचा संगम असणारं अद्भुत स्थळ आहे. इथे सुमारे ३०० पेक्षा अधिक प्राचीन मंदिरे आहेत. पण तुमच्याकडे केवळ दोन दिवसांचा वेळ असेल तर काही निवडक ठिकाणंच प्लान करा. या स्थळांचे दर्शन तुमचा प्रवास संस्मरणीय बनवतील.

✻ **विरुपाक्ष मंदिर–** दिवसाची सुरुवात हंपीतील सर्वात प्राचीन आणि प्रसिद्ध विरुपाक्ष मंदिरापासून करा. येथे लक्ष्मी नावाची हत्तीण आहे, जी भक्तांना आशीर्वाद देते.

✻ **सास्तीवेकाळू गणेश आणि कडेलिकालू गणेश–** विरुपाक्ष मंदिराच्या जवळच दोन भव्य गणेश मूर्ती असून त्या दगडात कोरलेल्या आहेत. त्यांची शिल्पकला डोळ्याचं पारणं फेडणारी आहे.

✻ **हंपी बाजार आणि मोनोलिथिक नंदी–** त्याच भागात तुम्ही हंपी बाजाराचे भग्नावशेष पाहू शकता. येथे एक भव्य मोनोलिथिक नंदी (बैल) आहे तो सहज लक्ष



वेधून घेतो.

✻ **मातंग हिल (सनसेट पॉईंट)–** जेवणानंतर तुम्ही मातंग डोंगरावर जाऊ शकता. ही १५-२० मिनिटांची चढण आहे. येथून दिसणारा सूर्यास्त म्हणजे स्वर्गीय अनुभव आहे. येथून दिसणारं संपूर्ण हंपी सोनसळी प्रकाशात न्हालेलं पाहणं तुम्ही कधीच विसरणार नाही.

✻ **अंजनाद्री पर्वत–** दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून अंजनाद्री डोंगरावर जा. हे हनुमानाची जन्मभूमी मानला जाते. फक्त १५ मिनिटांत शिखरावर पोहोचता येतं. तिथून दिसणारा सूर्योदय अविस्मरणीय असतो.

✻ **विठ्ठल मंदिर आणि रथ–** नंतर पहा विठ्ठल मंदिर, जे हंपीचं हायलाईट आहे. इथलाच प्रसिद्ध रथ आपल्या ५० रुपयांच्या नोटेवर आहे. मंदिर परिसर विस्तृत आणि सौंदर्यपूर्ण आहे.

✻ **रॉयल सेंटर–** विठ्ठल मंदिराजवळच रॉयल सेंटर असून तिथे राजा वास्तव करत होता. येथे पुष्करणी, म्युटनामी डिब्बा, यासारखी महत्त्वाची ठिकाणं आहेत.

✻ **बडविलिंग आणि उग्र नरसिंह–** पुढे भेट द्या बडविलिंग (शिवलिंग) आणि उग्र नरसिंह मूर्तीला. या दोन्ही अतिशय देखण्या आणि प्रभावी शिल्पकृती आहेत.

✻ **कृष्ण मंदिर–** अतिशय शांत आणि वास्तुशिल्पाने समृद्ध असलेलं हे मंदिर तुम्हाला नक्की आवडेल. इतिहासप्रेमींसाठी ही एक पर्वणी आहे.

✻**अच्युतराया मंदिर व हेमाकुट डोंगर–** संध्याकाळी जा अच्युतराया मंदिर बघायला. येथे पर्यटकांची गर्दी कमी असते. त्यामुळे शांत वातावरणात मंदिर आणि आजूबाजूचा परिसर अनुभवता येतो. हवं असल्यास येथे एखादी बुलॉक कार्ट राइडसुद्धा करता येते.

# फॅशनविश्वाची वेधक वाट

**करिअर**

फॅशनच्या दुनियेत करिअर करायचं असेल तर योग्य कॉलेज आणि कोर्स निवडणं गरजेचं आहे. ग्लॅमर, क्रिएटिव्हिटीसोबतच या क्षेत्रात उत्तम संधी आहेत. इथं डिग्री मिळताच उत्तम प्लेसमेंटची शक्यता असते. फॅशनविश्वामध्ये यश मिळवण्यासाठी केवळ कौशल्यच नव्हे, तर योग्य शैक्षणिक आधारही आवश्यक असतो. ही महाविद्यालयं केवळ सर्जनशील कल्पनाच वाढवत नाहीत तर व्यावहारिक ज्ञान आणि उद्योग एक्सपोजरदेखील देतात. यामुळेच या कॉलेजांमधून पदवी मिळविणाऱ्या उमेदवारांना नोकरीच्या उत्तम संधी मिळतात. आज अशाच काही शिक्षणसंस्थांची माहिती घेऊ या.

**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (निफ्ट)**

'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' (निफ्ट) ही भारतातील या क्षेत्राशी संबंधित सर्वात प्रतिष्ठेची संस्था आहे. तिचे देशभरात १८ कॅम्पस असून येथे बॅचलर ऑफ डिझाइन (बी.डी.एस.), मास्टर ऑफ डिझाइन (एम.डी.एस.) आणि फॅशन मॅनेजमेंटसारखे नानाविध अभ्यासक्रम राबवले जातात. या कॉलेजची फी वर्षाला सुमारे तीन ते सहा लाख रुपये असून



निफ्ट प्रवेश परीक्षेच्या आधारे येथे प्रवेश दिला जातो.

**एमिटी स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी**

'एमिटी स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी' हा एमिटी विद्यापीठाचा एक भाग असून तिथे 'फॅशन डिझाइन' आणि 'फॅशन टेक्नॉलॉजी'चे अभ्यासक्रम राबवले जातात. येथे विद्यार्थ्यांना थिअरी आणि प्रॅक्टिकल या दोन्हीमध्ये प्रावीण्य दिले जाते. या संस्थेची फी वर्षाला सुमारे तीन ते सहा लाख रुपये असून निवड प्रक्रियेत गुणवत्ता आणि मुलाखतीचा समावेश आहे.

**पर्ल अकादमी**

'पर्ल अकादमी' ही एक अग्रगण्य खासगी फॅशन संस्था असून तिथे फॅशन डिझाइन, कम्युनिकेशन डिझाइन आणि स्टायलिंग यासारखे अभ्यासक्रम आहेत. इथे इंडस्ट्री एक्सपोजर आणि एक्स्पर्ट ट्रेनरच्या मदतीने विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल नॉलेज मिळते. दरवर्षी सुमारे चार ते आठ लाख रुपये शुल्कदर असून प्रवेश परीक्षा आणि मुलाखतीच्या माध्यमातून येथे प्रवेश दिला जातो.

या टॉप महाविद्यालयांमध्ये फॅशनशी संबंधित अभ्यासक्रमांचा कालावधी तीन-चार वर्षे (अंडरग्रॅज्युएट) आणि दोन वर्ष (पदव्युत्तर) असा असतो. महाविद्यालयानुसार शुल्काची रेंज वेगवेगळी असते; पण अभ्यासात केलेली ही गुंतवणूक करिअरचा भक्कम पाया रचण्यास मदत करते. पदवी पूर्ण होताच मोठमोठ्या आस्थापनांमध्ये काम करण्याची संधी मिळते. कॉलेजांमध्ये प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पडते. संस्थांच्या अधिकृत संकेतस्थळावर सविस्तर माहिती, अर्ज फॉर्म आणि शुल्करचनेशी संबंधित तपशील उपलब्ध आहेत. तुम्ही थेट या गोष्टी पाहू शकतात.




# सलग चौथ्या दिवशी शेअर बाजारात तेजी

## निफ्टी १३३ तर सेन्सेक्स ४११ अंकांनी वाढले

**मुंबई, दि. २० प्रतिनिधी**

सोमवारी शेअर मार्केटमध्ये तेजी कायम राहिली आणि कॉर्पोरेट अर्निंग सिझनमध्ये गुंतवणूकदारांचा उत्साह टिकून राहिला. सेंसेक्समध्ये ४११ अंकांची वाढ झाली आणि तो ८४३६३ या स्तरावर बंद झाला. निफ्टीमध्ये १३३ अंकांची तेजी झाली आणि तो २५८४३ या स्तरावर बंद झाला. दिवाळी आठवड्यात बाजार सलग चौथ्या दिवशी वाढत राहिला. फेस्टिव्ह सिझनमध्ये गुंतवणूकदारांचा उत्साह कायम राहिल्याने बाजारात सातत्याने तेजी दिसून आली. कॉर्पोरेट अर्निंग सिझनमध्ये कंपन्यांच्या कमाईने गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे.



रिलायन्स इंडस्ट्रीज, भारती एअरटेल, इन्फोसिस, एसबीआय आणि ॲक्सिस बँक यांसारख्या दिग्गज शेअर्सनी निफ्टी ५० मध्ये तेजीचे नेतृत्व केले. निफ्टी मिडकॅप १०० मध्ये ०.७५ टक्क्यांची वाढ झाली, तर निफ्टी स्मॉलकॅप १०० मध्ये ०.४६ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे शेअर्स ३.६० टक्क्यांच्या वाढीसह १,४६८ रुपयांच्या स्तरावर बंद झाले. निफ्टी पीएसयू बँक इंडेक्स २.८७ टक्क्यांच्या वाढीसह सर्वात पुढे राहिला. त्यानंतर निफ्टी ऑईल अँड गॅस आणि निफ्टी आयटी इंडेक्स अनुक्रमे १.४१ टक्के आणि १ टक्के वाढले. निफ्टी मीडीया आणि निफ्टी फार्मा इंडेक्सही ०.८७ टक्क्यांच्या वाढीसह पुढे सरकले.

**सेन्सेक्स 84,363**

**निफ्टी 25,843**

सेक्टोरियल इंडेक्समध्ये निफ्टी ऑटो इंडेक्स सर्वात कमजोर ठरला, जो ०.१६ टक्क्यांनी घसरला.

सप्टेंबर तिमाहीतील पहिल्या तिमाहीच्या उत्पन्नात सर्वच क्षेत्रांचे प्रदर्शन चांगले राहिले असून यावरून सूचित होते की उत्पन्न आता आपल्या नीचांकी स्तरावर पोहोचले आहे. बँकांनी एसेट क्वालिटी आणि मार्जिनमध्ये सुधारणा दाखवली आहे, तर ग्राहक वस्तू कंपन्यांनी आतापर्यंत मजबूत आकडे सादर केले आहेत.

निफ्टीमध्ये तेजीचा ट्रेंड कायम आहे. निफ्टीने सोमवारी २५९०० च्या स्तरापेक्षा वर जाऊन ट्रेड केले. येत्या ट्रेडिंग सत्रात निफ्टी २६००० च्या स्तराच्या आसपास पोहोचू शकतो. निफ्टीने सोमवारी २५९२६ चा दिवसातील उच्चांक गाठला. निफ्टी आता हळूहळू २६२७७ च्या ऑल टाइम हाय स्तराच्या जवळ पोहोचत आहे. निफ्टीसाठी आता २५७५० चा स्तर मजबूत सपोर्ट म्हणून काम करू शकतो. निफ्टीने आपला बेस शिफ्ट केला असून आता २५७००-२५८०० चा परिसर बायिंग झोन मानला जात आहे.

# मालक असावा तर असा! सलग तिसऱ्या वर्षी ५१ कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून दिल्या आलिशान कार

**चंदीगड, दि. २० वृत्तसंस्था**

चंदीगडमधील एम. के. भाटिया या उद्योजकाने दिवाळी भेट म्हणून त्यांच्या कर्मचाऱ्यांना ५१ नवीन आलिशान कार भेट दिल्या आहेत. पंचकुला येथील मिट्स हेल्थकेअरचे संस्थापक आणि सामाजिक कार्यकर्ते एम. के. भाटिया यांनी नुकतेच त्यांच्या सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारच्या चाव्या सुपूर्द केल्या.



सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त आलिशान कार भेट देण्याचे भाटिया यांचे हे तिसरे वर्ष आहे. लिंक्डइनवरील एका पोस्टमध्ये भाटिया यांनी लिहिले, “गेल्या दोन वर्षांपासून, आम्ही आमच्या सर्वोत्तम कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त कार भेट देऊन त्यांचा सन्मान करतो. या वर्षीही ही परंपरा कायम ठेवली आहे.”

“मी त्यांना कधीही कर्मचारी म्हणून वागवले नाही. ते माझ्या जीवनातील रॉकस्टार सेलिब्रिटी आहेत. आमच्या प्रवासातील प्रत्येक क्षणाला ब्लॉकबस्टर बनवणारे तारे आहेत. काही कर्मचाऱ्यांना आधीच कारच्या चाव्या दिल्या आहेत. आणखी काही कार लवकरच येणार आहेत. ही दिवाळी खूप खास असणार आहे!”, असे म्हणत भाटिया यांनी कर्मचाऱ्यांना कारच्या चाव्या देतानाचे फोटो शेअर केले आहेत.

भाटिया यांनी या आठवड्यात काही कर्मचाऱ्यांना या आलिशान कार सुपूर्द केल्या आहेत. त्यानंतर शोरूमपासून कंपनीच्या मिट्स हाऊस ऑफिसपर्यंत “कार गिफ्ट रॅली” काढण्यात आली होती.

दरवर्षी इतक्या महागड्या भेटवस्तू का देता, असे विचारले असता भाटिया म्हणाले, “माझे सहकारी माझ्या औषध कंपन्यांचा कणा आहेत. त्यांचे कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि समर्पण हे आमच्या यशाचा पाया आहे. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन देणे आणि एका वेगळ्या उंचीवर नेणे हे माझे एकमेव ध्येय आहे.”

# मुलांमधील पोटाचा फ्लू आजार आणि उपचार

**बदलत्या ऋतूनुसार वातावरणात आणि हवामानात बदल होतोच. अर्थातच या बदलत्या वातावरणामुळे अनेक प्रकारच्या विषाणूजन्य,जिवाणूजन्य आणि बुरशीजन्य आजाराची लागण होते आणि हा आजार जर संसर्गजन्य असेल तर तो झपाट्याने पसरतो. सध्या हिवाळा सुरु आहे आणि तापमानात प्रचंड घट झालेली असल्यामुळेच अनेक प्रकारचे विषाणूजन्य आणि बुरशीजन्य आजार हे हवेच्या आणि पाण्याच्या मध्यमातून पसरण्याची भीती असते. थंडीच्या वातावरणात विशेषत: लहान बालकांना अशा आजारांची लागण लगेच होण्याची भीती असते. सध्या बालकांमध्ये पोटातील फ्लूचा आजार आणि त्याअनुषंगाने श्वसनाचे आजार लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. या फ्लू ची लक्षण नेमकी काय असतात?फ्लू होऊ नये म्हणून काळजी काय घ्यावी?आणि या आजारावर उपचार काय करायचे?या संधर्भात श्वसनविकारतज्ञ डॉ .छाया वजा यांच्याशी साधलेला संवाद.**

१]हिवाळ्यात वातावरणात बदल होतो सध्या तापमान प्रचंड कमी आहे या वातावरणात विशेषत: बालकांना कोणते आजार होतात?

प्रौढा प्रमाणेच हिवाळ्याचा लहान बालकांवर खूप परिणाम होतो. लहान मुलांमध्ये हिवाळ्यात पोटाचा फ्लू हा आजार बळावताना दिसतोय. त्याच वेळी सर्दी,खोकला आणि श्वसनविकार देखील वाढतात. कमी तापमानामुळे तीव्र स्वरूपाचा ब्रॉंक्रायटयसिस आणि न्यूमोनिया देखील काही मुलांमध्ये दिसतो. हवामानातील बदलामुळे ज्या मुलांची प्रतिकारशक्ती कमी असते अशा मुलांना दमा,ब्रॉंक्रायटसीस सारखे दीर्घकालीन आजार देखील होतात. थंड वातावरणामुळे बालक विषाणूंच्या संपर्कात आल्याने गॅस्ट्रो इंटेरी संधर्भात आजाराची लागण बालकांना लगेच होते.



**लोकारोग्य**

२] बालकांमध्ये पोटाचा फ्लू हा आजार दिसतो त्याची लक्षण काय असतात?

लहान मुलांमध्ये प्रचंड प्रमाणात डोकेदुखी, अंगदुखी, ॲसिडिटी यासारख्या लक्षणासह तीव्र स्वरूपाचा ताप असेल तर हा ताप अजिबात अंगावर काढू नये. मुलांना तीन दिवसापेक्षा अधिक काळ जर ताप असेल तर ताबडतोप कोरोना चाचणी करून घेणे गरजेचे आहे. मुलांच्या शरीरात पाणायचे प्रमाण

**हॅलो डॉक्टर**

कमी झाल्याने त्यांना उलट्या आणि जुलाब होतात आणि प्रतिकार शक्ती देखील कमी होते. मुलांना पोटात दुखणे, भूक न लागणे अशी लक्षण देखील दिसतात.

३]अशा प्रकारच्या विषाणूजन्य आजारापासून मुलांना दूर ठेवण्यासाठी काय काळजी घ्यावी?

मुलांना संसर्गापासून वाचविण्यासाठी पालकांनी त्यांना गर्दीच्या ठिकाणी किंवा मोकळ्या ठिकाणी नेऊ नये .अस्वच्छ अन्न,शिळे अन्न आणि पाणी मुलांना देऊ नये. आजारी मुलांना शाळेत पाठवू नये. जेवणापूर्वी मुलांना हात साबणाने स्वच्छ धुवायला सांगावेत. मुलांच्या आहारात खिचडी,पालेभाजा आणि ताजा फळांचा समावेश करावा आणि साधा ताप किंवा खोकला असेल तर ताबडतोप वैद्यकीय सल्ला घ्यावा.

४]पोटाचा फ्लू या आजारावर वैद्यकीय उपचार कोणते आहेत?

जर मुलाला ताप असेल तर सुरवातीला तापावर प्रतिबंधात्मक उपचार म्हणून क्रोसीन गोळी दिली जाते. मात्र, हा ताप तीन दिवसापेक्षा जास्त काळ असेल आणि मुलाला डोकेदुखी, अंगदुखी, उलट्या, जुलाब अशी लक्षण दिसत असतील तर ताबडतोप वैद्यकीय उपचार सुरु करावेत. मुलाच्या शरीरातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी त्याला व्हायटल झेड पावडर पाण्यातून दर तासाने द्यावी. शिवाय मुलाला बाहेरचे काहीही खायला देऊ नये.मुलाला ताजा आणि सकस आहार द्यावा आणि जर परिस्थिती गंभीर असेल तर मुलाला ताबडतोप इस्पितळात दाखल करून पुढील उपचार सुरू करावेत.

## केअर हॉस्पिटल्सचे टेक महिंद्रासोबत भागीदारीत २४x७ पेशंट कॉल सेंटर सुरू

भारतातील आघाडीच्या आरोग्य सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या केअर हॉस्पिटल्सने जागतिक तंत्रज्ञान सेवा कंपनी टेक महिंद्रासोबत भागीदारीत



विकसित केलेल्या त्यांच्या नवीन अत्याधुनिक २४x७ बहुभाषिक कॉल सेंटरच्या लाँचची घोषणा केली. रुग्णांची उपलब्धता सुधारण्यासाठी, सेवा मानके मजबूत करण्यासाठी आणि व्यापक, किफायतशीर आणि सुलभ दर्जेदार आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या केअरच्या मुख्य नीतिमत्तेला पाठिंबा देण्यासाठी ही सुविधा डिझाइन केली गेली आहे.या लाँच कार्यक्रमाला केअर हॉस्पिटल्सचे वरिष्ठ नेतृत्व उपस्थित होते, मान्यवरांमध्ये श्री. शलभ डांग, मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी; श्री. विनोद रमण, गट मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, आयटी (क्यूसीआयएल); श्री. विजय सेठी, मुख्य आदरातिथ्य आणि रुग्ण अनुभव अधिकारी; श्री. राजीव चौरे, उपाध्यक्ष गुणवत्ता आणि मान्यता; नामपल्ली येथील एचसीओओ श्री. शशिकांत आग्सरे, स्ट्रॅटेजी अँड न्यू इनिशिएटिव्हज प्रमुख श्री. नवीन नारायणन आणि कॉल सेंटर ऑपरेशन्स प्रमुख सुश्री सिमरन कौर सेठी. टेक महिंद्राचे प्रतिनिधित्व करताना श्री. संजय घुरा, उपाध्यक्ष ऑपरेशन्स; श्री. कृष्णन कविक्कल, सहयोगी उपाध्यक्ष ऑपरेशन्स; श्री.

**जनआरोग्य**

कार्तिक, प्रादेशिक प्रकल्प प्रमुख; आणि व्यवसाय विकास आणि संक्रमण संघांचे सदस्य उपस्थित होते.

टेक महिंद्राशी भागीदारी केल्याने प्रगत ग्राहक संबंध व्यवस्थापन प्रणाली, अखंड रिअल-टाइम अपॉइंटमेंट वेळापत्रक आणि प्रशिक्षित कॉल सेंटर व्यावसायिक येतील. या संयोजनामुळे सर्व केअर रुग्णालयांमध्ये जलद प्रतिसाद वेळ, रुग्णांच्या विनंत्यांची कार्यक्षम हाताळणी आणि सातत्यपूर्ण, रुग्ण-प्रथम अनुभव मिळण्याची अपेक्षा आहे.

## गुणकारी जर्दाळू

जर्दाळू, त्यांची मखमली त्वचा आणि गोड, किंचित तिखट चव असलेले, हे केवळ एक स्वादिष्ट फळ नाही तर ते पोषक तत्वांचे पॉवरहाऊस देखील आहे. जर्दाळूमध्ये कॅलरीज कमी असतात परंतु फायबर, जीवनसत्त्वे आणि

**आरोग्यम् धन संपदा**

खनिजे जास्त असतात. त्यामध्ये विविध प्रकारचे अँटिऑक्सिडंट असतात आणि ते व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि लोहाचे उत्कृष्ट स्रोत आहेत. वाळलेल्या जर्दाळू हे ताज्या जर्दाळूंचे एक केंद्रित स्वरूप आहे आणि त्यामध्ये काही पोषक घटक जास्त प्रमाणात असतात. कोरडे केल्याने व्हिटॅमिन सीचे प्रमाण कमी होते, ते खनिजे आणि फायबरचे प्रमाण वाढवू शकते. तथापि, काही व्यावसायिकरित्या उपलब्ध असलेल्या वाळलेल्या जर्दाळूंमध्ये जोडलेल्या साखरेकडे लक्ष देणे देखील महत्त्वाचे आहे, ज्यामुळे त्यांचे आरोग्य फायदे कमी होऊ शकतात.जर्दाळू विविध प्रकारचे आरोग्य फायदे देतात जे तुमचे एकंदर कल्याण वाढवू शकतात. जर्दाळूमध्ये व्हिटॅमिन ए आणि बीटा-कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते, जे चांगली दृष्टी राखण्यासाठी आवश्यक असते. बीटा-कॅरोटीन हे एक अँटिऑक्सिडेंट आहे जे डोळ्यांना मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करण्यास मदत करते आणि वयोमानाशी संबंधित मॅक्युलर डिजनरेशनचा धोका कमी करू शकते, जे वृद्ध प्रौढांमध्ये अंधत्वाचे प्रमुख कारण आहे.जर्दाळूच्या बियापासून काढलेले जर्दाळू तेल बहुतेक वेळा त्याच्या हायड्रेटिंग गुणधर्मांसाठी स्किनकेअर उत्पादनांमध्ये वापरले जाते. व्हिटॅमिन ई आणि के समृद्ध, जर्दाळू कर्नल तेल त्वचेचे पोषण आणि मॉइश्चरायझेशन करण्यास मदत करते, निरोगी चमक वाढवते. याव्यतिरिक्त, जर्दाळूमध्ये आढळणारे अँटिऑक्सिडंट्स त्वचेला पर्यावरणाच्या हानीपासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात. जर्दाळूमधील आहारातील फायबर पचनास मदत करते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करते.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# ट्रम्प यांच्याविरोधातील ‘नो किंग्ज’ रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अमेरिकेत लक्षावधी नागरीक रस्त्यावर

**वॉशिंग्टन, दि. २० वृत्तसंस्था**

अमेरिकेमध्ये शनिवारी ‘नो किंग्ज’ रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अमेरिकेमध्ये अनेक छोटी-मोठी ५० शहरे आणि उपनगरांत २,७०० ठिकाणी या ‘नो किंग्ज’ आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे हुकूमशाहीसारखे वागणे आणि प्रशासनातील भ्रष्टाचार याचा आंदोलनात निषेध करण्यात आला. आंदोलनामध्ये सर्व वयोगटातील नागरिक सहभागी होते.




आंदोलनामध्ये ट्रम्प राबवत असलेल्या धोरणांना विरोध करण्यात आला. न्यूयॉर्कमधील ‘टाइम्स स्क्वेअर’ येथे गर्दीचा उच्चांक होता. पाच ठिकाणी एक लाखाहून अधिक नागरिकांनी शांततापूर्ण मोर्चे काढले. पोलिसांनी या ठिकाणी कुणालाही अटक केली नाही. बोस्टन, फिलाडेल्फिया, अटलांटा, डेनवर, शिकागो, सिएटल येथेही हजारोंच्या संख्येने गर्दी झाली होती. लॉस एंजेलिससह इतर ठिकाणीही नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेतला होता. सॅन दिएगो येथेही २५ हजारांहून अधिक नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेतला होता.

**मी राजा नाही : ट्रम्प**

‘ते माझा राजा म्हणून उल्लेख करीत आहेत. मी राजा नाही. डेमोक्रॅटिक पक्षाने कायमस्वरुपी सत्तेबाहेर राहावे. त्यामुळे अध्यक्ष म्हणून डेमोक्रॅटिक पक्षाचे कल्याणकारी उपक्रम मला बाजूला ठेवता येतील, अशी प्रतिक्रिया अध्यक्ष ट्रम्प यांनी आंदोलनापूर्वी दिली होती.

अमेरिकेतील ‘शटडाऊन’मुळे अनेक सरकारी उपक्रम आणि सेवा ठप्प पडल्या आहेत. या मुद्द्यावरून सध्या काँग्रेस आणि न्यायालयादरम्यान सुरू असलेला संघर्ष एकाधिकारशाहीकडे झुकणार आहे, असे आंदोलनाच्या आयोजकांचे म्हणणे आहे.

# गरीब कैद्यांबाबत मोठा निर्णय; सुप्रीम कोर्टाचा सरकारला आदेश

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तसंस्था**

देशभरातील तुरूंगामध्ये असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कैद्यांना मोठा दिलासा देणारा आदेश सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला दिला आहे. अनेक कैद्यांना जामीन मंजूर होतो, पण त्यासाठी त्यांचे पैसे नसतात. त्यामुळे त्यांना तुरुंगातून बाहेर येणे शक्य नाही. अशा कैद्यांना संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून सरकारने मदत करावी, असा ऐतिहासिक आदेश सुप्रीम कोर्टाने दिला आहे.



सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती एम. एम. सुनीरेश आणि न्यायमूर्ती एस. सी. शर्मा यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला आहे. कोर्टाने स्वत:हून या मुद्द्यावर सुनावणी घेत केवळ पैसे नसल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला जेलमध्ये ठेवले जाऊ शकत नाही, असे स्पष्ट केले. देशामध्ये हजारो अंडरट्रायल कैदी असे आहेत, ज्यांना जामीन मिळाला आहे, मात्र पैशांअभावी ते जामीनासाठी बॉन्ड भरू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना तुरुंगातच राहावे लागत असल्याचे समोर आले आहे.

खंडपीठाने नव्या म्हटले की, जर एखाद्या गरीब आरोपीला जामीन रक्कम भरणे शक्य होत नसेल तर जिल्हा विधी प्राधिकरणाकडून ती रक्कम भरता येईल. प्राधिकरणाकडून जास्तीत जास्त १ लाखपर्यंतची रक्कम भरू शकेल. एखाद्या प्रकरणात ट्रायल कोर्टाने अधिकची रक्कम निश्चित केली असेल तर प्राधिकरणाकडून ही रक्कम कमी करण्यासाठी कोर्टात अर्ज दाखल करेल, असे खंडपीठाने स्पष्ट केले.


जामीन मिळूनही आरोपी सात दिवसांत जेलमधून बाहेर गेला नाही तर संबंधित तुरूंग प्रशासनाला प्राधिकरणाकडे त्याबाबत माहिती द्यावी लागेल. त्यानंतर प्राधिकरणातील अधिकारी आरोपीजवळ जेलमध्ये त्याच्या खात्यात काही पैसे आहेत किंवा नाही, हे तपासेल. आरोपीकडे पैसे नसतील तर जिल्हा स्तरावरील समिती पाच दिवसांत त्याबाबत निर्णय घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देईल, असेही कोर्टाने म्हटले आहे.

‘सपोर्ट टून पुअर प्रिझनर्स स्कीम’ या योजनेअंतर्गत एका प्रकरणात एका कैद्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाऊ सकते. ही रक्कम संबंधित कोर्टात फिक्स्ड डिपॉझिट म्हणून जमा करता येईल. ही संपूर्ण प्रक्रिया इंटर-ऑपरेबल क्रिमिनल जस्टिस सिस्टीमच्या एकीकृत प्लॅटफॉर्मशी जोडली जाईल. त्यामुळे पोलीस, कोर्ट, जेल प्रशासन आणि फॉरेन्सिक लॅब यांना ही माहिती सहज उपलब्ध होऊ शकते. एखाद्या प्रकरणातील आरोपीला शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्तता झाली तर जामीनासाठी देण्यात आलेली रक्कम सरकारजमा होईल, हे ट्रायल कोर्ट निश्चित करेल.

# रशिया-युक्रेन युद्ध थांबवायचे असेल तर डोनबास क्षेत्राची वाटणी करा - ट्रम्प

**वॉशिंग्टन, दि. २० वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी रशिया-युक्रेन युद्धावर मोठे भाष्य केले आहे. ते म्हणाले, “युक्रेनच्या डोनबास प्रदेशाचं विभाजन करून त्याचा मोठा भाग रशियाच्या ताब्यात देणं आवश्यक आहे. तसे केल्यास चार वर्षांपासून चालू असलेलं युद्ध थांबवता येईल.” अमेरिकन हवाई दलाच्या एअर फोर्स वन या विमानातून प्रवास करत असताना ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, डोनबास प्रदेश जसा आत्ता विभागलेला आहे तसाच राहू द्या. दोन्ही बाजूंनी लढाई थांबली पाहिजे. दोन्ही बाजूच्या लष्करांनी आता घरी परतले पाहिजे आणि लोकांचा जीव घेणे थांबवले पाहिजे.”



रशिया व युक्रेनमध्ये चार वर्षांपासून युद्ध चालू आहे. रविवारी युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यांमुळे दक्षिण रशियाच्या ऑरेनबर्ग गॅस संयत्राला आग आगली. रशियन सरकारची कंपनी गॅझप्रोमचा हा गॅस प्रकल्प असून जगातील सर्वात मोठ्या गॅस संशोधन केंद्रापैकी एक आहे. रशियन अधिकाऱ्यांनी याबाबत सांगितलं की ड्रोन हल्ल्यात संयंत्राच्या एका भागाचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे कझाकस्तानकडून येणाऱ्या गॅसवरील प्रोसेसिंग युनिटमध्ये अडथळा निर्माण झाला आहे. यावर ट्रम्प यांनी भाष्य केलं आहे. ते म्हणाले, “युक्रेनला शांततेसाठी काही जमीन सोडावी लागेल.”

याआधी देखील ट्रम्प यांनी या विषयावर भाष्य केले होते. गुरुवारी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीवेळी ट्रम्प यांना प्रश्न विचारण्यात आला होता की रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन युक्रेनचा भूभाग न घेता युद्ध समाप्त करण्यासाठी तयार होतील का? यावर ट्रम्प म्हणाले होते की “नाही, कारण ते काही भाग नक्कीच घेतील. आम्ही (अमेरिका) त्याबाबतीत उदार आहोत. अमेरिका एकटाच असा देश आहे जो युद्ध जिंकूनही भूभाग वगैरे न घेता मागे हटतो.”

विशेष म्हणजे या मुलाखतीच्या काही वेळ आधी ट्रम्प यांची रशियाचे अध्यक्ष पुतिन व युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी चर्चा झाली होती. त्यामुळे ट्रम्प यांच्या या वक्तव्याला खूप महत्त्व प्राप्त झालं आहे. तसेच ट्रम्प यांनी मुलाखतीवेळी सांगितलं की “या आठवड्यात माझी आणि पुतिन यांची बुडापेस्टमध्ये भेट होऊ शकते.” दरम्यान, यूक्रेनने रशियाच्या अनेक ऊर्जा संयंत्रांवर ड्रोन हल्ले वाढवले आहेत. त्यामुळे रशियाकडून यावर काय प्रतिक्रिया येते याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे.

## संघावर टीका करणे काँग्रेसची सवय - इंद्रेश कुमार

**नवी दिल्ली, दि. २० वृत्तंस्था**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य इंद्रेश कुमार यांनी कर्नाटकचे मंत्री आणि काँग्रेस नेते प्रियांक खरगे यांच्या संघविरोधी वक्तव्यांना प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी म्हटले की, आरएसएसवर टीका करणे ही काँग्रेस पक्षाची सवय बनली आहे.

इंद्रेश कुमार म्हणाले, “हे देशाचे कायमचे दुर्भाग्य आहे की स्वातंत्र्याला प्रोत्साहन देण्याऐवजी काँग्रेसने देशाचे विभाजन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका करणे ही त्या पक्षाची जुनी सवय आहे. आता आरएसएसबद्दल विष उगाळणे ही काँग्रेस पक्षाची सवय झाली आहे. त्यांनी आरएसएसला नीट समजून घ्यावे आणि त्याबद्दल बोलणे थांबवावे.”

प्रियांक खरगे यांनी अलीकडेच कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना पत्र लिहून शासकीय शाळा आणि महाविद्यालयांमध्ये आरएसएसच्या उपक्रमांना परवानगी देऊ नये, अशी विनंती केली होती. या वक्तव्यानंतर राजकीय वाद निर्माण झाला आहे.

खरगे म्हणाले होते, “आरएसएसच्या क्रियाकलापांमुळे तरुणांच्या मनाचे ब्रेनवॉशिंग होते, ज्यामुळे देश किंवा समाजाला काहीही फायदा होत नाही. मी मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे की, आरएसएसच्या सभा किंवा उपक्रमांना पुरातत्व मंदिरांमध्ये किंवा शासकीय मंदिरांमध्ये परवानगी देऊ नये. त्यांनी हे त्यांच्या खाजगी घरांमध्ये करावे, त्याबाबत आम्हाला काही हरकत नाही; परंतु शासकीय जागेचा वापर मोठ्या प्रमाणावर ब्रेनवॉशिंगसाठी केला जाऊ नये.”

# कर्नाटकमध्ये ‘जातीय जनगणना’ची मुदत वाढवली

**बंगळुरू, दि. २० वृत्तसंस्था**

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी सांगितले की सरकारने सामाजिक आणि शैक्षणिक सर्वेक्षण म्हणजेच ‘जातीय जनगणना’ची मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. उर्वरित सर्वेक्षण काळात शिक्षकांचा वापर जनगणनेच्या कामासाठी केला जाणार नाही.

हे सर्वेक्षण कर्नाटक राज्य मागासवर्ग आयोगाद्वारे करण्यात येत आहे. हे सर्वेक्षण २२ सप्टेंबरला सुरू झाले होते आणि मूळत: ७ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होणार होते. मात्र, राज्य सरकारने नंतर सर्वेक्षणाची मुदत १८ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आणि शिक्षकांच्या मदतीने सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी शासकीय व अनुदानित शाळांच्या दसऱ्याच्या सुट्ट्याही १८ ऑक्टोबरपर्यंत वाढवल्या.

मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांनी वरिष्ठ मंत्री आणि अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सर्वेक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या बैठकीला कर्नाटक राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष मधुसूदन आर. नाईकही उपस्थित होते.

शिवकुमार म्हणाले, “राज्यातील इतर सर्व भागांमध्ये बेंगळुरू दक्षिण, बीदर आणि धारवाड वगळता सर्वेक्षणाचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे आणि ते व्यवस्थित पार पडले आहे. बेंगळुरू शहरात सध्या ६७ टक्के कव्हरेज झाले असून २० टक्के लोकांनी माहिती दिलेली नाही. त्यामुळे आम्ही सर्वेक्षणाची मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे. आता पुढे आम्ही जनगणनेच्या कामासाठी शिक्षकांचा वापर करणार नाही.”

ते पुढे म्हणाले, “जनगणनेच्या कामासाठी २०, २१ आणि २२ ऑक्टोबर रोजी दीपावलीची सुट्टी असेल. सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी इतर सरकारी कर्मचाऱ्यांचा वापर केला जाईल. ऑनलाइन सर्वेक्षणाचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल, ज्याचा वापर कोणीही करू शकतो. सर्वेक्षण ३१ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहील.”




महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, Group Editor-in-Chief and Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak, Executive Editor (Palghar)- Shashi Karpe

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. समूह मुख्य संपादक व संचालक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३), समूह संपादक - संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक - पंकज श्रीकृष्ण चांडक
कार्यकारी संपादक (पालघर) - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2014/62313